CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | गुरुवार, २३ जुलै २०२६ । वर्ष ४ थे अंक १३४ । पाने १२ । किंमत रु. ८/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

# ‘सर्वत्र चांगला पाऊस पडू दे, शेतकरी सुखी राहू दे’ : मुख्यमंत्री





## श्री संत तुकाराम महाराज व श्री ज्ञानेश्वर महाराज पादुकांचे फडणवीसांनी घेतले दर्शन

### वारकऱ्यांसाठी उपलब्ध केलेल्या सुविधामुळे पालकमंत्री व जिल्हा प्रशासनाच्या कामाचे कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ जुलै -**

‘राज्यात सर्वत्र चांगला पाऊस पडू दे, सर्वांना सुखी ठेव,ङ्क असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दसूर पाटी येथे जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पादुकांचे दर्शन घेताना घातले. त्यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी रथाचे काही वेळ सारथ्यही केले.

वारीत चालणारे सर्व वारकरी हे माऊलीचे जिवंत स्वरूप असल्याने वारीत चालण्याचा आनंद व्यक्त करतांना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, माऊलीकडे एकच मागणं आहे ते म्हणजे सर्वत्र पाऊस चांगला पडू दे व शेतकरी बांधवांना सुखी समाधानी राहू दे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वात मागील दोन वर्षांपासून पालखीचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा शासन उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे यावर्षीच्या वारीला प्रचंड मोठ्या प्रमाणात भाविक येत असून मागील सर्व वाऱ्यांचा संख्यात्मक विक्रम तुटेल. जिल्हा प्रशासनाकडून वारीमध्ये उत्तम सुविधा करण्यात आल्या आहेत. एआय तंत्रज्ञानाचा वापर करून भाविकांची संख्या ही मोजली जात आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी वारकऱ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी चांगले काम केले आहेत. वारीत स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून त्याप्रमाणे स्वच्छता झाली आहे. शौचालये, सफाई कर्मचारी, पुरेसा पाणीपुरवठा, पिण्याचे पाणी, जर्मन हँगर, चरण सेवा उपक्रम, आरोग्य पथके आदींच्या माध्यमातून सुविधा देण्यात येत आहेत, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पादुकांचे दर्शन घेण्याचा योग आला हे माझे मोठे भाग्य आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. प्रारंभी पालकमंत्री जयकुमार गोरे व जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आषाढी वारी २०२६ च्या अनुषंगाने मुख्यमंत्री महोदयांना सविस्तर माहिती दिली.यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार अभिजीत पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते आदी उपस्थित होते.



पंढरपूर : संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज व त्यांचे धाकटे बंधू श्री सोपानकाका यांचे पालखी सोहळे बुधवारी भंडीशेगाव येथे एकत्र आले. हा बंधूभेटीच्या सोहळ्याप्रसंगी वारकऱ्यांची अलोट गर्दी दिसून आली.

# पुणे जिल्ह्यातील धरणांत वाढतोय पाणीसाठा; उजनी धरण भरण्याच्या आशा

**पुणे, २२ जुलै**

पुणे शहरासह संपूर्ण जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला असून, पुणे घाट परिसराला आज पावसाचा ’रेड अलर्ट’ जारी करण्यात आला होता. अरबी समुद्र आणि पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या हवाम‌ान प्रणालीमुळे महाराष्ट्रात पुढील दोन ते तीन दिवस मुसळधार पावसाचा अंदाज पुणे हवामान विभागाने वर्तवला आहे.सतत सुरू असलेल्या पावसामुळे खडकवासला धरण सकाळपर्यंत ७९.११ टक्के क्षमतेने भरले असल्याने धरणातून मुठा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू केला. पाणलोट क्षेत्रांत पावसाची अधूनमधून रिपरिप

| | |
|---|---|
| खडकवासला | ७९.११ टक्के |
| पानशेत | ७४.६१ टक्के |
| वरसगाव | ६८.५८ टक्के |
| टेमघर | ५३.१२टक्के |

सुरूच असल्याने खबरदारीचा उपाय व संभाव्य पावसाची शक्यता गृहीत धरून बुधवारी चासकमान धरणाचे पाचही दरवाजे प्रत्येकी २० सेंटीमीटरने उचलून धरणाच्या सांडव्याद्वारे ३५०० क्युसेक वेगाने भीमा नदीपात्रात विसर्ग सोडण्यात आला आहे. धरणाच्या डावा कालव्याद्वारे नियंत्रित पद्धतीने खडकवासला धरणातून १.५१ टीएमसी पाणीसाठ्याचा विसर्ग करण्यात आला.येत्या आठवड्यात पुणे शहरासह जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. धरणांमधील वाढता साठा लक्षात घेता महापालिकेने २२ जुलैपर्यंत पुण्यातील पाणीकपात रद्द केली आहे. ३०० क्युसेकने विसर्ग करण्यात आला आहे. एकूण चासकमान धरणातून ३८०० क्युसेकने विसर्ग सोडण्यात आला.चासकमान धरणाच्या पाणलोट क्षेत्रांत पडत असलेल्या पावसाने ८.५४ टीएमसी क्षमता असलेले चासकमान धरण ९५.६४ टक्के म्हणजेच एकूण ८.१७ टी एमसी भरले. धरणात उपयुक्त जलसाठा ७.२२ टीएमसी आहे.






CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## महत्वाचे...

### शिंदे परिवाराकडून वारकऱ्यांना फराळ व औषधांचे वाटप

**करकंब, दि. २२ जुलै-**

करकंब येथील नाथ मंदिर परिसरात विविध दिंड्यांचे आगमन होत आहे. त्या दिंड्यातील वारकऱ्यांचे आरोग्य निरोगी रहावे व त्यांना प्रवासाचा थकवा जाणवू नये या निरपेक्ष भावनेतून करकंब येथील प्रतिक्षा शिंदे व शिंदे परिवाराच्या वतीने सकस व पौष्टिक असा फराळ तसेच प्रवासामध्ये उपयोगी पडतील अशा औषध साहित्यांचेही वाटप करण्यात आले. वारकऱ्यांची सेवा हीच ईश्वर सेवा मानत शिंदे परिवाराने वारकऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या घराण्याला लाभलेल्या वारकरी परंपरेच्या संस्कारातूनच वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य लाभत असल्याची भावना प्रतिक्षा शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली.





### सांगोला विद्यामंदिरमध्ये बापूसाहेब झपके यांची जयंती साजरी

**सांगोला, दि.२२ जुलै-**

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांची १०४ वी जयंती सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजमध्ये साजरी करण्यात आली. संस्थेचे कार्यकारिणी सदस्य विश्वेश झपके यांच्या हस्ते कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, प्रशालेचे प्राचार्य चारुदत्त जगताप, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक उत्तम सरगर, काकासो नरूटे, शुभांगी घोंगडे उपस्थित होते.



### कुचन प्रशालेत अजित पवार यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि.२२ जुलै-**

कुचन प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण येथे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त पद्मशाली शिक्षण संस्थेचे विश्वस्त व शालेय समितीचे अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली यांच्या हस्ते अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु प्रणिता सामल मल्लिकार्जुन जोकारे उपस्थित होते.

### बार्शीत सोनम वांगचूकांच्या समर्थनार्थ आंदोलन व दडपशाहीचा निषेध

**बार्शी, दि. २२ जुलै-**

दिल्ली येथे सुरु असलेल्या सोनम वांगचूक व कॉक्रोच जनता पार्टीच्या अभिजीत दिपके यांच्या आंदोलनाला वंचित बहुजन आघाडीच्यावतीने पाठिंबा देऊन सरकारच्या दडपशाहीचा निषेध करण्यात आला. यावेळी वंचित आघाडीचे ॲड. विवेक गजशिव यांनी दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा देऊन, सोनम वांगचूक यांचे शांततापूर्ण आंदोलन दिल्ली पोलिसांनी भाजप सरकारच्या सांगण्यावरुन चिरडले असल्याचे सांगून अभिजीत दिपकेला केलेल्या मारहाणीचा निषेध केला. तसेच २० जुलैच्या जंतरमंतरवरील आंदोलनाला पाठिंबा देऊन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. यावेळी धनंजय जगदाळे, वसीम पठाण, महेश चव्हाण, तानाजी बोकेफोडे, सचिन पालके, ॲड. हर्षवर्धन बोधले, बाळासाहेब कदम, मोहन कसबे, प्रवीण आखाडे, शरद बनसोडे यांनी मनोगत व्यक्त करुन नायब तहसीलदार बदे यांच्याकडे दिल्लीतील आंदोलनास पाठिंबा देऊन सरकारचा निषेध करीत असलेबाबतचे निवेदन दिले. यावेळी रेखा सरवदे, अंजली धांडोरे, तुषार बोकेफोडे, स्वप्नील लंकेश्वर, शहर उपाध्यक्ष किरण भालशंकर, युन्नूस शेख, ॲड. मिलिंद बनसोडे, पांडा समींदर, भैय्या उबाळे, उत्तम चौधरी, बाबासाहेब खडसरे, अक्षय गायकवाड, राजेंद्र कदम, किशोर ढोले, सचिन ननवरे, अतिश बनसोडे, दिनेश दंदाडे, प्रशांत जाधव, दत्ता काकडे, ईश्वर पाचकूडवे उपस्थित होते.



### हनुमान वाचनालयात अजित पवार यांची जयंती

**सांगोला, दि. २२ जुलै-**

उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांची जयंती श्री हनुमान सार्वजनिक वाचनालय, वासुद (ता.सांगोला) येथे साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण उपाध्यक्ष मोहन साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी संचालक नारायण भोरे, नानासाहेब केदार उपस्थित होते. शिक्षक किरण पोरे यांनी मनोगतातून अजितदादा पवार यांचा जीवन पट कथन करून त्यांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. आभार संतोष मोरे यांनी मानले.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर एकजुटीने लढा उभारण्याचा निर्धार

**राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाच्या बैठकीत विविध ठराव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाच्या वतीने आयोजित बैठक व चर्चासत्राचा कार्यक्रम जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालय, वाई (जि. सातारा) येथे पार पडला. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न, संघटनेची आगामी भूमिका, शासनस्तरीय पाठपुरावा तसेच संघटना अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने या बैठकीत चर्चा करून एकजुटीने लढण्याचा निर्धार करण्यात आला.

महासंघाचे तत्कालीन अध्यक्ष विजय निकम व सरचिटणीस डॉ. आर. सिंग यांना अभिवादन करून सभेत सुरुवात झाली. प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे, महासंघाचे अध्यक्ष गोपीचंद पाटील, कार्याध्यक्ष डी. एम. बारस्कर, सरचिटणीस माधव राऊळ यांच्या प्रमुख उपस्थितीत अमरावती, कोकण, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, मुंबई, जळगाव आदी विभागांतून आलेल्या प्रतिनिधींचा या वेळी सत्कार करण्यात आला. महिला संघटक सोनाली लब्दे, आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त प्रशांत देशमुख आणि पी.एच.डी. प्राप्त डॉ. अंकुश शेलार यांचा विशेष गौरव करण्यात आला. सातारा जिल्हाध्यक्ष डी. आर. जाधव यांनी प्रास्ताविक केले. महाविद्यालायाचे कार्यालयीन अधीक्षक बाळासाहेब टेमकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व परिचय करून दिला. सूत्रसंचालन राहुल तायडे यांनी केले. पी. एम. डेरे यांनी आभार मानले.



**राज्यातील महाविद्यालयात २९०० रिक्त पदाची भरती होणार : माधव राऊळ**

महासंघाचे सरचिटणीस माधव राऊळ यांनी विविध प्रलंबित प्रश्नांबाबत महासंघाने केलेल्या पाठपुराव्याची माहिती दिली. यामध्ये राज्यातील अनुदानित महाविद्यालयात सुमारे २,९०० रिक्त पदांची भरती लवकरच होणार असल्याचे सांगितले. १२-२४ आश्वासित प्रगति योजना, सातवा वेतन आयोगानुसार अर्जित रजा रोखीकरण, वेतनवाढ व जुनी पेन्शन योजना पात्रतेनुसार न्याय नियुक्ती हे सर्व प्रश्न न्यायालयीन व शासनस्तरावर टप्प्याटप्प्याने मार्गी लागतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणव्यवस्थेसमोरील आव्हानांवरही त्यांनी भाष्य केले.

**कार्याध्यक्षपदी चंद्रकांत धनवडे**

या बैठकीत संघटनेच्या बळकटीकरणासाठी नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी बिनविरोध झाल्या. त्या अश्या : पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्षः चंद्रकांत धनवडे, उपाध्यक्षः दिलीप जाधव, मुंबई सचिवः सुदर्शन आंग्रे, कोल्हापूर सचिव रवींद्र भोसले. सदस्य : सिद्धेश्वर स्वामी (सांगोला), बरकत मुलानी (विटा), प्रशांत गायकवाड (कुंडल).

**प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे महत्त्व**

प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे यांनी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हे शैक्षणिक व्यवस्थेचे समान महत्त्वाचे घटक असल्याने कर्मचाऱ्यांच्या रास्त मागण्यांना न्याय मिळावा, अशा शुभेच्छा दिल्या.

**सामूहिक प्रयत्नांची गरज**

महासंघाचे अध्यक्ष गोपीचंद पाटील यांनी मार्गदर्शन करताना २०१९ नंतर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती न झाल्याबद्दल चिंता व्यक्त केली. महासंघ सातत्याने संघर्ष करत असून कर्मचाऱ्यांनी संघटित व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. महासंघाचे कार्याध्यक्ष डी. एम. बारस्कर यांनी संघटना अधिक सक्षम करण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले.

### रूई येथे मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २२ जुलै-**

माढा तालुक्यातील रूई येथे जुन्या वादाच्या कारणावरून एका मजुराला मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी टेंभुर्णी पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी हणुमंत नागनाथ माने (वय ३१, व्यवसाय-मजुरी, रा. रूई, ता. माढा, जि. सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना सोमवार, २१ जुलै रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या घराजवळ घडली. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, 'तुझी भावजय आमच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी का गेली?' असा जाब विचारत आरोपींनी वाद घातला. त्यानंतर आरोपी मुन्या बाळू मुलाणी, बाळू मुलाणी आणि निखील विठ्ठल जाधव यांनी शिवीगाळ व दमदाटी करत हाताने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी जमिनीवर पडले. यावेळी फिर्यादीने 'मला मारू नका' अशी विनंती केली असता, आरोपी सोयल बाळू मुलाणी याने हातातील लाकडी काठीने फिर्यादीच्या तोंडावर, डोळ्याजवळ आणि पाठीवर वार करून जखमी केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५१४/२०२६ नोंद करण्यात आला असून आरोपी सोयल बाळू मुलाणी, मुन्या बाळू मुलाणी, बाळू मुलाणी आणि निखील विठ्ठल जाधव (सर्व रा. रूई, ता. माढा, जि. सोलापूर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याची नोंद २१ जुलै रोजी सायंकाळी ७.४२ वाजता करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास श्रेणी पोलीस उपनिरीक्षक भीमराव गोळे करीत आहेत.

# अवैध जुगार, दारु विक्री प्रकरणी ८ जणांवर गुन्हे दाखल

**सुमारे ४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ जुलै-**

पोलिस ठाणे हद्दीतील अवैध धंद्यांचे समूळ नष्टीकरण व्हावे याकरिता बार्शी तालुका पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी अक्षय सोनवणे यांनी अवैध धंदे करणाऱ्यांवर मोहीम हाती घेतली असून एकाच दिवसात अवैध क्लब पत्ते जुगार खेळणाऱ्या इसमांवर आणि अवैध दारु विक्री करणाऱ्यांवर धडक कारवाई करुन तब्बल ३ लाख ६८ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.



बार्शी तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर २२९/२६ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२अ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपींची नावे यािप्रमाणे-जावेद दिलावर शेख, सिद्धेश्वर पांडुरंग आगलावे, संभाजी हनुमंत आगलावे, शंकर विलास ननवरे, धनाजी साहेबराव आगलावे, गणेश चंद्रकांत आगलावे, भाऊ जगन्नाथ आगलावे, सर्व रा. बावी, ता. बार्शी अवैध दारु विक्री अनुषंगाने बार्शी तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर २३०/ २६ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ ई प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपीचे नाव याप्रमाणे- चंद्रकांत बलभीम पिंगळे, रा. बार्शी. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण श्री. अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली खालील पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांनी केलेली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे, सदाशिव गवळी, अमित घाडगे, सोमनाथ खांडेकर, अमृत खेडकर, संदीप निचळ, सिद्धेश्वर लोंढे, युवराज गायकवाड, शिवशंकर खराडे, सागर वाकळे, अश्विनी साबळे, प्रीती आगलावे.

# मल्लिकार्जुन मंदिराच्या बांधकामाला वेग

**महाद्वाराचे पूजन; जानेवारीअखेर काम पूर्ण होण्याची शक्यता**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ जुलै-**

येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिराच्या बांधकामाला आता वेग आला असून महाद्वार पूजन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते विधिवत पार पडले. बसस्थानकाजवळ उभारण्यात येत असलेले हे भव्य मंदिर ७० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम जानेवारीअखेर पूर्ण होईल, अशी माहिती संबंधितांनी दिली.

धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या या प्रकल्पामुळे अक्कलकोटच्या वैभवात आणखी भर पडणार आहे. अक्कलकोट विधानसभा क्षेत्रात धार्मिक पर्यटन दिवसेंदिवस वाढत असताना येणाऱ्या भाविकांसाठी अधिकाधिक सुविधा निर्माण करण्याची गरज निर्माण झाली होती. ही बाब लक्षात घेऊन आमदार कल्याणशेट्टी यांनी



२०२३-२४ च्या पर्यटन विकास विभागाच्या निधीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन मल्लिकार्जुन मंदिरासाठी चार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून सध्या बांधकाम प्रगतिपथावर आहे.

याशिवाय इलेक्ट्रिक कामासाठी स्वतंत्रपणे ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यावर एकूण ७ ते ८ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यावेळी ट्रस्टीचे अध्यक्ष शिवलिंग स्वामी, स्वामीनाथ हिप्परगी, प्रशांत लोकापुरे, विजयकुमार कापसे, राजशेखर नागुरे, आप्पासाहेब पाटील, अपर्णा सिद्धे, सिद्धाराम शिवमूर्ती, सुनील सिद्धे,विजयकुमार लिंबीतोटे, बसवराज माशाळे, कांतू धनशेट्टी, रमेश कापसे, सुनील गोरे, देवीदास कवटगी, दयानंद रोडगे, निखिल पाटील, दिनेश पटेल, गजानन पाटील, ओंकार कोरे अविनाश मडिखांबे, नागराज कुंभार यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घटस्फोटाचा खटला पत्नीच्या इच्छेनुसार तिचे गावाच्या न्यायालयात वर्ग करता येणार नाही

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

अहिल्यानगर येथे राहणाऱ्या पत्नीने पुणे येथील न्यायालयात तिच्या पतीने दाखल केलेले घटस्फोटाचे प्रकरण अहिल्यानगर न्यायालयात वर्ग करण्याकरिता दाखल केलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळली आहे.

अहिल्यानगर येथून पुणे न्यायालयात जाणे-येणे दुबळ्या आर्थिक परिस्थितीमुळे व इतर कारणास्तव शक्य नसल्यामुळे पतीने पुणे न्यायालयात दाखल केलेले घटस्फोटाचे प्रकरण अहिल्यानगर येथील न्यायालयात वर्ग करण्याकरिता पत्नीने उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. त्यावेळी युक्तिवादात पत्नीच्या वकिलांनी पत्नीच्या दुबळ्या आर्थिक परिस्थिती बरोबरच त्यांच्यातील अन्य प्रकरणे देखील अहिल्यानगर न्यायालयातच प्रलंबित असल्यामुळे पुणे न्यायालयातील घटस्फोटाचे प्रकरणही अहिल्यानगर न्यायालयात वर्ग करण्याची न्यायालयास विनंती केली. त्यावेळी त्यास पतीचे वकील सोलापूर येथील ॲड. अथर्व अंदोरे यांनी सक्त विरोध करीत पतीने त्याच्या सोयीनुसार पुणे न्यायालयात घटस्फोटाचे प्रकरण कायदेशीरपणे दाखल केले असून केवळ पत्नीच्या इच्छेनुसार घटस्फोटाचा खटला तिचे माहेरच्या गावचे न्यायालयात वर्ग करणे न्याय्य नसून पतीची सोय देखील तितकीच महत्वाची आहे. त्याचप्रमाणे पतीला त्रास देऊन त्याचे आर्थिक नुकसान होण्यासाठी पत्नीने ही याचिका दाखल केलेली आहे, असा युक्तिवाद केला. ॲड.अथर्व अंदोरे याचा युक्तिवाद मान्य करीत न्यायमूर्तिंनी पत्नीची याचिका फेटाळली. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिकेतील पतितर्फे ॲड.अथर्व अंदोरे, ॲड. मनिषा दळवे यांनी तर पत्नीतर्फे ॲड.सुवर्णा झावरे यांनी काम पाहिले.



# शंकरलिंग प्रशालेत अजित पवार यांची जयंती

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २२ जुलै-**

वळसंग ( ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री दिवंगत अजित पवार यांची जयंती कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन प्राध्यापक संतोष शिंदे यांच्या हस्ते करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमास पर्यवेक्षक शिवानंद घोडके, सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार, सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, निलकंठ कवटगी, बसवराज दुधगी, वीरेश थळंगे, सिध्दारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, विजय प्याटी, शिवराज अष्टगी, मल्लिनाथ गौडगाव, प्रा.शरणय्या मसुती, अजय माणकोजी, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, प्रा. प्रतिभा ताडुंरे वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी, कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, प्रयोगशाळा सहायक विनोद दुधगी, सेवक कट्टेप्पा कोळी, सुनिता कुर्ले उपस्थित होते. याप्रसंगी सांस्कृतिक विभाग उपप्रमुख श्रीमंत भोसले यांनी स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्याविषयी माहिती उपस्थितींना दिले.

# ब्रह्मर्षी सुभाष पत्री यांच्या जीवनावरील चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

ध्यानगुरू ब्रह्मर्षी सुभाष पत्रीजी यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित माहितीपट (डॉक्युमेंटरी) आज येथील लक्ष्मीनारायण टॉकीज येथे सुमारे ४०० ध्यानसाधकांच्या हाऊसफुल्ल उपस्थितीत प्रदर्शित झाला. जगभरातील सुमारे २७५ चित्रपटगृहांमध्ये इस्रायल, अंदमान, अमेरिका, नेपाळ तसेच भारतातील विविध राज्यांमध्ये सकाळी ८ ते १०.३० या वेळेत एकाच वेळी या चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले.

या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे जगभरातील सर्व चित्रपटगृहांमध्ये चित्रपट सुरू होण्यापूर्वी ११ मिनिटांचे सामूहिक ध्यान करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण वातावरण शांत, सकारात्मक आणि ऊर्जामय झाले. त्यानंतर ब्रह्मर्षी सुभाष पत्रीजी यांच्या ध्यानप्रवासाची सुरुवात, त्यांचे जीवनकार्य, ध्यानाचा जागतिक प्रसार आणि मानवकल्याणासाठीचे त्यांचे योगदान यांचे प्रभावी चित्रण असलेला चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. चित्रपटाने उपस्थितांच्या मनावर खोल प्रभाव पाडला.

या प्रदर्शनासाठी कोल्हापूर, शेगाव, चिखली, अक्कलकोट, मैंदर्गी आदी ठिकाणांहून मोठ्या संख्येने ध्यानसाधक उपस्थित होते. विशेषतः अक्कलकोट ध्यान टीम आणि श्री वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या नेतृत्वाखाली ४५ ध्यानसाधकांनी सामूहिक उपस्थिती दर्शवत या प्रेरणादायी चित्रपटाचा



लाभ घेतला. यावेळी अक्कलकोटमध्ये मोठ्या प्रमाणावर ध्यान शिबिर आयोजित करण्याचा संकल्पही महेश इंगळे यांनी याप्रसंगी व्यक्त केला. हा चित्रपट दि सोलापूर पिरॅमिड स्पिरिच्युअल ट्रस्ट यांच्या वतीने सर्वांसाठी मोफत प्रदर्शित करण्यात आला होता.

संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष चंद्रशेखर रेड्डी यांनी सांगितले की, 'या चित्रपटामागील एकमेव उद्देश म्हणजे समाजात ध्यानाविषयी जागृती निर्माण करणे, अधिकाधिक लोकांना ध्यानाची सवय लागावी आणि प्रत्येकाने स्वतः ध्यानाचा अनुभव घ्यावा. यावेळी चित्रपटगृहाचे मालक देविदास गुंडेटी यांनी हे चित्रपटगृह विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल महेश इंगळे यांच्या हस्ते त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन श्रीनिवास पुला आणि रोहित वंगारी यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडले.

याप्रसंगी पुरणचंद्र राव, परमानंद अलगोंडा पाटील, महेशजी इंगळे, दामोदर देवसानी, नगरसेवक विनोद भोसले, नेहा मिराजगावकर, कविता मिराजगावकर, ज्योत्स्ना दुस्सल, देवयानी नवगजे, स्मिता दुधानाकार, आनंद गंगाजी, सिद्राम पुराणिक, मास्टर गणेश, चंद्रकांता, डॉ. अर्जुन कुंभार, राजश्री इराबत्ती उपस्थित होते.

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २३ जुलै २०२६ ।

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# सौदी-अमेरिका अणुकरार

## । डोनाल्ड ट्रम्प यांची मंजुरी । युरेनियम संवर्धनाला परवानगी



**वॉशिंग्टन, २२ जुलै**

अमेरिका आणि इराण यांच्यात ज्या मुद्द्यावरून दीर्घ काळापासून तणाव निर्माण झाला होता, त्या युरेनियम संवर्धनाबाबत डोनाल्ड ट्रम्प यांनी एक मोठा आणि धाडसी निर्णय घेतला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सौदी अरबसोबत अण्विक कराराला मंजुरी दिली आहे. त्यानुसार आता सौदी अरब नागरी वापरासाठीच्या अण्विक प्रकल्पासाठी युरेनियम संवर्धन करू शकणार आहे.

या कराराची औपचारिक घोषणा ही लवकरच होऊ शकते, अशी माहिती सूत्रांनी दिली. हा करार ३० वर्षासाठी असणार आहे. यात अमेरिकेच्या कंपन्या सौदी अरबमधील अण्विक कार्यक्रम विकासात सामील होतील. अमेरिका आणि सौदी अरब संयुक्त अभ्यासानंतर देशात युरेनियम संवर्धन प्रकल्प तयार करण्याचा मार्ग देखील मोकळा होऊ शकतो. हा निर्णय मध्य पूर्व आशियातील भूराजकारणासाठी महत्त्वाचा मानला जात आहे.



सौदी अरबचे दीर्घ काळापासून इराणसोबत वैर आहे. अशा परिस्थितीत सौदीला युरेनियम संवर्धनाची परवानगी देऊन पश्चिम आशियातील शक्ती संतुलन साधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

अणू अप्रसार जाणकारांनी या निर्णयावर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. युरेनियम संवर्धन केल्यानंतर थेट अण्वस्त्र तयार करता येत नाही. मात्र, भविष्यात शस्त्र तयार करण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. सौदी अरबचे राजकुमार प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांनी यापूर्वीच इराणने अण्वस्त्र निर्मिती केली, तर सौदीही त्या दिशेने पुढे जाऊ शकतो असे स्पष्ट केले आहे.

यापूर्वी ज्यो बायडेन आणि डोनाल्ड ट्रम्प हे दोघांनीही सौदी अरबसोबत करार करण्याचा प्रयत्न केले. संयुक्त अरब अमिरातने अमेरिकेसोबत १२३ करार करीत अण्विक उर्जा उपक्रम सुरू केला होता. मात्र, त्यांनी युरेनियम संवर्धनाचा अधिकार मागितला नव्हता. त्यामुळे युएई मॉडेलला सर्वांत सुरक्षित अण्विक सहकार्य कराराचे एक उत्तम उदाहरण मानले जाते. ◂ (वृत्तसंस्था)

### सौदी-पाकिस्तान सुरक्षा करार

सौदी अरबने अण्वस्त्रसज्ज असलेल्या पाकिस्तानसोबत सुरक्षा करार केला आहे. काही महिन्यापूर्वी पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांनी गरज पडल्यास पाकिस्तान सौदीला अणुकार्यक्रम पुरवणार असल्याचे वक्तव्य केले होते. आता डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाच्या या नव्या निर्णयामुळं हा फक्त एक अणुकरार नसून, इराणविरुद्धची अमेरिकेची मोठी रणनीती असल्याची चर्चा आहे. ■



चीनमधील शांघाई येथील बंदरातून बुधवारी एका जहाजावरून 'ए ग्रॅव्हिटी-१' या उपग्रहाने अवकाशाकडे झेप घेतली. यावेळी एका शक्तिशाली रॉकेटच्या माध्यमातून एकूण नऊ उपग्रहांना अवकाशात पाठविण्यात आले

# व्यापार वाटाघाटी अधिक तीव्र करू : मार्क कार्नी

**व्हँकुव्हर, २२ जुलै**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बहुतांश कॅनेडियन वस्तूंवर ५० टक्के शुल्क जाहीर केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, कॅनडा, अमेरिका आणि मेक्सिको यांच्यातील व्यापार करारावरील वाटाघाटी अधिक तीव्र करण्यास ते आणि ट्रम्प सहमत झाले आहेत, असे कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी मंगळवारी सांगितले.

कॅनडाने अमेरिकन ऑटोमोबाईल्स, मद्य आणि दुग्धजन्य पदार्थांसोबत अन्यायकारक भेदभाव केला आहे, असे ट्रम्प यांनी जाहीर केल्यानंतर कार्नी यांनी ही टिप्पणी केली. हे नवीन शुल्क सोमवारपासून ३० दिवसांनी लागू होणार होते. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांशी बोललो आणि आम्ही पुढील काही आठवड्यांत आमच्या वाटाघाटी अधिक सखोल आणि वेगवान करण्यास सहमत झालो आहोत, असे कार्नी ओटावा येथे म्हणाले. आमच्या नोकऱ्या, आमचे कामगार, आमचे शेतकरी यांना पाठिंबा देण्यासाठी आणि कॅनडाला अधिक मजबूत, अधिक स्वतंत्र आणि अधिक लवचिक बनवण्यासाठी जे काही आवश्यक आहे ते सर्व कॅनडा करेल. व्यापारी करारासंदर्भाद अमेरिकेशी वाटाघाटी करण्यात येतील. ◂ (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता



### 'बिग बी'च्या पोस्टचा काढला चुकीचा अर्थ


**मुंबई :** मंगळवारी अमिताभ बच्चन यांनी एक पोस्ट शेअर करत रुग्णालयात, एका शस्त्रक्रियेनंतर आणि आयसीयूमध्ये, अनुभवी डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली, त्यानंतर रुग्णालयातून सुट्टी आणि घरी परतणे, असे लिहिले. ही पोस्ट समोर आल्यानंतर बिग बी शस्त्रक्रियेनंतर रुग्णालयातून डिस्चार्ज झाले, असा अंदाज व्यक्त केला जाऊ लागला. पण आता त्यांनी स्वतः एका नवीन ब्लॉगमध्ये ते आयसीयूमध्ये नव्हते हे स्पष्ट केले. मी पूर्णपणे ठीक आहे. माझ्या पोस्टचा चुकीचा अर्थ लावला गेला. मी फक्त एक उदाहरण देत होतो. एखाद्या मोठ्या शस्त्रक्रियेनंतर किंवा आयसीयूमध्ये राहिल्यानंतर सर्वात कठीण वेळ तेव्हा सुरू होते, जेव्हा तुम्ही घरी परतता आणि तुमच्या कमकुवत किंवा खराब झालेल्या स्थितीचा सामना करता. अगदी त्याचप्रमाणे, जेव्हा एखादा चॅम्पियन हरतो, तेव्हा त्याच्यासाठी सर्वात कठीण लढाई त्याच्या आत सुरू असलेल्या भावनांशी असते. माझा उद्देश अर्जेंटिनाच्या पराभवाकडे आणि त्यावेळी लिओनेल मेस्सीच्या मानसिक स्थितीकडे होता, एका अशा चॅम्पियनकडे ज्याला पराभवाला सामोरे जावे लागले, असा होता. ■

### 'द प्राईड ऑफ भारत'साठी टीम सज्ज




**मुंबई :** चित्रपट निर्माता संदीप सिंग आपल्या आगामी मोठ्या ऐतिहासिक चित्रपटाची 'द प्राईड ऑफ भारतः छत्रपती शिवाजी महाराज' मोठ्या स्तरावर निर्मिती करण्याची तयारी करत आहेत. या चित्रपटात ऋषभ शेट्टी छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत दिसणार आहे. आता हा चित्रपट आणखी खास बनवण्यासाठी निर्मात्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील ॲक्शन टीमला समाविष्ट केले आहे, जी चित्रपटातील युद्ध आणि ॲक्शन सीन्स उत्कृष्ट बनवण्यासाठी काम करेल. ॲक्शन डिझाइनसाठी ओळखले जाणारे मार्क हेन्सन याचे ॲक्शन दिग्दर्शन सांभाळणार आहेत. सुमारे ५०० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनलेला हा चित्रपट दोन भागांमध्ये प्रदर्शित होईल. ऋषभ व्यतिरिक्त, यात अर्जुन रामपाल, विवेक ओबेरॉय आणि शेफाली शाह देखील महत्त्वाच्या भूमिका साकारताना दिसतील. चित्रपटाचे बहुतांश चित्रीकरण छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठा साम्राज्याची स्थापना केली होती, अशा महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक किल्ले आणि ठिकाणांवर केले जाणार आहे. ■

### जॉन अब्राहमने खरेदी केला बंगला



**मुंबई :** बॉलिवुडचा ॲक्शन मॅन जॉन अब्राहम याने मुंबईमधील प्राइम लोकेशनवर एक लक्झरी बंगला खरेदी केला. अभिनेत्याने कोटींच्या घरात पैसे मोजून घर विकत घेतले आहे. जॉन अब्राहमने बॉलिवूडमध्ये दोन दशकांहून अधिक काळ इंडस्ट्रीत काम केले आहे. जॉनने वांद्रे पश्चिम येथे बंगला खरेदी केला आहे. हे घर अभिनेत्याने ८४ कोटींना विकत घेतले आहे. ही प्रॉपर्टी वांद्रे पश्चिम येथील सेंट मार्टिन्स रोडवर आहे. या परिसरात इतर कलाकारांच्याही प्रॉपर्टीज असल्याची माहिती आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# झुरळांची चमकोगिरी

वैचारिक भूमिकेचा आणि विरोधासाठी आवश्यक असलेल्या ठोस मुद्यांचा पूर्णपणे अभाव असलेल्या विरोधकांना 'नीट'ची पेपरफूट आणि त्या मुद्यावर कॉक्रोच जनता पार्टीच्या पुढाकाराने झालेल्या आंदोलनाच्या निमित्ताने आयते कोलीत मिळाले. सरकारी यंत्रणेच्या सुस्तीमुळे ते त्यांना आयतेच दिले गेले असेही म्हणता येईल. नीटची पेपरफूट हा गंभीर विषय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह सार्यांनीच त्याचे गांभीर्य मान्य केले आहे. परंतु, या मुद्यावर संपूर्ण व्यवस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा आततायीपणा विरोधकांनी केला आणि त्यातून चिंताजनक वातावरण निर्माण झाले. विरोधक म्हणून सरकारवर टीका करण्याचा त्यांचा अधिकार मान्य केला तरी अशा प्रकारचे वातावरण निर्माण करणे चूकच म्हटले पाहिजे. आपण कुणाच्या सोबत आंदोलन करतो आहोत, यालाही महत्त्व असते. काल परवा आभासी जगतात जन्माला आलेल्या कॉक्रोच पार्टीसारख्या घटकाच्या मागे काँग्रेस आणि अन्य विरोधकांना फरफटत जावे लागले, याचे वैषम्य ज्याचे त्याला वाटायला हवे. पण, ते त्यांना वाटणार नाही. कारण सरकारशी संघर्ष करण्यासाठी विरोधकांकडे मुद्देच नाहीत आणि असतील तर त्या मुद्यावर सरकारला जाब विचारण्याची त्यांची ताकद नाही. त्यामुळे आयत्या कोलितावर आपली पोळी भाजून घेण्याचा उद्योग विरोधकांनी केला.

गेल्या बारा वर्षांच्या काळात केंद्रातील मोदी सरकारने देशात फार मोठे मन्वंतर घडवून आणले आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थिती प्रतिकूल असताना आणि अंतर्गत आव्हाने असताना आपला देश प्रगतिपथावर अग्रेसर आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय भू-राजकीय स्थिती सतत बदलते आहे. तरीही आपले केंद्र सरकार वेळोवेळी योग्य भूमिका घेऊन राज्यशकट व्यवस्थित हाकत असल्याचे दिसत आहे. दुसऱ्या बाजूला विरोधकांचे राजकारण पाहिले, तर त्यांच्याकडे ठोस धोरणात्मक मुद्यांचा आणि वैचारिकतेचा पूर्ण दुष्काळ दिसतो. काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख नेते राहुल गांधी यांच्यासह शरद पवार, प्रियांका वढेरा, उद्धव ठाकरे, अखिलेश यादव, अरविंद केजरीवाल यांना कॉक्रोच पार्टीसारख्या क्षुल्लक घटकाच्या मागे धावावे लागले. विरोधकांची राजकीय आणि बौद्धिक दिवाळखोरी त्यामुळे दिसून आली. ज्या पक्षांना किंवा संघटनांना स्वतःची राजकीय ओळख नाही आणि ज्यांची राष्ट्रनिष्ठा संशयास्पद आहे, अशा उपटसुंभ घटकांनी गोंधळ घालावा आणि राष्ट्रीय पक्षाच्या नेत्यांनी राजकीय पोळी भाजण्यासाठी त्यांच्या खांद्यावर हात ठेवावा, हे चित्र लोकशाहीसाठी घातक आहे. या निमित्ताने जणू काही आभाळाच कोसळल्याचे चित्र विरोधकांनी उभे केले. या सगळ्या राजकीय गदारोळाच्या आणि आंदोलनांच्या पाठीशी काही राष्ट्रविघातक, समाजकंटक किंवा देशात अस्थिरता निर्माण करू पाहणाऱ्या शक्ती असण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. अशांचा शोध घेऊन त्यांना कठोरपणे वठणीवर आणलेच पाहिजे. ते काम सरकार करीत आहेच. लोकशाहीत शांततापूर्ण आंदोलने ही मोठी ताकद आहे. आतापर्यंत विविध जनआंदोलनांनी व्यवस्थेला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडले हेही खरे. मात्र, राष्ट्रविघातक घटक, राजकीय हस्तक्षेप यामुळे आंदोलने आपल्या मूळ ध्येयापासून भरकटल्याचीही उदाहरणे आहेत. नीट परीक्षेतील गैरप्रकाराविरुद्धचे आंदोलन न्याय्यच होते. पण, ते आंदोलन विकसित होत असताना सरकारच्या विरोधात हा एकमेव अजेंडा असलेले काही लोक त्यात घुसले. त्यामुळेच त्यात अप्रिय घटना घडल्या. देशविरोधी नारेबाजी झाली. आंदोलनाचा खरा उद्देश अशा घटनांनी बाधित होतो. पण, ते लक्षात यायला तेव्हा उशीर झालेला असतो. या विषयाला आणखी एक बाजू आहे. ती अशी की, अशा अत्यंत संवेदनशील मुद्यावर देशातील सामान्य नागरिक, पालक आणि विद्यार्थी रस्त्यावर उतरतात, तेव्हा त्या सर्वांनाच सरसकट 'अजेंडावाले' ठरवणे ही अत्यंत धोकादायक मानसिकता आहे. सत्तेला प्रश्न विचारणे किंवा सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आंदोलन करणे हे लोकशाहीत 'नॉर्मल' मानले पाहिजे. त्यामागे असलेल्या खऱ्या अजेंड्याचा शोध घेणे आणि खऱ्या विघातकांना वठणीवर आणणे आवश्यकच आहे. पण, सरसकट सर्वांवर शिक्का मारण्याची आवश्यकता नसते. लोकशाही ही अशीच अस्वस्थ असते आणि तिच्या तशा असण्यातच तिची मातब्बरी असते. जगातील सर्वात मोठ्या लोकतांत्रिक देशात आपण राहतो. हा देश जगाला आदरणीय असलेल्या वैविध्याने नटलेला आहे. त्यामुळे स्वाभाविकच त्यात सहमती-असहमती असणार. असहमत किंवा विरोधात असलेल्या प्रत्येकाच्या कपाळावर शिक्का मारण्याची घाई करणे लोकतांत्रिक परंपरेला साजेसे नाही. अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होते तेव्हा संयम हाच उपाय असतो. संयमी संवादातून सुटू शकणार नाही, असा प्रश्नच आतापर्यंत जन्माला आलेला नाही. मात्र, काही उथळ आणि काही बाळबोध मंडळी इतिहासातील भलतेच दाखले देऊन विरोधकांना भांडवल करण्याची संधी देणारी उथळ विधाने करीत असतात. त्यांच्या त्या विधानांमुळे संवादातून समस्या सुटण्याचे मार्ग बंद होत असतात. यापूर्वीही देशात अनेकदा स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटले. अनेक मोठे घोटाळे झाले. पण म्हणून काही संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडली नाही. अशा वेळी अत्यंत संयमाने, वेगाने आणि कठोर पावले उचलून पुढील नुकसान टाळणे हे संवेदनशील सरकारचे कर्तव्य असते. ते नीटच्या पेपरफुटीबाबत योग्यरीत्या केले गेले. संवादाच्या आघाडीवरही सरकारला अधिक वेगाने काम करता आले असते. आंदोलनाची घोषणा होताच संवादाची प्रक्रिया सुरू व्हायला हवी होती. ते झाले असते तर एवढा गदारोळ झाला नसता आणि झुरळांच्या बगलबच्च्यांना चमकोगिरीची संधी मिळाली नसती. आपण आधीच्या सरकारपेक्षा वेगळे आहोत, असे काही लोक एकीकडे सांगत असतात आणि दुसरीकडे पूर्वीच्या सरकारांच्या काळातील घटनांशी वर्तमानाची तुलना करीत असतात ही विसंगती आहे. आपण वेगळे आहोत, असा आपला दावा असेल तर ते वेगळेपण दिसायलाही हवे. भारताचे दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी एक अतिशय मार्मिक विधान केले होते. ते म्हणाले होते- ''सरकारे सब समान होती हैं, फर्क चरित्र एवं संस्कार का होता है...'' अटलजींचे हे शब्द प्रत्येक सरकारने लक्षात ठेवायला हवेत. या अनुषंगाने संवादासाठी पुढाकार घेऊन आपण पूर्वीच्या सरकारपेक्षा वेगळे आहोत, हे दाखवून देण्याची संधी सरकारने गमावली आणि त्यामुळे भलत्यांनाच हिरोगिरीची संधी मिळाली, याची येथे वैषम्यासह नोंद केली पाहिजे. सरकारवर विरोधकांच्या तुलनेत अधिक जबाबदारी असते. त्यांना विचार, विवेक, लोकभावना आणि व्यवहार यांची सांगड घालावी लागते. विरोधकांवर तशी फार काही जबाबदारी नसते. सरकारने सदैव सावध असायला हवे. लोकशाही केवळ बहुमताच्या किंवा प्रशासकीय अधिकारांच्या जोरावर चालत नसते. ती विश्वासाच्या धाग्यावर आणि संवादाच्या चाकांवर चालते. सत्ता आणि विरोध ही लोकशाहीच्या एका रथाची दोन चाके आहेत. पंतप्रधान मोदी यांनी नीटच्या पेपरफुटीच्या अनुषंगाने जाहीर वक्तव्य करून विद्यार्थ्यांना आश्वस्त केले. पण, संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी प्रतिबंधक उपाय म्हणून काय केले, हा प्रश्न उरतोच. पोलिस किंवा अन्य यंत्रणा सरकारच्या अधिकारात असतात. त्यांना आंदोलन हाताळण्याची नव्हे तर कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी द्यायची असते. आंदोलन हाताळण्यासाठी सरकारच्या वतीने पुढाकार घेतला जायला हवा. ते न झाल्यामुळे कॉक्रोच उपाख्य झुरळांचे फावले. भलत्यांनाच चमकोगिरीची संधी मिळाली. आंदोलन झाले, पण फलित काय, हा प्रश्न शिल्लकच आहे. तो लवकर सुटावा आणि भविष्यात झुरळांना अशा विषयांपासून दूर ठेवण्याची काळजी घेतली जावी, एवढीच अपेक्षा आहे. ■

## तंत्रवेध

# डिजिटल आर्थिक क्रांतीतील नवे पर्व

**डॉ. दीपक शिकारपूर**

भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एकेकाळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी रांगेत उभे राहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लॅस्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते.

या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय ॲप्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता राहत नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पृष्ठभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. ग्रामीण भारतासाठीही ही सुविधा अत्यंत महत्त्वाची आहे. आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि



पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे. पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्डे सांभाळावी लागत. आता एकाच यूपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यक त्या खात्यातून थेट पैसे काढता येतात. या तंत्रज्ञानाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पर्यावरण संवर्धन. दरवर्षी कोट्यवधी प्लॅस्टिक डेबिट आणि क्रेडिट कार्डे तयार केली जातात. कार्ड्सचा वापर कमी झाल्यास प्लॅस्टिक कचऱ्यात घट होईल. पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.

विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व यूपीआय ॲप्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन यूपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करीत आहेत. कार्डलेस एटीएम ही त्याच यशस्वी प्रवासातील पुढची पायरी आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीनेही या सुविधेचे महत्त्व मोठे आहे. बँकिंग सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हे कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय असते. डिजिटल साधनांच्या मदतीने नागरिकांना अधिक सक्षम करणे आणि त्यांना वित्तीय प्रणालीशी जोडणे हे या तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ झाले आहे. गावातील शेतकरी, छोटा व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला याचा थेट लाभ होऊ शकतो.

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, आवाजावर आधारित सेवा आणि प्रादेशिक भाषांमधील संवाद यांचा वापर वाढल्यास कार्डलेस एटीएम आणखी लोकाभिमुख होतील. एखाद्या दिवशी ग्राहकाला एटीएमसमोर उभे राहून आपल्या मातृभाषेत सूचना ऐकून किंवा बोलून व्यवहार पूर्ण करता येईल. अशा प्रकारे तंत्रज्ञान अधिक मानवी आणि सर्वसमावेशक बनत जाईल. तथापि, या सुविधेचा वापर करताना काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. मोबाईल सुरक्षित ठेवणे, यूपीआय पासवर्ड कोणालाही न सांगणे, अनोळखी व्यक्तींच्या मदतीवर अवलंबून न राहणे आणि व्यवहार पूर्ण झाल्यानंतर सूचना तपासणे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. तंत्रज्ञान जितके प्रगत होते तितकी जागरूकताही आवश्यक असते. एकंदरीत पाहता, कार्डलेस एटीएम ही केवळ पैसे काढण्याची नवी पद्धत नाही, तर भारताच्या डिजिटल परिवर्तनाचे प्रभावी प्रतीक आहे. यामुळे बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित, सुलभ, पर्यावरणपूरक आणि सर्वसमावेशक होत आहेत. जगाला डिजिटल पेमेंटची दिशा दाखवणाऱ्या भारताने आता रोख रक्कम वितरणाच्या क्षेत्रातही नवा मानदंड निर्माण केला आहे. डिजिटल भारताच्या प्रवासात कार्डलेस एटीएम हे सामान्य नागरिकाला तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी आणणारे पाऊल असून आर्थिक सक्षमीकरणाला नवी गती देते. आगामी काळात ही सुविधा भारतातील प्रत्येक गाव, प्रत्येक शहर आणि प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनेल, यात कोणतीही शंका नाही. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# सहज मिळतेय, पण सांभाळून!

सहज मिळत असेल आणि वारंवार एखाद्या गोष्टीसाठी पिच्छा पुरविला जात असेल तर मानवी स्वभावच असा आहे की, तो बळी पडतोच! मात्र, नंतर यातून वाट्याला येणारा मनःस्ताप वैताग आणणाराच नव्हे, तर का ही दुर्बुद्धी सुचली, अशा मानसिकतेत माणसाला नेणारा असतो. खाजगी फायनान्स कंपन्या, डिजिटल कर्ज देणारे ॲप्स यांच्याकडून सहज उपलब्ध होणारे कर्ज तेव्हा समाधान देणारे असते; मात्र नंतर होणारी 'पठाणी' वसुली अवघड जागेचे दुखणे म्हणूनच सहन करावे लागते. तेव्हा कळतं सहज मिळणाऱ्या गोष्टीत समाधान नसतं म्हणून!

'कर्ज' हा प्रत्येक सामान्य माणसाच्या जगण्याचा आधार आहे. कर्ज काढून समाधानाने जगणारी अनेक कुटुंबे आपण पाहतो. मात्र अशा कुटुंबांना आधी कर्ज घेताना कमालीच्या क्लिष्ट प्रक्रियेला सामोरे जावे लागते. एक व्यवस्था या विरुद्धही आहे. जेथे अगदी सहज, कोणत्याही कागदपत्रांची फारशी खातरजमा न करता कर्ज उपलब्ध करून देण्याची सोय केली जाते आणि ते म्हणजे खाजगी फायनान्स कंपन्या व आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात तयार झालेले कर्ज देणारे डिजिटल ॲप्स! खरं तर नियम, कायद्याची बंधने सगळ्यांसाठीच आहेत. मोठमोठाल्या बँकांनाही आणि खाजगी फायनान्स कंपन्यांनासुद्धा. पण ते पाळायचे की नाही, हा ज्याचा त्याचा विषय असल्याचेच चित्र सध्या आहे.

एरवी राष्ट्रीयकृत बँकेतून कर्ज घेताना जीव मेटाकुटीस येईल एवढी चौकशी आणि कागदपत्रांची जुळवाजुळव करावी लागते; पण हा त्रास तेवढ्यापुरताच! नंतर मात्र सर्वकाही निवांत चालते. खाजगी फायनान्स कंपनीचे आणि डिजिटल ॲप्सचे जरा वेगळेच आहे. ते कर्ज घ्या म्हणून तुमचा एवढा पिच्छा पुरवितात की, जेवढं बोलणं कुटुंबातील सदस्यांसोबत होत नसेल, तेवढा संवाद कंपनीवाले आपल्याशी करतात. वेळ-काळाचे भान नाही. रात्री १० वाजो की ११ त्यांचे फोन येणार! मॅसेज तर सांगूच नका... अतिरेक म्हणजे आपण कोणत्याही प्रकारचा कर्जासाठी 'अर्ज' केला नसेल तर तो 'अप्रुव्ह' म्हणजेच मान्य झाल्याचे मॅसेज करून कंपन्या मोकळ्या होतात. अनेक नावाजलेल्या फायनान्स कंपन्यांही याच पद्धतीने वागतात. बरेचदा पाठपुराव्यासाठी दाखविल्या जाणाऱ्या सततच्या जाहिरातींना प्रभावित होऊन अनेक जण बळी पडतात आणि 'कर्जबाजारी' होतात.

आणि एकदा का आपण कर्ज घेतलं की, खाजगी कंपन्यांची भाषा आणि व्यवहार बदलतात. ही कोणत्याही एका नव्हे, तर सर्व कंपन्यांची रीत आहे. कुणाचे सुख-दुःख यांना कळत नाही की दिवस-रात्रीचे भान राहत नाही. सुटीचे आणि कामाच्या दिवसांचाही यांना विसर पडतो. त्यांना केवळ अगदी सहजतेने कर्ज म्हणून दिलेले पैसे 'वसुली' करण्याची धुंद चढलेली असते. त्यावेळी कळते अगदी सहज मिळालेल्या गोष्टी चिरकाल समाधान देऊ शकत नाही, हे नक्की!

आज अशा खाजगी फायनान्स कंपन्यांचे जाळे प्रचंड वाढले आहे. सहज मिळणाऱ्या कर्जाच्या भानगडीत आम्ही स्वतःच स्वतःची फसवणूक करून घेत आहोत. डिजिटल कर्ज ॲपच्या माध्यमातून युवा पिढी आपले लहान-मोठे खर्च भागविण्याच्या विचाराने याला बळी पडून नंतर प्रचंड मनःस्तापाचा बळी ठरताना दिसत आहेत. यातून डिजिटल गुन्हेगारीही वाढत चालली आहे. पठाणी वसुलीसाठी अगदी सर्व मर्यादा ओलांडण्याचे प्रकार डोळ्यादेखत घडत असूनही यावर अंकुश कुणाचा हा प्रश्न कायम असेल तर मात्र क्षणिक समाधानात तथ्य काय, असाच प्रश्न पडतो.

नियम मोठ्या पतपेढ्यांना आहेत, तसेच याही संस्थांना आहेत. सकाळी ८ ते संध्याकाळी ७ पर्यंतच फोन किंवा भेटून वसुलीसाठी संपर्क करावा, असे आहे. पूर्वसूचना देऊनच कर्जदाराकडे जाण्याचे निर्देश आहेत. धमक्या किंवा शिवीगाळ करून वसुली करू नये, अशा रिझर्व्ह बँकेच्या सूचना असतानाही त्या पाळल्या जात नाहीत, हे वास्तव आहे. कर्ज वसुलीसाठी घरावर आलेला फायनान्स कंपनीचा माणूस अनेकदा अपमानजक वागणूक देऊन जातो. अशावेळी ते सुरुवातीचे क्षणिक समाधान नकोसे वाटते. आज सहज कर्ज उपलब्ध होण्याच्या नादात आम्ही अशा कंपन्यांच्या 'मार्केटिंग' कौशल्याचे बळी ठरतो आणि समाधान गमावून बसतो. एकाला अनुभव येऊनही जर शेजारचा त्याच मार्गाने जाणार असेल तर सहज उपलब्ध होत असल्याने ते स्वीकारण्याची मानसिकता बदलावी लागणार आहे. नाहीतर हे रडगाणे न संपणारे असेच असेल! ■

९७६३७१३४१७

## दिल्ली वार्तापत्र

# काँग्रेसचे आत्मघातकी पाऊल

**श्यामकांत जहागीरदार**

नीट परीक्षेतील गैरव्यवहार आणि आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ राजधानी दिल्लीत एकाच वेळी दोन आघाड्यांवर आंदोलन सुरू आहे. आंदोलनाची पहिली आघाडी ही जंतरमंतरची आहे. याठिकाणी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी अभिजित दीपके यांच्या नेतृत्वातील कॉक्रोच जनता पार्टीतर्फे आंदोलन सुरू आहे. आंदोलनाची दुसरी आघाडी मंगळवारी काँग्रेसने उघडली.

लडाखमधील पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक जंतरमंतरवरील आंदोलनात उतरल्यानंतर आणि त्यांनी बेमुदत उपोषण सुरू केल्यानंतर आंदोलनाचे गांभीर्य काही प्रमाणात वाढले. सुरुवातीला काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनीही या आंदोलनाची पाहिजे तशी दखल घेतली नाही. बेमुदत उपोषणाचे तीन आठवडे उलटून गेल्यानंतर वांगचुक यांची प्रकृती खालावू लागली, त्यामुळे दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाने आणि वैद्यकीय सल्ल्याने पोलिसांनी वांगचुक यांना सफदरजंग रुग्णालयात हलवले.

मानवीय भूमिकेतून पोलिसांची ही कारवाई योग्य अशीच म्हणावी लागेल. पण स्वतःला वांगचुक यांचे हितचिंतक म्हणवणाऱ्या पण प्रत्यक्षात त्यांचे हितचिंतक नसणाऱ्या राजकीय पक्षांच्या लोकांनी आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या या कारवाईवर आक्षेप घेतला. बळाचा वापर करत पोलिसांनी वांगचुक यांना रुग्णालयात दाखल केले, असा या लोकांचा आरोप होता. उपोषण करताना वांगचुक यांनी आपले प्राण गमवावे, असे तर त्यांच्या कथित समर्थकांना अपेक्षित नव्हते, असा प्रश्न यातून पडतो.

सोनम वांगचुक यांना रुग्णालयात हलवल्यानंतर त्यांच्या जागेवर कॉक्रोच जनता पार्टीचे नेते दीपके उपोषणाला बसले. पण बेमुदत उपोषण करणे हे रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याइतके सोप नसल्याचे त्यांच्या लक्षात आले, त्यामुळे अडीच दिवसातच त्यांनी आपले उपोषण गुंडाळले. राहुल गांधी यांना दुसऱ्या कोणत्याही शत्रूची गरज नाही, तेच स्वतःचे सर्वांत मोठे शत्रू असल्याचे विधान दीपके यांनी केले होते. यामुळे राहुल गांधी आणि काँग्रेस कार्यकर्ते नाराज झाले आणि त्यांनी या आंदोलनापासून स्वतःला दूर ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळेच वांगचुक बेमुदत उपोषणाला बसले असतानाही राहुल गांधी त्यांना भेटायला गेले नाहीत. एका जुन्या घटनेचा व्हिडीओ समोर आल्यानंतर सोनिया गांधींच्या पुढाकारानंतर काँग्रेसने पवन खेरा यांना जंतरमंतरवर सोनम वांगचुक यांच्या भेटीसाठी पाठवले.

मुळात काँग्रेस दीपकेंकडे राहुल गांधींचा मुख्य राजकीय प्रतिस्पर्धी म्हणून पाहू लागली होती, असे वाटते.दीपके जेवढे मोठे होतील, तेवढे राजकारणातील राहुल गांधींच्या स्थानाला धक्का बसेल, असे काँग्रेसला वाटू लागले. त्यामुळे या मुद्यावर नेमकी कोणती भूमिका घ्यावी, हे काँग्रेस नेत्यांना समजत नव्हते. सोमवारी आंदोलक विद्यार्थ्यांच्या संसद मार्चला जो प्रतिसाद मिळाला, तो पाहून काँग्रेस नेत्यांच्या तोंडचे पाणी पळाले. सोमवारी दिवसभर देशातील सर्व माध्यमात या आंदोलनाची चर्चा होती. अशा परिस्थितीत राहुल गांधींचे काय, असा प्रश्न काँग्रेसला पडू लागला. यातूनच तरुणांचे हे आंदोलन हायजॅक करण्याचा विचार काँग्रेस नेत्यांच्या मनात आला. त्यातूनच ७ लोककल्याण मार्ग या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानासमोर धरणे देण्याची कल्पना पुढे आली. या योजनेचा सुगावा दिल्ली पोलिस आणि गुप्तचर संस्थांना लागला नाही, ही वस्तुस्थिती होती. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियांका वढेरा, वेणुगोपाल, काँग्रेसचे खासदार आणि अन्य नेते मोर्चाने ७ लोककल्याण मार्ग या पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर पोहाचले आणि त्यांनी धरणे आंदोलन सुरू केले.

पंतप्रधानांच्या निवासस्थानाचा परिसर हा अतिसंवेदनशील भाग असतो. त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे आंदोलन करू नये, हा संकेत आहे. तुम्हाला आंदोलनच करायचे असेल तर दिल्लीत अनेक ठिकाणी करता येते. जंतरमंतर तर आंदोलनासाठी राखीव क्षेत्र आहे. संसद भवन परिसरातही तुम्ही धरण्यावर बसू शकता. काँग्रेस नेते आणि कार्यकर्त्यांपासून पंतप्रधानांच्या जिवाला धोका पोहोचण्याची शक्यता नव्हती, पण या आंदोलनात काही असामाजिक तत्त्व घुसले असते, तर कोणता अनुचित प्रसंग घडला असता, याची कल्पना करता येत नाही. अगदी आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीहल्ला करावा लागला असता, अश्रुधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या असता, तर काय बिकट प्रसंग ओढवला असता, याची कल्पनाही करवत नाही.

भाजपा विरोधी पक्षात असताना त्याने सरकारविरुद्ध अनेक आंदोलने केलीत, पण पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर कधीही आंदोलन केले नाही. जे पथ्य आणि संकेत विरोधी पक्षात असताना भाजपा पाळत होती, तेच पथ्य आणि संकेत काँग्रेसनेही पाळले पाहिजे. राहुल गांधी नादान असतील, पण सोनिया गांधी आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी हे भान ठेवायला पाहिजे होते. खडगे राजकारणातील सर्वांत ज्येष्ठ, संयमी आणि अनुभवी नेते आहेत, त्यांनाही याचे भान राहिले नाही आणि ते राहुल गांधींमागे फरफटत गेले, याचे आश्चर्य वाटते. राहुल गांधी ५६ वर्षाचे झाले तरी अजूनपर्यंत स्वतःला युवा समजतात, त्यामुळे त्यांच्या वागण्यातही अनेकदा बालिशपणा दिसून येतो. पण खडगे तुम्हीसुद्धा.. असे म्हणावे वाटते. मोदी सरकार आणि दिल्ली पोलिसांनी संयमाने परिस्थिती हाताळली म्हणून बरे झाले.

सरकारने राहुल गांधींशी चर्चा करण्यासाठी, त्यांना समजवण्यासाठी केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांना पाठवले, पण राहुल गांधी ऐकायला तयार नव्हते. राजकीय नेत्यांनी आपल्या शब्दावर कायम राहायला पाहिजे, संसदेत विद्यार्थ्यांच्या मुद्यावर चर्चा घडवावी, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली. गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा करून सरकार संसदेत चर्चा करायला तयार असल्याचे आश्वासन डॉ. जितेंद्रसिंह यांनी त्यांना दिले. सरकारच्या या आश्वासनानंतर राहुल गांधी यांनी आपले धरणे आंदोलन मागे घ्यायला पाहिजे होते, पण त्यांनी तसे केले नाही. देशातील जनतेचा राहुल गांधींवर विश्वास नाही, याचे कारण हेच आहे. तुम्ही सरकारसमोर एक मागणी ठेवली आणि सरकारने तुमची मागणी मान्य केली तर तुम्ही आपले आंदोलन मागे घ्यायला पाहिजे होते, राजकीय शहाणपणा यातच असतो. पण राजकीय शहाणपणा आणि राहुल गांधी यांचा दूरदूरपर्यंत काही संबंध आहे, असे मंगळवारच्या घटनेवरून तरी वाटले नाही. पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर धरणे आंदोलन करून राहुल गांधी यांनी देशातील कॅमेऱ्यांचा झोत काही तासासाठी स्वतःकडे वळवत प्रसिद्धी मिळवली असली, तरी यातून त्यांनी आपले कायमस्वरूपी नुकसान करून घेतले आहे. अराजकतावादी नेता असे त्यांना म्हटले जात होते, पण मंगळवारच्या घटनाक्रमाने त्यांनी स्वतःच यावर शिक्कामोर्तब करून घेतले. 'विनाशकाले विपरीत बुद्धी' यापेक्षा यावर आपण जास्त तरी काय म्हणणार? ■

९८८१७१७८१७

## मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यात तथ्य

'फेसलेस आंदोलनातून अराजकता माजवण्याचा प्रयत्न : मुख्यमंत्री' ही बातमी तरुण भारतात वाचली. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्यात तथ्य आहे. या 'विद्यार्थी' आंदोलनामुळे काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. पेपरफूट भारतात प्रथमच झाली आहे का? काँग्रेस काळात किती वेळा पेपरफूट झाली होती आणि प्रत्येक वेळी तत्कालीन काँग्रेस/आघाडी सरकारने कधी जबाबदारी स्वीकारली? हे आंदोलन आणि नंतरचा हिंसाचार पूर्वनियोजित होता का? भारताच्या विकासाच्या आड येणाऱ्या देशाबाहेरील काही हितशत्रूंनी, भारतातील विरोधी पक्षांशी संगनमत करून भारतविरोधी कारस्थान केले आहे का? या आंदोलनाचा फायदा घेऊन कोणीतरी, भारतात अराजकता, हिंसाचार पसरवून, भारताचा नेपाळ आणि बांगलादेश करण्याचा डाव आखला होता का? २००७ मध्ये केंद्रात आघाडी सरकार असताना सोनम वांगचुकना लेह पोलिसांनी विदेशी फंड घेण्याबद्दल नोटीस बजावली होती का?

सोनम वांगचुक, अभिजित दीपके आणि त्याचे आम आदमी पार्टी तसेच अमेरिका कनेक्शन काय आहे? दीपके कोण आहे आणि आताच त्याला भारतात येऊन आंदोलन करण्याची तातडी का भासली? त्याला अमेरिकेतून भारतात कोणी बोलावले? त्याचा खर्च कोण करत आहे? या आंदोलनासाठी अर्थपुरवठा कोण करत होते?

महत्त्वाचे म्हणजे दिल्लीतील यूएस दूतावासाने दिल्लीत २० जुलै रोजी होऊ घातलेल्या हिंसक आंदोलनावर १७ जुलैलाच 'एडव्हायजरी' प्रसिद्ध कशी केली? शांततापूर्ण असलेल्या आंदोलनाला, संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होणाऱ्या दिवशीच, २० जुलैला हिंसक वळण का लागले? तेथे ट्रक भरून दगड कोणी आणि कसे आणले? जंतरमंतरवर आंदोलनस्थळी जायचे सोडून राहुल गांधींनी पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर अचानक धरणे आंदोलन का केले? हे आंदोलन 'चालवण्यात' आम आदमी पक्षाचा नक्की उद्देश काय आहे? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्याचा अधिकार जनतेला आहे. तेव्हा केंद्र सरकारने या आंदोलनाशी परोक्ष किंवा अपरोक्ष संबंध असलेल्या सगळ्यांची कसून चौकशी करून दोषींना न्यायालयात उभे केले पाहिजे.

**शिवराम वैद्य**/पुणे. ९८५०५१८०१८

## वाचक पत्रे

### अंधारातून प्रकाशाकडे नेणारे गुरुतत्त्व!

यावर्षी गुरुपौर्णिमा महोत्सव २९ जुलैला आहे. गुरुपौर्णिमा हा शिष्यासाठी सर्वांत मोठा सण आहे. ज्या गुरूंनी आपल्याला अंधारातून प्रकाशाकडे नेले, मोक्षाचा मार्ग दाखवला आणि आपला हात धरून आपल्याला सन्मार्ग दाखवला, त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असतो. यादिवशी आपण गुरू-शिष्य परंपरेचे जनक असलेल्या आदि गुरू महर्षी व्यास यांचे पूजन करतो. त्यामुळेच गुरुपौर्णिमेला 'व्यास पौर्णिमा', असेही म्हणतात.

जीवनात प्रत्येक क्षेत्रात गुरू हवा असतो. आध्यात्मिक प्रगतीसाठी अनेक जण अध्यात्मातील थोर व्यक्तीला गुरू मानतात आणि त्यांच्याकडून गुरुमंत्र घेऊन साधनेला प्रारंभ करतात. शालेय शिक्षक, तसेच सृष्टीतील सजीव-निर्जीव



वस्तूंकडूनही आपण बरेच काही शिकू शकतो. झाडे त्यांचे काम निःस्वार्थीपणे करत असतात. त्यांच्याकडून निःस्वार्थपणा शिकू शकतो. मुंग्या एकजूट होऊन काम करीत असतात. त्यांच्याकडून संघटितपणा शिकू शकतो. गुरू ही एक आध्यात्मिक शक्ती आहे. त्यामुळे गुरू हा केवळ गुरुमंत्र देऊन साधना करून घेणाराच नसावा, तर तो निःस्वार्थी, योग्य मार्ग दाखवणारा, त्याच्या शिष्यांना भावसागरातून तारणारा, संकटमुक्त करणारा आणि शेवटी शिष्याला जीवनमुक्त करणारा असावा. गुरू असेल, तरच शिष्य घडतो आणि शिष्य घडला की, समाज घडतो. त्यामुळेच गुरुपौर्णिमा या पवित्र दिवशी आपण आपल्या सर्व गुरूंना मनापासून वंदन करूया.

**राधा प्रमोद पिंपळापुरे**/उमरेड

### लोकसभा की क्रोध सभागृह?

लोकशाहीमध्ये राज्यसभा आणि लोकसभा ही दोन महत्त्वाची सभागृहे आहेत. परंतु लोकसभा, विरोधी पक्षांनी क्रोध सभागृह करून टाकले आहे. लोकांच्या, देशाच्या हितासाठी विचारविनिमय शांतता राखून करण्यासाठी ते निर्माण झाले परंतु विरोधी पक्षांनी या सभागृहाचे युद्धभूमीत रूपांतर करून टाकले. विरोधी पक्षाने या सभागृहाचे पावित्र्य भंग करून लोकशाहीचा अपमान केला आहे. ज्यानी भारतात संविधानाची निर्मिती केली त्याचाही अपमान विरोधी पक्ष करीत आहे, असे चित्र समोर दिसत आहे. जेथे लोकांच्या हिताचे निर्णय होतात, तेथे तरी नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे. पण विरोधी पक्ष आज स्वतःची जबाबदारी विसरल्यासारखा वागत आहे. राज्यसभा आणि लोकसभेचे पावित्र्य कायम राहावे, हीच अपेक्षा. ■

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# भूमी व मालमत्ता विभागाची गाळे सील मोहीम सुरूच

### थकबाकीपोटी पथकाने केले ४ गाळे सील

### महापालिकेच्या ६ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी हजाराचा दंड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ जुलै-**

सोलापूर : महापालिकेच्या मालकीच्या गाळ्यांच्या थकबाकीदारांविरोधात सोलापूर महापालिकेने कारवाईचा बडगा उगारला असून थकीत भाडे न भरल्यामुळे ४ गाळे सील करण्यात आले. तसेच लॅन्ड फीच्या पथकाने एकही गाळा सिल न केल्याने संपूर्ण पथकातील ६ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी एक हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

महापालिकेने गाळेधारकांसाठी ६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत अभय योजना-२०२६ लागू केली आहे. या योजनेत मेजर व मिनी गाळेधारक, खुली जागाधारक, अधिकृत खोकेधारक, बीओटी गाळेधारक, १५६ गाळेधारक तसेच टी.पी. ३/२३ अंतर्गत येणारे भाडेकरू यांना मार्च २०२६ अखेरची संपूर्ण थकबाकी आणि २०२६-२७ च्या सहामाहीचे भाडे एकरकमी भरल्यास १०० टक्के दंड व व्याज माफी मिळणार आहे.

महापालिका गाळे धारकांसाठी अभय योजना लागू करण्यात आली मात्र अद्यापही अनेक गाळेधारक थकबाकी भरत नसल्याचे दिसून येते. यामुळे भूमी मालमत्ता विभागाकडून गाळा सील करण्याची कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार सहाय्यक आयुक्त विनोद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली गाळे सील करण्याची मोहीम सुरू आहे. या मोहिमेंतर्गतच विविध ठिकाणचे चार गाळे सील केले आहेत. मंगळवारी थकबाकी पोटी २ मिनी गाळे व २ मेजर गाळे सिल केले असून लॅन्ड फी चे पथकाने एकही गाळा सिल न केल्याने संपूर्ण पथकातील ६ कर्मचारी यांना प्रत्येकी १ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे

दरम्यान, सोलापूर महापालिकेचे एकूण ७२६ मेजर गाळे असून त्यापैकी १६४ गाळेधारकांकडे थकबाकी आहे. महापालिकेच्या एकूण ६५६ मिनी गाळ्यांपैकी १५२ गाळेधारक हे थकबाकीदार आहेत. मिनी आणि मेजर असे दोन्ही मिळून एकूण १,३८३ गाळ्यांपैकी ३१६ गाळे धारकांकडे मोठी थकबाकी आहे. तसेच महापालिकेच्या एकूण ३८० खुल्या जागा आहेत. त्यापैकी २६७ जणांकडे लँड फीची मोठ्या प्रमाणात थकबाकी आढळून येत आहे.

महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते व संबंधित समिती अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना राबविण्यात येत आहे. भाड्यासह एसजीएसटी व सीजीएसटीची रक्कम ३१ जुलैपूर्वी भरल्यासच या सवलतीचा लाभ मिळणार आहे. मुदत संपल्यानंतर कोणतीही सवलत दिली जाणार नसल्याने सर्व संबंधितांनी वेळेत थकबाकी भरून योजनेचा लाभ घेऊन कटू कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी केले आहे.

## कोयत्याचा धाक दाखवून मित्रांना लुबाडले; २ लाखांचा ऐवज लुटला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ जुलै-**

लघुशंकेसाठी थांबलेल्या तिघा मित्रांना १० अज्ञात दरोडेखोरांनी कोयत्याचा धाक दाखवून बेदम मारहाण केली आणि तब्बल २ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज बळकावून पोबारा केला. दरोड्याची घटना विजापूर रोडवरील हॉटेल निशालगगत असलेल्या मोकळ्या मैदानात रविवार १९ जुलै पहाटे २ ते २.१५ वाजेच्या सुमारास घडली. मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या या दरोड्यामुळे विजापूर रोड परिसरातील नागरिक व वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान या प्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत संजय केरबा भडंगे (वय ४८, रा. आंबेडकर नगर, अय्यंगार बेकरीच्या मागे, विजापूर रोड, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. रविवारी पहाटे यातील फिर्यादी संजय भडंगे व त्यांचे मित्र रात्रीच्या सुमारास विजापूर रोडवरील हॉटेल निशालगगत असलेल्या मोकळ्या मैदानात स्ट्रीट लाईटच्या उजेडात थांबले होते. याच दरम्यान ५ वेगवेगळ्या मोटारसायकल्सवरून आलेल्या तब्बल १० अनोळखी इसमांनी अचानक त्यांच्यावर हल्ला केला. आरोपींपैकी काहींच्या हातात कोयते होते. कोयत्याचा धाक दाखवून त्यांना जीवे मारण्याची भीती घालण्यात आली. फिर्यादी आणि त्यांच्या मित्रांनी या लुटीला विरोध करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी त्यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली आणि त्यांच्याकडील रोख रकमेसह सोन्याचे दागिने मिळून २ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज लुटून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहे.

## डंपरची घराला धडक; तीन जण थोडक्यात बचावले

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.२२ जुलै-**

उमरड (ता.करमाळा) येथे कुंभेजफाटा ते करपडीफाटा रस्त्यावर रात्री अकराच्या सुमारास एक भीषण दुर्घटना घडली. सिमेंट कॉँक्रीट मटेरियल घेऊन जाणारा एक भरधाव डंपर रस्त्याशेजारी असलेल्या विजय सोनवणे यांच्या घरात थेट घुसला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, घराचे नुकसान झाले. देशमुख कंपनीचा डंपर कामानिमित्त या मार्गावरून जात होता. उमरड गावानजीक रोडवर तीव्र उतार असल्याने रात्री अकराच्या सुमारास चालकाचा डंपरवरील ताबा सुटला. हा डंपर थेट विजय सोनवणे यांच्या घरावर जाऊन धडकला व पलटी झाला. अपघात झाला तेव्हा सोनवणे कुटुंबातील तीन सदस्य घरात होते. डंपरचा वेग प्रचंड असल्याने मोठा आवाज झाला, मात्र घरातील तिन्ही जण थोडक्यात बचावले. या भीषण धडकेमुळे सोनवणे यांच्या घराचे शटर तुटले असून भिंतींना तडे गेले आहेत. डंपरमध्ये असलेले सिमेंट, वाळू आणि खडीचे मिश्रण संपूर्ण घरात पसरले आहे.



## ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने 'भाऊ चषक' क्रिकेट स्पर्धा सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

ईच्छा भगवंताची बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच प्रभाग क्र.२२चे भाजप नगरसेवक किसनभाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'भाऊ चषक' भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेस सुरवात झाली. नेहरूनगर येथील शासकीय क्रीडांगणावर २२ ते २५ जुलैदरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत १६ संघातील २५० खेळाडू सहभागी होत आहेत. स्पर्धेतील प्रथम तीन संघास ४६,२३ व ११ हजार व ट्रॉफी देण्यात येणार असून, मॅन ऑफ द मॅच, मॅन ऑफ द सिरीज व मालिकावीर असे वैयक्तिक पुरस्कारही प्रदान करण्यात येणार आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन बुधवारी महापौर विनायक कोंडयाल व सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्या हस्ते झाले. यावेळी नगरसेवक किसन जाधव, नगरसेविका चैत्राली शिवराज गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, चेतन नागेशअण्णा गायकवाड, प्रेम गायकवाड व कार्तिक जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांचे स्वागत नगरसेवक किसन जाधव यांनी केले. याप्रसंगी महापौर विनायक कोंडयाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नगरसेवक किसनभाऊ जाधव यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत, अशा स्पर्धांमुळे युवकांना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध होत असल्याचे सांगितले. सभागृह नेते नरेंद्र काळे यांनीही स्पर्धेचे कौतुक करत युवकांनी क्रीडाक्षेत्रात मोठी भरारी घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. नगरसेवक किसन जाधव म्हणाले, 'भाऊ चषक' टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा उद्देश केवळ सामने आयोजित करणे नसून, टेनिस क्रिकेटला जागतिक दर्जाची ओळख मिळावी आणि येथील खेळाडूंना मोठ्या व्यासपीठापर्यंत पोहोचण्याची संधी मिळावी, यासाठीचा हा छोटासा प्रयत्न आहे.

## रोटरी क्लब ऑफ अक्कलकोटच्या नूतन कार्यकारिणीचे २६ जुलैला पदग्रहण

**अक्कलकोट, दि. २२ जुलै-**

रोटरी क्लब ऑफ अक्कलकोट यांच्या २०२६-२७ या वर्षासाठी नवनिर्वाचित नुतन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभाचे रविवार २६ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता होईल. या वर्षासाठी संजीवकुमार किरनळ्ळी अध्यक्षपदी, डॉ. प्रमोद सुतार सचिवपदी आणि सागर हळगोदे यांची कोषाध्यक्षपदी निवड झाली. हा पदग्रहण सोहळा येथील श्रीमंत कांतामती भोसले मंगल कार्यालय, मैंदर्गी रोड येथे संपन्न होणार आहे.

**भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर**
**ICAR - National Research Centre On Pomegrante**
(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

### Auction Notice

Public auction of **Green Cavendish Bananas (Appx. Qty. 45000 Kg)** will be held at ICAR-NRCP, Solapur on **27/07/2026** at 11:30 AM on as is where is basis. For more details please visit our website nrcpomegranate.in.

**Sd/-**
**SENIOR ADMINISTRATIVE OFFICER**

## पावसाच्या लहरीपणामुळे बळीराजाने आपत्कालीन पीक नियोजनावर भर द्यावा

### डॉ. नितीनकुमार रणशूर यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**



पावसाचे बदलते स्वरूप लक्षात घेता प्रतिकूल हवामानावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी 'आपत्कालीन पीक नियोजना'वर भर द्यावा, असा सल्ला अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प तथा सहयोगी संशोधन संचालक, विभागीय कृषी संशोधन केंद्र सोलापूरचे डॉ. नितीनकुमार रणशूर यांनी दिला आहे. महाराष्ट्रात जुलैच्या दुसऱ्या पंधरवड्यात (पाऊस ६ आठवडे उशिरा) पाऊस झाल्यामुळे पारंपरिक पिके न घेता जमिनीच्या प्रकारानुसार पर्यायी व कमी कालावधीच्या पिकांची निवड करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



डॉ. नितीनकुमार रणशूर, प्रमुख शास्त्रज्ञ, महाराष्ट्रात साधारणपणे या पावसाची परिस्थिती उद्‌भवू शकतात.

यामध्ये मान्सूनचे लवकर आगमन होणे, मोसमी पावसाची सामान्य सुरुवात तद्नंतर लगेच दीर्घकाळ कोरडा कालावधी, मान्सूनचे उशीरा आगमन, मोसमी पावसाची लवकर समाप्ती, विस्तारित पावसाळा, अतिवृष्टी यामुळे आता आपत्कालीन पीक नियोजनावर भर देणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील बऱ्याच भागात जुलैच्या दुसऱ्या पंधरवड्यात पाऊस झाल्याने आप्तकालीन पीक नियोजन करणे गरजेचे आहे. पीक नियोजन करताना पारंपारिक पिके न घेता पर्यायी पीक घेणे गरजेचे आहे आहे. त्याच बरोबर जमिनीच्या खोलीनुसार पीक घेणे हे देखील आवश्यक आहे

जुलै चा दुसरा पंधरवड्यात खरीप पिकांची पेरणी करताना जमिनीत पुरेसा ओलावा (किमान ८० ते १०० मि.मी. पाऊस पडल्यानंतर) असणे आवश्यक आहे. कमी कालावधीत येणारी पिके निवडावीत आणि दुबार पेरणीचे संकट टाळण्यासाठी कोरडवाहू शेतीचे योग्य नियोजन करावे. जुलै चा दुसऱ्या पंधरवड्यात खरीप पिकांची लागवड करताना महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीच्या तज्ञांनी तयार केलेल्या खालील महत्वपूर्ण शिफारशीत उपाययोजना केल्यास शेतकऱ्यांचे होणारे संभाव्य नुकसान टळू शकते, असेही त्यांनी शेवटी सांगितले आहे.

**"SHRI SHIVAJI SHIKSHAN PRASARAK MANDAL, BARSHI'S"**
**SHRI SHIVAJI MAHAVIDYALAYA, BARSHI, DIST. SOLAPUR**

### Walk In Interview (Non Grant Jr. Section) 2026-2027

The Candidates are invited for walk in interview on 01/08/2026 at 11.00 am in the office of Principal, Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi, Dist. Solapur **Along with Original Testimonials and Attested Xerox Copies** for the following posts of Junior College Teachers on Contract Basis.

| Sr.No | Section/ Subject (particulars of posts) | Educational Qualification |
|---|---|---|
| A. | **Bi-Focal Jr. Level (Non Grant Section)** | |
| 1. | Computer Science subject | |
| | 1) Teacher | M.Sc.Computer Science/MCM/BE Computer with 1st Class /M.Tech Computer Science. |
| 2. | Electronics | |
| | 1) Teacher | M.Sc.Electronics/B.E. Electronics 1st Class./ M.Sc.Electronics science. |
| | 2) Instructor | DIE 1st class |
| 3. | Information Technology | |
| | 1) Teacher | MCA/MCS/M.Sc. Computer Science / M.C.M. with B.Ed. M.Sc. / M.A. / M.Com., ADCSSAA with B.Ed. |
| 4. | Fresh Water Fish Culture | |
| | 1) Teacher | M.Sc. IInd class Zoology/Fishery |
| | 2) Instructor | B.Sc. Zoology/ Fishery. |
| 5. | Crop Science | |
| | 1) Teacher | M.Sc.Agri IInd class |
| | 2) Instructor | B.Sc.Agri IInd class |
| 6. | Horticulture | |
| | 1) Teacher | M.Sc. Agri IInd class |
| | 2) Instructor | B.Sc.Agri IInd class |
| B. | **Junior College Teacher: Non-Grant** | |
| 1. | Biology | M.Sc. (Biology) - IInd Class, B.Ed. |
| 2. | Physics | M.Sc. (Physics) - IInd Class, B.Ed. |
| 3. | Chemistry | M.Sc. (Chemistry) - IInd Class, B.Ed. |

1) Experienced Candidates having higher qualification will be preferred
2) Appointments are on purely temporary basis.

| | | |
|---|---|---|
| **Dr. A.B. Shaikh** Pricipal | **Shri.N.N.Jagdale** Chairman, School Committee. | **Shri. P.T. Patil** General Secretary, Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Barshi |

Shri Shivaji Mahavidyalaya, arshi, Dist Solapur-413411

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### वित्तीय मालमत्तांचे रोखीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी कायदा (सरफेसी कायदा), २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यात अपयशी ठरल्यामुळे आणि खात्यांमध्ये अनियमितता आल्यामुळे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्जे 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. त्यांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) देणे असलेली रक्कम, जारी केलेल्या संबंधित नोटिसींनुसार खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केली आहे. सदर रक्कमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 127594407 | गृहकर्ज | १. विवेकानंद शांताराम वजाळे<br>२. विश्वजित विवेकानंद वजाळे | 09/07/2026 | INR 6,01,555.42/- |

**मालमत्तेचा पत्ता :** मौजे बोरगाव, तालुका : माळशिरस, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३११२ येथील निवासी मालमत्तेचा संपूर्ण भूखंड, एन. ए. गट क्र. ३६९, क्षेत्र ७२.००.०० आर, चौरस मीटर (७२००.०० चौरस मीटर) यापैकी विवेकानंद शांताराम वजाळे यांचे क्षेत्र १.००.०० आर, चौरस मीटर (१००.०० चौरस मीटर), ज्याची बोरगाव ग्रामपंचायत मिळकत क्र. ८६० आहे, आणि एकत्रित चतुःसीमा खालीलप्रमाणे आहे: पूर्व : सामायिक रस्ता, पश्चिम : प्लॉट क्र. १९, उत्तर : गट क्र. ३५९, दक्षिण : प्लॉट क्र. २१

याद्वारे आपणास उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह रक्कम भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ही रक्कम सदर प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत भरणे आवश्यक आहे, अन्यथा **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** देणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, अधोस्वाक्षरीकारांना वरील गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुध्द सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे भाग पडेल. याशिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये आपणास सदर सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंधित करण्यात येत आहे.

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 23/07/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**Truhome FINANCE**

### ट्रूहोम फायनान्स लिमिटेड

**(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )**

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;
**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१; **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

### मागणी सूचना

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार यांनी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात** ) कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** चे असे म्हणणे आहे की , हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत . म्हणून ह्या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम -२००२ (सरफेसी कायदा)अन्वये आणि कलम-१३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्यावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सुचने व्यतिरिक्त, त्यांना या जाहीर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे.

कलम १३(२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार , सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रकमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचना तारीख आणि देय रक्कम रु. |
|---|---|---|
| **कर्ज खाते क्रमांक (LAN) : SHLHSOLR0000539**<br>**१. श्री. शिवकुमार काशीनाथ सुतार (कर्जदार)**<br>**२. सौ. अंजली शिवकुमार सुतार (सह-कर्जदार)**<br>**सध्याचा पत्ता :अक्षय सोसायटी, घर क्र. १७६, ज्युले सोलापूर, पाण्याच्या टाकीजवळ, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर, महाराष्ट्र – ४१३००४.**<br>**तसेच : मालमत्तेचा पत्ता : मौजे कोंडी, प्लॉट क्र. ६, गट क्र. २०/२-ब/१-ब, दर्ग्याजवळ, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर – ४१३२५५.**<br>**कर्ज रक्कम : रु. २१,९३,०९२/-**<br>**एन.पी.ए. दिनांक : ०५/०७/२०२६** | मौजे कोंडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील गट क्र. २०/२/ब/१/ब मधील प्लॉट क्र. ६, विक्रीखताप्रमाणे १९३.५० चौ. मीटर क्षेत्रफळाचा तसेच ७/१२ उताऱ्यानुसार १९०.५० चौ. मीटर क्षेत्रफळाचा भूखंड व त्यावरील संपूर्ण बांधकामासह, जो सोलापूर जिल्हा परिषदेच्या हद्दीत येतो.<br>चतु:सीमा :पूर्वेस : प्लॉट क्र. ७<br>पश्चिमेस : प्लॉट क्र. ५<br>दक्षिणेस : अंतर्गत रस्ता<br>उत्तरेस : गट क्र. १८-ब | मागणी सूचना दिनांक : १५/०७/२०२६<br>मागणी सूचना रक्कम : कर्ज खाते क्रमांक SHLHSOLR0000539 अंतर्गत दिनांक ०९/०६/२०२६ रोजी देय असलेली रु. २३,२२,४९७.००/- (अक्षरी रुपये तेवीस लाख बावीस हजार चारशे सत्याण्णव फक्त), तसेच त्यावर यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज व अनुषंगिक खर्च, शुल्क इत्यादीसह. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते कि, हि नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम -१३ (१३) नुसार सादर वर्णित मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री , भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी .

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २३/०७/२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

### सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि., सोलापूर

मुख्यकार्यालय - २०५, पुर्व मंगळवार पेठ, सोलापूर - ४१३००२
फोन ०२१७-२६२६८११, २७४२९१० Email ID: ho@sssbl.bank.in

### ताबा नोटीस

**(U/s.13 (4) of SARFAESI Act read with rule 8 of the Security Interest (Enforcement) Rules, 2002)**

ज्याअर्थी सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि., सोलापूर (यानंतर ''बँक'' म्हणून संबोधले जाईल) चे प्राधिकृत अधिकारी यांनी सेक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल असेट्स अँण्ड एन्फोर्समन्ट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत कलम १३(१२) अन्वये तसेच सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट, २००२ नियम ३ अंतर्गत मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन खालील कर्जदारास व त्यांच्या जामिनदारास दिनांक ३०/०५/२०२६ रोजी सरफेसी कायदा अंतर्गत कलम १३(२) अन्वये कर्जाच्या परतफेडीसाठी मागणी नोटीस बजावली होती. संबंधित कर्जदार व जामिनदार यांना मागणी नोटीसामध्ये नमूद केल्याप्रमाणे कर्जबाकी रक्कम ६० दिवसाच्या आत परतफेड करण्याबाबत नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते.

कर्जदार व जामिनदार यांना कलम १३ (२) मागणी नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ''माझी/आमची सध्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत प्रतिकूल आणि अडचणीची असून नजीकच्या काळात, भविष्यात कर्जाची नियमित परतफेड करणे अथवा संपूर्ण थकबाकी अदा करणे शक्य होईल अशी अपेक्षा नाही. त्यामुळे बँकेने ६० दिवसांची मुदत पूर्ण होण्याची प्रतिक्षा न करता कर्जासाठीच्या तारण/गहाण स्टॉक तसेच मालमत्तांचा प्रत्यक्ष ताबा घेण्यास माझी/आमची कोणतीही हरकत नाही. मी/आम्ही कर्जासाठीच्या तारण/गहाण स्टॉक तसेच मालमत्तांचा ताबा स्वखुशीने, कोणत्याही दबाव, धमकी, प्रलोभन अथवा गैरसमजाशिवाय बँकेकडे सुपूर्द करण्यात तयार आहोत ''असे पत्र / लेखी म्हणणे दिले आहे.

कर्जदार/जामिनदार यांनी स्वेच्छेने तारण माल/तारण मिळकतींचा ताबा देवू केल्याने तसेच थकबाकीदारांनी रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, खाली सही करणार प्राधिकृत अधिकारी यांनी खालील नमूद मिळकतीचा ''प्रत्यक्ष ताबा'' घेतला आहे.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव व पत्ता | कर्ज प्रकार, खाते क्र. व कर्ज रक्कम | १३(२) मागणी नोटीस नुसार दि. ३०/०४/२०२६ अखेर व्याजासह येणेबाकी | ताबा दि. व प्रकार |
|---|---|---|---|---|
| १. | **१. संजय चंद्रकांत पुजारी (सिध्दार्थ कलेक्शन या फर्म चे प्रोप्रायटर)** (कर्जदार/तारण मिळकतदार) पत्ता - बसवनगर तेरा मैल पोस्ट मंद्रुप ता.दक्षिण सोलापूर जि. सोलापूर ४१३२१३<br>**२. सुरज अजय देशमुख** (जामीनदार) पत्ता - लॅण्डमार्क अपार्टमेंट, प्रधान रुग्णालय जवळ, ४८, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१<br>**३. चंद्रकांत आमसिध्द बाराचारे** (जामीनदार) पत्ता - मु.पो.कुंभारी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर ४१३००६<br>**४. विद्यानंद साहेबराव देशमुख** (जामीनदार) पत्ता - कुरघोट रोड, देशमुख वस्ती, मु.पो.मंद्रुप ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर ४१३२२१<br>**५. दयानंद चंद्रकांत बाराचारे** (जामीनदार) पत्ता - मु.पो.कुंभारी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर ४१३००६ | **१) हायपोथिकेशन कर्ज क्र.** 1012032000065 **कर्ज रक्कम** रु. १,५०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लाख मात्र)<br>**२) टर्म कर्ज ऑदर सिक्युरिटी क्र.** 1012031000030 **कर्ज रक्कम** रु. १,२५,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पंचवीस लाख मात्र)<br>**३) लोन अगेन्स्ट प्रॉप्रर्टी क्र.** 1012114000001 **कर्ज रक्कम** रु. ७५,००,०००/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर लाख मात्र) | १) १,५४,३२,१०९.०० (अक्षरी रुपये एक कोटी चोपन्न लाख बत्तीस हजार एकशे नऊ मात्र)<br>२) १,१८,८५,३४७.०० (अक्षरी रुपये एक कोटी अठरा लाख पंच्याऐंशी हजार तीनशे सत्तेचाळी मात्र)<br>३) ६१,२३,२१६.०० (अक्षरी रुपये एकसष्ट लाख तेवीस हजार दोनशे सोळा मात्र)<br>अधिक पुढील झाले व होणारे व्याज, अचानक होणारे खर्च, शुल्क इ. वगैरे. | २०/०७/२०२६ प्रत्यक्ष ताबा |

ज्याअर्थी, वरील कर्जदार व जामिनदार यांनी कर्ज परतफेड करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांना मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन सरफेसी कायदा कलम १३(४) आणि नियम ८ अन्वये खालील वर्णन केलेल्या तारण माल / तारण मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा (**Physical Possession**) घेतला आहे.

कर्जदार, जामिनदार व विशेषत: मिळकतधारक आणि सर्व लोकांना सावध करण्यात येते कि, खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे कोणत्याही प्रकारे व्यवहार करुन नये जर केल्यास सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि., सोलापूर शाखा मंद्रुप यांना आधीन राहाल, याची नोंद घ्यावी.

**तारण माल / मिळकतीचे वर्णन -**

अ. दुकानातील सर्वप्रकारचा हायपोथिकेटेड सर्व माल स्टॉक, बुक डेब्ट आणि सर्व करंट असेटस
(फर्म-सिध्दार्थ कलेक्शन प्रोप्रायटर संजय चंद्रकांत पुजारी पत्ता - प्लॉट नं. १३४ व १३५ बसवनगर ता. दक्षिण सोलापूर)

ब. तारण मिळकती

- रहिवासी / दुकान जागा व त्यावरील बांधकाम-डि व सब डि सोलापूर ता. दक्षिण सोलापूर मौजे बसवनगर, ग्रामपंचायत हद्दीतील जुना गट नं. (९९९) १/१, नविन गट नं. १/१, प्लॉट नं. १३४ क्षेत्र १३९.५० चौ.मी. त्यावरील बांधकामासह त्याची चतु:सिमा **पुर्वेस-रोड, पश्चिमेस-रोड, दक्षिणेस-प्लॉट नं. १३५, उत्तरेस-प्लॉट नं. १३३.**
- रहिवासी / दुकान जागा व त्यावरील बांधकाम-डि व सब डि सोलापूर ता. दक्षिण सोलापूर मौजे बसवनगर, ग्रामपंचायत हद्दीतील जुना गट नं. (९९९) १/१, नविन गट नं. १/१, प्लॉट नं. १३५ क्षेत्र १२६ चौ.मी. त्यावरील बांधकामासह त्याची चतु:सिमा **पुर्वेस-रोड, पश्चिमेस-रोड, दक्षिणेस-रोड, उत्तरेस-प्लॉट नं. १३४.**
- बिगरशेती खुले प्लॉट - डि व सब डि सोलापूर ता.दक्षिण सोलापर मौजे बसवनगर, ग्रामपंचायत हद्दीतील, गट नं. १/२अ, बिगरशेती खुले प्लॉट नं. १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१ (प्लॉट नं. १ ते २१)

(वरील सर्व मिळकती संजय चंद्रकांत पुजारी यांच्या मालकीच्या आहेत.)

**आर.बी.शर्मा**
**प्राधिकृत अधिकारी**
सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि., सोलापूर

**ही ताबा नोटीस दिली तारीख : २३/०७/२०२६**
**स्थळ - सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### गोलरक्षक गिलेर्मो ओचोआ निवृत्त

**मेक्सिको :** मेक्सिकोचा अनुभवी गोलरक्षक गिलेर्मो ओचोआ याने निवृत्ती जाहीर केली.



सहा फिफा विश्वचषक स्पर्धेत मेक्सिकोचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ओचोआने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक भावनिक व्हिडिओ शेअर करून निवृत्तीची घोषणा केली. यादरम्यान, त्याने त्याचे कुटुंब, सहकारी आणि करोडो चाहत्यांचे मनापासून आभार व्यक्त केले. आपल्या निवृत्तीची घोषणा करताना ओचोआ म्हणाला, मला कधीच वाटले नव्हते की एखादे स्वप्न मला इतक्या दूर घेऊन जाईल. आज मी अभिमानाने मागे वळून बघू शकतो आणि मला एवढेच म्हणायचे आहे - धन्यवाद. माझे कुटुंब, माझे सहकारी आणि या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर माझ्यासोबत असलेल्या प्रत्येक चाहत्याचे आभार. लाखो लोकांचे प्रेम आणि मी मेक्सिकोसाठी सर्व काही दिल्याचे समाधान घेऊन मी निघालो. आम्ही एकत्र घालवलेले क्षण कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. तुम्हा सर्वांचे मनःपूर्वक आभार. फिफा विश्वचषक स्पर्धेतील सहा संघांचा भाग होण्याचा मान मिळालेल्या निवडक खेळाडूंमध्ये गिलेर्मो ओचोआचे नाव समाविष्ट आहे.

### पदकांचा दुष्काळ संपवू : हरमनप्रीत सिंग

**नवी दिल्ली :** टोकियो ऑलिम्पिकपूर्वी जशा भावना होत्या, तशाच आताही आहेत आणि माझी तयारीही तितकीच जोरदार आहे, कारण विश्वचषकातील पाच दशकांचा पदकांचा दुष्काळ संपवणे हेच आमचे एकमेव ध्येय आहे, असे भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग म्हणाला. ४१ वर्षांनंतर २०२० च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या आणि २०२४ मध्ये पॅरिसमध्ये आपल्या कर्णधारपदाखाली त्याची पुनरावृत्ती करण्याची आशा बाळगणाऱ्या हरमनप्रीतला याची पूर्ण जाणीव आहे की, अनेक खेळाडूंसाठी विश्वचषक जिंकण्याची ही शेवटची संधी असू शकते. तो म्हणाला, ज्याप्रमाणे आम्ही ४१ वर्षांनंतर टोकियोमध्ये ऑलिम्पिक पदक जिंकले, त्याचप्रमाणे आम्हालाही ५० वर्षांचा विश्वचषकाचा दुष्काळ संपवायचा आहे. आम्ही त्याच मानसिकतेने आणि त्याच तयारीने मैदानात उतरू. पण कोणताही दबाव नाही, ही आमची जबाबदारी आहे.

### अलीरेझा फिरौजा चेन्नई ग्रॅण्डमास्टर्स विजेता

**चेन्नई :** फ्रान्सचा ग्रॅण्डमास्टर अलीरेझा फिरौजाने बुधवारी भारतीय ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगसीविरुद्ध सातवी आणि अंतिम फेरी बरोबरीत सोडवून चेन्नई ग्रॅण्डमास्टर्स २०२६ चे विजेतेपद पटकावले. स्पर्धेच्या अंतिम फेरीपूर्वी, फिरौजा ४ गुणांसह आघाडीवर होता आणि अर्जुन एरिगसी व उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव यांच्यापेक्षा अर्ध्या गुणाने पुढे होता. विजेतेपद जिंकण्यासाठी त्याला फक्त बरोबरीची गरज होती. त्याने अर्जुनविरुद्धचा सामना ४१ चालींनंतर बरोबरीत सोडवला आणि ४.५ गुणांसह विजेतेपद निश्चित केले. दुसरीकडे, काळ्या सोंगट्यांनी जिंकून विजेतेपदाच्या शर्यतीत टिकून राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोवचा रशियाच्या दिमित्री आंद्रेकिनने ३७ चालींमध्ये पराभव केला. या पराभवानंतर, फिरुझाला विजेतेपद मिळवण्यासाठी एक सामना अनिर्णीत ठेवणे पुरेसे होते.

### अव्वल फलंदाजासाठी गिलला हवा एक गुण

**नवी दिल्ली :** इंग्लंडविरुद्धच्या मालिकेनंतर बुधवारी जाहीर झालेल्या ताज्या एकदिवसीय फलंदाजी क्रमवारीत भारताचा कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार शुभमन गिल, अनुभवी फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्यासह अव्वल पाचमध्ये आहे. गिल न्यूझीलंडचा जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा फलंदाज डॅरिल मिचेलच्या अगदी जवळ पोहोचला आहे. ■

# राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आजपासून

## ३२ वर्षांतील सर्वात लहान राष्ट्रकुल स्पर्धा, भारताचे लक्ष अॅथ्लेटिक्स, वेटलिफ्टिंग आणि बॉक्सिंगवर



स्कॉटलंडमधील ग्लासगो येथील एसईसी सेंटरमध्ये ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ चा अधिकृत शुभंकर 'फिनी'

### भारताचे प्रमुख पदक दावेदार

**अॅथ्लेटिक्स :** भालाफेकीतील स्टार नीरज चोप्रा सुवर्णपदकाचा मुख्य दावेदार आहे. त्याची सर्वात मोठी स्पर्धा पाकिस्तानचा विद्यमान ऑलिम्पिक विजेता अर्शद नदीमसोबत असेल. मुरली श्रीशंकर (लांब उडी), प्रवीण चित्रवेल (तिहेरी उडी) आणि गुलवीर सिंग (लांब पल्ल्याची धाव) हे देखील पदकाचे दावेदार आहेत.

**भारोत्तोलन :** ऑलिम्पिक पदक विजेती मीराबाई चानू महिलांच्या ४८ किलो वजन गटात सुवर्णपदकासाठी एक प्रबळ दावेदार आहे. बिंदियारानी देवी आणि ज्ञानेश्वरी यादव यादेखील पदकासाठी स्पर्धेत आहेत.

**बॉक्सिंग :** ऑलिम्पिक पदक विजेती लव्हलिना बोरगोहेन आणि विश्वविजेती जस्मिन लँबोरिया संघाचे नेतृत्व करत आहेत. साक्षी चौधरी आणि प्रीती पवार यादेखील सुवर्णपदकाच्या शर्यतीत आहेत.

**इतर खेळ :** ज्युडोमधील तुलिका मान, लॉन बॉल संघ आणि पॅरा-अॅथ्लेटिक्समधील विश्वपदक विजेता सोमन राणा हे भारताच्या प्रमुख पदक दावेदारांपैकी आहेत. ■

**ग्लासगो, २२ जुलै**

फुटबॉल विश्वचषकाचा उत्साह संपल्यानंतर, भारतीय क्रीडाप्रेमींचे लक्ष आता स्कॉटलंडमध्ये २३ जुलैपासून सुरू होणाऱ्या ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेकडे लागले आहे. ग्लासगो येथे होणाऱ्या २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भारताच्या मोहिमेची सुरुवात गुरुवारी लॉन बॉल स्पर्धेने होत आहे. भारताने २०२२ च्या बर्मिंगहॅम गेम्समध्ये या खेळात एक सुवर्ण आणि एक रौप्य पदक जिंकले होते. यावेळी खेळाडूंची संख्या कमी असल्याने, भारताच्या पदकाच्या मुख्य आशा अॅथ्लेटिक्स, वेटलिफ्टिंग आणि बॉक्सिंगवर अवलंबून आहेत.

इंग्लंडमधील बर्मिंगहॅम येथे होणाऱ्या २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील २० खेळांच्या तुलनेत, ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत केवळ १० खेळांचा समावेश आहे. गेल्या ३२ वर्षांतील कोणत्याही राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत समाविष्ट असलेल्या खेळांची ही सर्वात कमी संख्या आहे. यापूर्वी १९९४ मध्ये कॅनडातील व्हिक्टोरिया येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत १० खेळांचा समावेश होता. ग्लासगो २०२६ मधील खेळांची संख्या कमी होणे हा भारतासाठी एक मोठा धक्का आहे. कारण कुस्ती, नेमबाजी, बॅडमिंटन आणि टेबल टेनिस यांसारखे अनेक प्रमुख खेळ यावेळी यादीतून वगळण्यात आले. ◂ (वृत्तसंस्था)

### येथे पाहता येईल स्पर्धा

२०२६ चे राष्ट्रकुल खेळ सोनी स्पोर्ट्स नेटवर्क आणि दूरदर्शन स्पोर्ट्सवर थेट प्रक्षेपित केले जातील. प्रेक्षक ते डीडी फ्री डिशवर देखील पाहू शकतात. खेळांचे थेट प्रक्षेपण सोनी लिव्ह अॅपवर उपलब्ध असेल. ■

# मीराबाई चानूची नजर सलग तिसऱ्या सुवर्ण पदकावर

## शेवटची स्पर्धा ४८ किलो गटात होणार

**ग्लासगो, २२ जुलै**

टोकियो ऑलिम्पिकची रौप्यपदक विजेती आणि स्टार वेटलिफ्टर मीराबाई चानू २६ जुलै रोजी ग्लासगो येथे इतिहास रचणार आहे. सलग तिसऱ्या राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्ण जिंकण्याचे चानूचे लक्ष्य असेल, जे तिचे सलग चौथे पदक असेल. तरीही तिची नजर राष्ट्रकुल स्पर्धेपेक्षा आशियाई खेळांवर जास्त आहे. बर्मिंगहॅममध्ये तयारी करत असलेल्या मीराने सांगितले की, कोणत्याही मोठ्या खेळापूर्वी खेळाडू उच्च-स्तरीय फॉर्म मिळविण्याचा प्रयत्न करतात, परंतु ती ग्लासगोमध्ये जास्त प्रयत्न करणार नाही. तिला २०० किलो वजनही उचलता येणार नाही.

मीराबाई चानू ग्लासगोमध्ये ४८ किलोमध्ये खेळणार आहे, तर एशियाडमध्ये तिला ४९ किलोमध्ये खेळायचे आहे. चानूला माहीत आहे की, ४८ किलोमध्ये ही तिची शेवटची स्पर्धा आहे. हे वजन आता ऑलिम्पिकमधून बाद झाले आहे. मीराने २०१४ मध्ये या वजनात रौप्य, २०१८ मध्ये गोल्ड कोस्टमध्ये सुवर्ण



आणि बर्मिंगहॅम कॉमनवेल्थ गेम्समध्ये ४९ किलोमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. ◂ (वृत्तसंस्था)

### भारताचे ध्वजवाहक

भारतीय ऑलिम्पिक संघटनेने संयुक्तपणे मीराबाई चानू आणि लोव्हलिना बोरगोहेन यांची भारतीय दलाच्या ध्वजवाहक म्हणून नियुक्ती केली आहे. दोन महिला खेळाडूंना ही जबाबदारी मिळणे हे भारतीय क्रीडा क्षेत्रातील महिलांच्या वाढत्या भूमिकेचे प्रतीक मानले जात आहे. ■

### राष्ट्रकुल स्पर्धेच्या समारोपात शंकर महादेवनचा सहभाग

**ग्लासगो :** गायक-संगीतकार शंकर महादेवन आणि बॉलीवूड अभिनेत्री रश्मिका मंदान्ना २ ऑगस्ट रोजी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या समारोप समारंभात भारताच्या सांस्कृतिक सादरीकरणात आकर्षणाचे केंद्र असतील. याच दिवशी अहमदाबाद येथे होणाऱ्या २०३० शताब्दी आवृत्तीचे यजमान म्हणून राष्ट्रध्वज अधिकृतपणे स्वीकारला जाईल. राष्ट्रकुल खेळांचा ध्वज औपचारिकपणे समारोप समारंभात भारताकडे सुपूर्द केला जाईल, जो पुढील यजमानाकडे जबाबदारी सोपवण्याचे प्रतीक आहे.

भारताचे सादरीकरण अंदाजे २० मिनिटे चालेल आणि २०३० च्या खेळांची झलक देणाऱ्या संगीत, नृत्य आणि पारंपरिक कामगिरीद्वारे देशाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा दर्शवेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी या समारंभाला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. ■

# भारताचा विजयाच्या मार्गावर परतण्याचा प्रयत्न

## झिम्बाब्वेविरुद्ध पहिला टी-२० सामना आज



श्रेयस अय्यर



सिकंदर रजा

### आजचा सामना

**भारत विरुद्ध झिम्बाब्वे**
**स्थळ :** हरारे स्पोर्ट्स क्लब, हरारे
**वेळ :** दुपारी ४.३० वाजतापासून
**थेट प्रक्षेपण :** युनाईट ८ स्पोर्ट्सवर

**हरारे, २२ जुलै**

तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात गुरुवारी जेव्हा तरुण भारतीय संघ आत्मविश्वासपूर्ण झिम्बाब्वेचा सामना करेल, तेव्हा कर्णधार म्हणून आपला पहिला विजय नोंदवण्यासाठी श्रेयस अय्यर उत्सुक राहणार आहे.

कर्णधार म्हणून आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्ध खेळलेल्या आपल्या पहिल्या सात टी-२० सामन्यांपैकी सहा सामने गमावलेल्या अय्यरकडे संघाला पुन्हा विजयाच्या मार्गावर आणण्याची सुवर्णसंधी आहे. झिम्बाब्वेविरुद्ध विजय अपेक्षित आहे, पण जर ते हरले, तर ड्रेसिंग रूमची अवस्था काय असेल याची केवळ कल्पनाच करता येते. यात १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीचाही समावेश आहे.

भारताने या दौऱ्यासाठी व्हीव्हीएस लक्ष्मणची प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. संजू सॅमसनला संघातून वगळण्यात आल्याने, अभिषेक शर्मासोबत डावाची सुरुवात करणाऱ्या 'वंडर बॉय' सूर्यवंशीवर पुन्हा एकदा सर्वांच्या नजरा असतील. अभिषेक आणि सूर्यवंशी यांच्या हरारे स्पोर्ट्स क्लबशी गोड आठवणी जोडलेल्या आहेत. अभिषेकने याच मैदानावर पदार्पण केले आणि दुसऱ्या सामन्यात आपले पहिले टी-२० शतक झळकावले.

सूर्यवंशीने ६ फेब्रुवारी रोजी इंग्लंडच्या १९ वर्षांखालील संघाविरुद्ध ज्युनियर विश्वचषक अंतिम सामन्यात याच मैदानावर शतक झळकावले होते. या मालिकेत एका नवीन गोलंदाजी आक्रमणाची चाचणी घेणे हे उद्दिष्ट होते, परंतु सध्याच्या खराब कामगिरीमुळे, विजय मिळवणे अनिवार्य झाले आहे.

हरारे स्पोर्ट्स क्लबची खेळपट्टी ओलसर आणि उसळणारी आहे, ज्यामुळे भारतीय फलंदाजांसमोर आव्हाने उभी राहू शकतात. ब्लेसिंग मुझारबानी आणि रिचर्ड नगारवा यांच्या वेगवान गोलंदाजी आक्रमणाचा सामना करणे भारतीय फलंदाजांसाठी कठीण असेल. उपकर्णधार तिलक वर्मा, जो टी-२० मध्ये तिसऱ्या क्रमांकावर एक चांगला फलंदाज आहे, तो पाचव्या क्रमांकावर खेळताना फारसा आरामदायक वाटत नाही, पण त्या जागेवर इशान किशनला खेळवले जात आहे. पाचव्या क्रमांकासाठी रिंकू सिंग हा एक चांगला पर्याय आहे, पण उपकर्णधाराला हटवणे सोपे नसेल. मयंक यादवसोबत प्रिन्स खेळणार हे निश्चित दिसत आहे. तिसऱ्या वेगवान गोलंदाजाची निवड अशोक आणि यश यांच्यापैकी एकाची केली जाईल. ◂ (वृत्तसंस्था)



स्कॉटलंडमधील ग्लासगो येथील एसईसी सेंटरमध्ये, २०२६ च्या ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या पृष्ठभूमीवर सराव सत्रासाठी लव्हलिना बोरगोहेन, साक्षी चौधरी, परवीन हुडा आणि इतर सदस्यांसह भारतीय बॉक्सिंग संघाचे खेळाडू दाखल झाले.

### ललित मोदी भारतात येण्याच्या तयारीत

**नवी दिल्ली :** परकीय चलन व्यवस्थापन कायद्याशी (फेमा) संबंधित २००९ च्या आयपीएल दक्षिण आफ्रिका प्रकरणात अपीलीय न्यायाधिकरणाकडून मोठा कायदेशीर दिलासा मिळाल्यानंतर मी या वर्षाच्या अखेरीस किंवा पुढील वर्षाच्या सुरुवातीला भारत दौऱ्यावर येणार आहे, असे इंडियन प्रीमियर लीगचे माजी अध्यक्ष ललित मोदी यांनी बुधवारी सांगितले. मोदींनी या निर्णयाला आपल्या १६ वर्षांच्या कायदेशीर लढाईतील विजय म्हटले आहे. सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका व्हिडीओ संदेशात मोदी म्हणाले की, न्यायाधिकरणाच्या निर्णयामुळे या प्रकरणावरील त्यांच्या भूमिकेमागील सत्य अखेर समोर आले आहे. मी या निर्णयामुळे खूप आनंदी आहे. माझ्यासाठी हा खरोखरच एक अद्भुत दिवस आहे. मी १६ वर्षे लढलो आहे आणि मी प्रसारमाध्यमे व सर्वांना जे सांगत होतो ते अखेर खरे ठरले आहे, असे ते म्हणाले. ■

# रायचंदानीचे नाबाद शतक, १९ वर्षांखालील संघाचे वर्चस्व

**कोलंबो, २२ जुलै**

सलामीवीर लक्ष्य राजेश रायचंदानीने बुधवारी मालिकेतील आपले दुसरे शतक झळकावून, श्रीलंका १९ वर्षांखालील संघाविरुद्धच्या दुसऱ्या युवा कसोटीच्या तिसऱ्या दिवशी भारतीय १९ वर्षांखालील संघाची स्थिती आणखी बळकट केली.

रायचंदानीने मालिकेतील अनिर्णीत राहिलेल्या पहिल्या सामन्यात द्विशतक झळकावले होते. त्याने ११६ चेंडूंमध्ये नाबाद १०० धावा केल्या, ज्यामुळे दिवसाच्या



सुरुवातीला यजमान संघाला १४८ धावांवर सर्वबाद केल्यानंतर भारताला आपला दुसरा डाव २०८ धावांवर तीन गडी बाद घोषित करण्यास मदत झाली.

पहिल्या डावात शतक झळकावणाऱ्या मनल चौहानने ४६ चेंडूंमध्ये नाबाद ५१ धावा केल्या. दुसऱ्या दिवशी भारतीय गोलंदाजांच्या शानदार कामगिरीनंतर, श्रीलंका १९ वर्षांखालील संघाने तिसऱ्या दिवसाची सुरुवात १२२ धावांवर आठ गडी बाद अशी केली. ४७२ धावांच्या आव्हानात्मक लक्ष्याचा पाठलाग करताना, श्रीलंकेने तिसऱ्या दिवसाचा खेळ संपताना आपल्या दुसऱ्या डावात चार गडी गमावून १५५ धावा केल्या. भारतीय १९ वर्षांखालील संघाने पहिल्या डावात ४११ धावा केल्या. ◂ (वृत्तसंस्था)

# भारताचा पाकिस्तानवर ७-४ ने शानदार विजय

## आशियाई चॅम्पियनशिपमध्ये ओमानही पराभूत

**मस्कत, २२ जुलै**

भारतीय सब-ज्युनियर मुलांच्या संघाने एफआयएच युवा हॉकी ५ एस आशियाई चॅम्पियनशिपच्या एलिट पूलमध्ये पाकिस्तान आणि ओमानला पराभूत करून आपली विजयी मालिका सुरू ठेवली. केतन कुशवाहाच्या नेतृत्वाखाली, भारताने प्रथम ओमानवर १४-० असा जबरदस्त विजय नोंदवला, ज्यामध्ये कर्णधार केतन कुशवाहने चार गोल केले. आशिष तानी पूर्तीने सलग तीन गोल केले. राहुल यादव आणि शाहरुख अली यांनी प्रत्येकी दोन गोल केले. प्रल्हाद राजभर, करण गौतम आणि रोमित पाल यांनीही गोल केले.

अन्य एका सामन्यात करण गौतमने सलग तीन गोल केल्यामुळे भारताने पाकिस्तानविरुद्ध ७-४ असा विजय मिळवला. भारताकडून राहुल



यादव, प्रल्हाद राजभर, कर्णधार कुशवाह आणि रोमित पाल यांनी गोल केले. पाकिस्तानकडून अस्लम मुहम्मद फरहान, अदील आणि उस्मान मुहम्मद यांनी गोल केले.

त्याच वेळी, भारतीय सब-ज्युनियर मुलींच्या संघाने चीनविरुद्ध २-२ अशी बरोबरी साधली होती, तर दुसऱ्या एलिट पूल सामन्यात त्यांनी उझबेकिस्तानचा १६-० असा पराभव केला. ही स्पर्धा प्रथमच एफआयएच युवा हॉकी ५ एस विश्वचषक स्पर्धेसाठी पात्रता म्हणून गणली जाणार आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# सिंधू दुसऱ्या फेरीत, आयुष शेट्टी उपांत्यपूर्व फेरीत

### चायना ओपन बॅडमिंटन स्पर्धा

**चांगझू, २२ जुलै**

दोन वेळच्या ऑलिम्पिक पदक विजेत्या पीव्ही सिंधूने जपान ओपनचे विजेतेपद पटकावल्यानंतर आपली प्रभावी कामगिरी कायम ठेवत चायना ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. युवा भारतीय बॅडमिंटनपटू आयुष शेट्टीने इंडोनेशियाच्या जागतिक क्रमवारीत ११ व्या क्रमांकावर असलेल्या अल्वी फरहानला पराभूत करून मोठा धक्का दिला आणि उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

पहिल्या फेरीत, सिंधूने भारताच्या १८ वर्षीय उन्नती हुडाला तीन गेमच्या सामन्यात २१-१४, ९-२१, २१-१० असे पराभूत केले. ५६ मिनिटांच्या या सामन्यात सिंधूने पहिला गेम सहज जिंकला, पण



उन्नतीने दुसऱ्या गेममध्ये शानदार पुनरागमन करत सामना बरोबरीत आणला. निर्णायक गेममध्ये सिंधूने आपल्या अनुभवाचा फायदा उचलत एकतर्फी विजय मिळवला. या विजयामुळे सिंधूने गेल्या वर्षी याच स्पर्धेत उन्नतीकडून झालेल्या पराभवाचा बदला घेतला. दुसऱ्या फेरीत सिंधूचा सामना चीनच्या चौथ्या मानांकित आणि माजी ऑलिम्पिक विजेती चेन युफेईशी होईल. विशेष म्हणजे, सिंधूने गेल्या आठवड्यात जपान ओपनमध्ये चेन युफेईला पराभूत केले होते, ज्यामुळे तिचा आत्मविश्वास लक्षणीयरीत्या वाढला आहे.

#### आयुष शेट्टीने दिला धक्का

पुरुष एकेरीमध्ये, युवा भारतीय खेळाडू आयुष शेट्टीने इंडोनेशियाच्या जागतिक क्रमवारीत ११ व्या क्रमांकावर असलेल्या आणि माजी विश्व ज्युनियर चॅम्पियन अल्वी फरहानला २१-१७, ५-२१, २१-१७ असे पराभूत करून १६ च्या फेरीत प्रवेश केला. आयुषने उत्कृष्ट खेळ करत पहिला गेम जिंकला, पण फरहानने दुसऱ्या गेममध्ये वर्चस्व गाजवत सामना बरोबरीत आणला. भारतीय खेळाडूने संयमी कामगिरी दाखवत निर्णायक गेम जिंकला. हा विजय आयुषसाठी विशेष होता, कारण २०२३ च्या विश्व ज्युनियर चॅम्पियनशिपच्या उपांत्य फेरीत तो फरहानकडून पराभूत झाला होता. मात्र, दुहेरी स्पर्धेत भारतीय खेळाडूंची कामगिरी निराशाजनक होती.

#### लक्ष्य सेन चर्चेत

स्पर्धेत पुढे, भारतीय स्टार बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन पहिल्या फेरीत जपानच्या युशी तनाका विरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. ◂ (वृत्तसंस्था)

# आशियाई खेळांपूर्वी भारतीय नेमबाजांची निराशाजनक कामगिरी

## पहिल्याच दिवशी चीनला दोन्ही सुवर्णपदके

**हांगझू (चीन), २२ जुलै**

यजमान चीनने बुधवारी येथे झालेल्या आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेच्या उद्घाटनाच्या दिवशी वर्चस्व गाजवत दोन्ही सुवर्णपदके जिंकली, तर एकाही भारतीय नेमबाजाला पदक जिंकता आले नाही. यामुळे सप्टेंबरमध्ये जपानमध्ये होणाऱ्या आशियाई खेळांपूर्वीच्या अंतिम आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतीय नेमबाजांना सामोरे जाव्या लागणाऱ्या खडतर आव्हानाची झलक पाहायला मिळाली.

भारताची सुरुवात निराशाजनक झाली, कारण १० मीटर एअर पिस्तूल मिश्र संघातील एकही खेळाडू पात्रता फेरी पार करू शकला नाही. अनेक विश्वचषक सुवर्णपदके जिंकलेल्या सुरुची इंदर सिंग आणि केदारलिंग उचगाव यांनी एकूण ५७७ गुणांसह नववे स्थान पटकावले. भारताची दुसरी जोडी, सैन्यम आणि कमलजीत, यांनीही एकूण ५७७ गुण मिळवले, परंतु त्यांना ११ व्या स्थानावर समाधान मानावे लागले.

चीनसाठी, याओ जियानजुन आणि हू काई यांनी ४८८.४ गुणांच्या विश्वविक्रमी गुणांसह सुवर्णपदक जिंकले. चीनच्या दुसऱ्या जोडीने, शेन यियाओ आणि बू शुआईहांग (४८५.७), रौप्यपदक पटकावले, तर दक्षिण कोरिया आणि एका वैयक्तिक तटस्थ खेळाडूने चौथे स्थान मिळवले.

पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात, ज्युनियर विश्वविजेता राकेश पार्थ माने पात्रता फेरीत ६३३.४ गुणांसह दुसऱ्या स्थानी राहिला. त्याला केवळ चीनच्या दोन वेळच्या ऑलिम्पिक चॅम्पियन शेंग लिहाओने मागे टाकले, ज्याने ६३७.५ गुण मिळवले. मात्र, माने अंतिम फेरीत आपली लय कायम ठेवू शकला नाही आणि १४५.५ गुणांसह सातव्या स्थानी राहिला. शेंग लिहाओने २५३.९ गुणांसह सुवर्णपदक जिंकले, तर त्याच्याच देशाचा देशबांधव झांग चांगहोंग (२५२.४) दुसऱ्या स्थानी राहिला.

इतर भारतीय नेमबाजांनाही प्रभाव पाडण्यात अपयश आले. तुषार माने ६३०.५ गुणांसह १२व्या स्थानी, तर हिमांशू ढिल्लन ६२९.३ गुणांसह २२व्या स्थानी राहिला. ◂ (वृत्तसंस्था)

## महत्वाचे...

### 'नॅशनल आयडियल टीचर अवॉर्ड २०२६' प्रा. डॉ. निकत यांना जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि २२ जुलै-**



करमाळ्यातील ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूटचे संस्थापक व संचालक प्रा. डॉ. महेश निकत यांची शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत 'नॅशनल आयडियल टीचर अवॉर्ड २०२६' साठी निवड झाली आहे. पुरस्काराचे वितरण दि. २ ऑगस्ट रोजी पुणे येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. प्रा. डॉ. महेश निकत यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, गणित विषयाचे प्रभावी अध्यापन, तसेच एमएचटी, सीईटी, जेईई, नीट यांसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन उपलब्ध करून दिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूट, करमाळा या संस्थेने अल्पावधीतच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारामुळे करमाळा शहर तसेच सोलापूर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव झाला आहे.

### महाराष्ट्र बंदला करमाळ्यातही पाठिंबा; आज बंद

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.२२ जुलै-**

दिल्ली येथील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला करमाळा तालुक्यातील सामाजिक राजकीय व सर्वपक्षीय संघटनांच्या वतीने पाठिंबा दिला आहे. समर्थनार्थ दि. २३ जुलै रोजी राज्यात महाराष्ट्र बंद पुकारला आहे. करमाळ्यातही बंद पाळण्याबाबत तहसीलदार शिल्पा ठोकडे व पोलीस निरीक्षक रणजीत माने यांना करमाळा निवेदन देण्यात आले. दिल्ली पोलिसांनी कोणाच्या आदेशावरून लाठीचार्ज आंदोलकांवर केला याचीही सखोल चौकशी झाली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्या पूर्ण होण्यासाठी २३ जुलै रोजी महाराष्ट्र बंद पाळण्याचा निर्णय घेतला आहे. बंदमध्ये करमाळा शहर व तालुक्यातील मुख्य बाजारपेठ बंद ठेवणार आहे. गुरुवार २३ जुलै रोजी सकाळी ९:३० डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे उपस्थितीचे आवाहन केल आहे. यावेळी तहसीलदार शिल्पा ठोकडे व पोलीस निरीक्षक रणजीत माने यांनी कायदा सुव्यवस्थेचे पालन करून शांततेत आंदोलन करण्याचे आवाहन केले.

### अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन लग्न; तरुणावर 'पोक्सो'

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ जुलै-**

बार्शी तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन लग्न करत वारंवार शारीरिक अत्याचार करण्यात आला. याप्रकरणी आरोपीवर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तालुक्यातील एका गावातील रहिवासी असलेल्या १६ वर्षे ९ महिने वयाच्या मुलीला आरोपी अबक ( नांव बदललेले) याने २ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास घरातून पळवून नेले होते. त्यानंतर गावातीलच एका मंदिरात तिच्याशी विवाह केला. पीडिता अल्पवयीन असल्याचे माहित असूनही २ डिसेंबर २०२५ ते २० जुलै २०२६ या कालावधीत तिच्याशी संमतीशिवाय वारंवार शारीरिक संबंध ठेवले. परिणामी ती गरोदर राहिली आहे. छळाला कंटाळून अखेर पीडितेने बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. तक्रारीवरुन आरोपीविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आरोपीवर भारतीय न्याय संहिता कलम ६४ (२) (F$), ६४ (२) (I), ६४ (२) (M) तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम (पोक्सो कायदा) चे कलम ४, ६ आणि ८ अन्वये गंभीर गुन्ह्यांची नोंद केली आहे. गुन्ह्याचा प्राथमिक वर्दी रिपोर्ट जे.एम.एफ.सी. न्यायालय बार्शी यांना सादर करण्यात आला आहे. बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे हे तपास करीत आहेत.




## निधन वृत्त...

### प्रकाश पाटील

**मंगळवेढा, दि. २२ जुलै-**



उचेठाण येथील रहिवासी श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना कामगार पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन प्रकाश पाटील यांचे बुधवार दि. २२ जुलै रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यू समयी ते ६५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे जावई असा परिवार आहे.

### सुशीला पवार

**बार्शी, दि. २२ जुलै-**

बार्शी नगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक बाळासाहेब पवार व ज्ञानेश्वर पवार यांच्या मातोश्री सुशीला महादेव पवार (वय ८३) यांचे मंगळवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवार पेठ येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### कृष्णाबाई कांबळे

**सोलापूर, दि. २२ जुलै-**



संजय नगर, कुमठा नाका येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल कांबळे यांच्या मातोश्री कृष्णाबाई नामदेव कांबळे ( वय ७५) यांचे बुधवार, दि. २२ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे.


# वारीत जखमी वारकऱ्याला 'पीएम राहत'चा आधार

**शिवम हॉस्पिटल, वेळापूर येथे तात्काळ उपचार**

**महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मदत**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२२ जुलै -**

आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे पायी येत असताना अपघातात गंभीर जखमी झालेल्या ८३ वर्षीय वारकरी भाविकास 'पीएम राहत' योजनेअंतर्गत तात्काळ उपचाराचा लाभ मिळाला. शिवम हॉस्पिटल, वेळापूर येथे त्यांच्यावर तात्काळ उपचार करण्यात आले. दगडुबा दिगंबर भोसले (वय ८३), रा. भूमराळा, ता. लोणार, जि. बुलढाणा हे पंढरपूरकडे येत असताना माळशिरस बायपास येथे अपघात झाला. अपघातामध्ये त्यांना गंभीर दुखापत होऊन दोन्ही पायांच्या हाडांचे फ्रॅक्चर झाले. अपघातानंतर त्यांना तात्काळ महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत शिवम हॉस्पिटल, वेळापूर, ता. माळशिरस येथे दाखल करण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टरांनी त्यांची त्वरित तपासणी करून आवश्यक उपचार सुरू केले. रुग्णाचे वय, गंभीर दुखापत व उपचाराचा खर्च लक्षात घेऊन रुग्णालयाने तत्परतेने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून पीएम राहत योजनेअंतर्गत रुग्णास उपचाराचा लाभ उपलब्ध करून दिला. त्यामुळे रुग्णास आर्थिक अडचण न येता आवश्यक, दर्जेदार व वेळेवर उपचार सुरू करता आले.




वारीकाळात पालखी मार्ग व पंढरपूर परिसरातील महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालये वारकरी भाविकांना तातडीने उपचार उपलब्ध करून देत आहेत. आवश्यकतेनुसार 'पीएम राहत' योजनेचाही लाभ देत आहे.

**- डॉ. वर्षा डोईफोडे,**
**जिल्हा शल्य चिकित्सक, सोलापूर.**

## बार्शीत हिट अँड रन; पिता-पुत्राचा मृत्यू; पोलिसांकडून २४ तासात आरोपी गजाआड

**नंबर प्लेटवरुन शोध घेत कारवाई**

**तसा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ जुलै-**



बार्शी शहरातील बीआयटी कॉलेजसमोरील रस्त्यावर मंगळवारी (दि.२१ जुलै) सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात शिक्षक राजेश सोनवणे (वय ५०) यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा ११ वर्षीय मुलगा तेजस ऊर्फ स्वराज सोनवणे याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता बार्शी शहर पोलिसांनी तात्काळ तपासचक्रे फिरवत २४ तासात आरोपीला गजाआड केले. त्याचे वाहनही जप्त केले.

मंगळवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास बीआयटी कॉलेजसमोरील रस्त्यावर चारचाकी वाहनाने दोघांना धडक दिल्याची माहिती निर्भया पथकाचे कर्मचारी बाबासाहेब घाडगे व डायल-११२ पथकाला मिळाली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमींना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी राजेश सोनवणे यांना मृत घोषित केले, तर गंभीर जखमी तेजस ऊर्फ स्वराज याला जगदाळे मामा रुग्णालयात हलवले. मात्र, बुधवारी सकाळी उपचारादरम्यान त्याचाही मृत्यू झाला.

मयत राजेश सोनवणे यांचा मोठा मुलगा सक्षम सोनवणे (वय १९) याने फिर्याद दिली आहे. वडील व लहान भावाला जखमी करुन चालका घटनास्थळावरुन पलायन केल्याचा आरोप फिर्यादीत केला आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात आरोपी महेश नानासाहेब काजळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला

**प्रत्यक्षदर्शीकडून मिळाली उपयुक्त माहिती**

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन तपास सुरु केला. अपघातस्थळापासून काही अंतरावर वाहनाची नंबर प्लेट आढळून आली. तसेच प्रत्यक्षदर्शीकडून मिळालेल्या माहितीनुसार अपघात करणारे वाहन मारुती सुझुकी डिझायर (क्र. एमएच -१३ इएक्स २२८२) असल्याचे निष्पन्न झाले. तपासाअंती हे वाहन महेश नानासाहेब काजळे (रा. अरणगाव, ता. बार्शी) याच्या ताब्यात असल्याचे समोर आले. पोलिसांनी आरोपीसह अपघातग्रस्त वाहन येरमाळा परिसरातून ताब्यात घेतले आहे.

## पंढरपूर पोलिसांची देशी दारूवर कारवाई; साडेदहा लाखांचा मुद्देमाल जप्त

**पंढरपूर शहर पोलिसांचा धडाका**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि. २२ जूलै-**



पंढरपूर शहर पोलिसांनी आषाढी वारीच्या अनुषंगाने देशी दारू विरुद्ध मोठी कारवाई केली. देशी दारूच्या १५५ बॉक्ससह एकुण दहा लाख ५५ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी ही माहिती दिली. अशोक लेलँड टेम्पो चालक प्रवीण अशोक मोरे (रा.पंढरपूर) हा मंगळवारी (दि.२१) अशोक लेलँड टेम्पोमध्ये १५५ देशी दारूचे वेगवेगळ्या कंपनीचे बॉक्स, लायसन्स शिवाय पालखी मार्गावरून देशी दारूची वाहतूक करताना सापडला. टेम्पोमध्ये सुमारे ५ लाख ५५ हजार २८० रुपये किंमतीचे १५५ बॉक्स तसेच अशोक लेलँड कंपनीचा टेम्पो असा एकूण दहा लाख ५५ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गाडीचा चालक प्रवीण अशोक मोरे (रा. पंढरपूर ) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रमसिंग मोटे, नितीन जगताप, युवराज पाटील, पंकज गाडेकर, पीएसआय दत्तात्रय लेंडवेपाटील, पोलीस हवालदार सुजित उबाळे, पोलीस कॉन्स्टेबल देवेंद्र सूर्यवंशी, नवले, ठाकर, पवार, गोडसे, प्रसाद ओटी, सुनील बनसोडे, शहाजी मंडले, चालक पोलीस कॉन्स्टेबल बाळासाहेब बडे यांच्या पथकाने केली.

## ४१ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई

**'आपली तक्रार' आणि लोकसेवा हक्कातील प्रलंबित प्रकरणी दंडाचा बडगा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

आपली तक्रार/ माय सोलापूर ॲप व लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अर्ज मुदतीत निकाली न काढल्याप्रकरणी सोलापूर महापालिकेने ४१ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली आहे. 'संबंधितांकडून नियमानुसार दंड वसूल करण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त सोनाली यादव यांनी काढले आहेत.

'आपली तक्रार' पोर्टल, 'माय सोलापूर' ॲप तसेच लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत प्रलंबित अर्जांची दखल घेत प्रशासनाने मुदतीत तक्रारी व अर्ज निकाली न काढणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून नियमानुसार दंड वसूल करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत. या सेवांशी संबंधित अर्ज वेळेत निकाली काढणे व पोर्टलवरील माहिती अद्ययावत ठेवण्याच्या सूचना यापूर्वीही देण्यात आल्या होत्या. मात्र अद्याप अनेक तक्रारी व अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून आल्याने कारवाई केली आहे. आपली तक्रार माय सोलापूर ॲप वर प्रकरणे प्रलंबित ठेवल्याप्रकरणी १७ कर्मचाऱ्यांना एकूण ५ हजार ३०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. लोकसेवा अधिनियम हक्क अंतर्गत अर्ज प्रलंबित ठेवल्याने २४ कर्मचारी व अधिकाऱ्यांना एकूण २३ हजार ६०० रुपये दंड करण्यात आला आहे. एकूण ४१ कर्मचारी व अधिकाऱ्यांना एकूण २८ हजार ९०० रुपये दंड आकारण्यात आला आहे.

**विशेष पुनरीक्षण कामावरील कर्मचाऱ्यांना ३१ जुलैपर्यंत दिलासा**

दरम्यान, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील 'आपली तक्रार' पोर्टल व लोकसेवा हक्क अधिनियमातील प्रलंबित प्रकरणांसंदर्भातील दंडात्मक कारवाई ३१ जुलै २०२६ पर्यंत स्थगित ठेवण्यात आली आहे. संबंधित विभागप्रमुखांनी या आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत.



## टेंभुर्णीत महाविकास आघाडीचे केंद्र सरकारविरोधात आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. २२ जुलै-**

नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, तसेच दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलकांवर कथित लाठीहल्ल्याचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने टेंभुर्णी येथे निवेदन देऊन निषेध करण्यात आला

यावेळी कॉंग्रेस, शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (श.प.), संभाजी ब्रिगेड आणि वडार परिवर्तन सेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यावर मोर्चा काढत केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. एपीआय संदेश बावकर यांना निवेदन दिले. यावेळी राष्ट्रवादी (श.प.) माढा तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील वरवडेकर, शिवसेना (उबाठा) माढा तालुकाप्रमुख मधुकर देशमुख, माढा तालुका कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष संजय पाटील, संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सचिन जगताप, वडार परिवर्तन सेनेचे अध्यक्ष राजू धोत्रे, कॉंग्रेस प्रदेश सचिव भीमराव बंडगर, शिवसेना विभागप्रमुख बाबा चंदनकर, शिवसेना शहरप्रमुख संतोष खैरमोडे, कॉंग्रेस अध्यक्ष हेमंत देशमुख, युवा सेना समन्वयक किशोर देशमुख, कॉंग्रेसचे मुकुंद ननवरे, कॉंग्रेस अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष जमीर काझी, टेंभुर्णी शहर शिवसेना उपप्रमुख प्रशांत सोनवणे, कॉंग्रेस तालुका सदस्य डावरे, शिवसेना शहर संघटक कोळपे आदी उपस्थित होते.

## अन्नछत्र मंडळाचा वर्धापनदिन, गुरूपौर्णिमा महोत्सवाचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ जुलै-**



श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवाचा शानदार शुभारंभ नुकताच पार पडला.

न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली दि. १९ जुलै रोजी रविवार सायंकाळी ६.३० वा. विरक्त मठाचे म.नि.प्र. बसवलिंग महास्वामी, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे मुख्य पुजारी मोहन पुजारी, श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे पुजारी अण्णू महाराज, साई ग्रुप, साईसुश्रुत कन्सट्रक्शन, पुणे संस्थापक अध्यक्ष-अरुण आडकर, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, शुभम नांगरे, पालखी संयोजक, उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अविनाश पवार, चॅलेंजर सपोर्टचे अतिश शहा, आरती शहा, चंद्रशेखर गायकवाड, मनिषा गायकवाड, रामदास तांबे, उत्तर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पन्हाळकर, उपनिरीक्षक सतीश रणवरे, आय.एस.ओ. प्रमाणपत्र अधिकारी ओंकार पत्की, यशवंत पत्की आदी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन पहिल्या पुष्पाचे मोठ्या उत्साहात गंगा आरतीने शानदार उद्घाटन झाले.

दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व लता मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर जेष्ठ गायिका उषा मंगेशकर आणि सहकाऱ्याचा 'रंग उषेचे, कार्यक्रम झाला. त्यांच्या समवेत नेहा चिपळूणकर, हेमंत वाळूंजकर, रसिका गानू, धवल चांदवडकर, विवेक परांजपे, नरेंद्र चिपळूणकर, राजेंद्र साळुंके, नितीन शिंदे, रोहित जाधव, आनंद घोरारे, प्राजक्ता मोडक व अँकर प्रवीण जोशी यांनी साथ दिली. या सर्व कलाकारांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळास आय.एस.ओ. प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्यास उपस्थित मान्यवरांचा सत्कार अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला. मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन केले. उषा मंगेशकर यांचा सत्कार न्यासाचे जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते झाला.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, स्मिता कदम, पल्लवी कदम, उज्वला भोसले, संगीता भोसले, रूपा पवार, स्वप्ना माने, कविता वाकडे, सुवर्णा घाडगे, राजश्री माने, क्रांती वाकडे, धनश्री पाटील, सरोजनी मोरे, दिव्या मोरे, कल्पना मोरे, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, खजिनदार लाला राठोड, विश्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, शुभम नांगरे, हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, प्रथमेश इंगळे, मनोज निकम, प्रा. शरणप्पा आचलेर, प्रवीण देशमुख, शितल फुटाणे, सुमित घाटगे, रोहित खोबरे आदी उपस्थित होते. सचिव शामराव मोरे यांनी आभार मानले.

**मंत्री मंडळाकडून शुभेच्छा**

मंत्री मंडळासह, मुंबई महापालिकेतील पदाधिकाऱ्यांकडून अन्नछत्र मंडळाच्या वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवास शुभेच्छा दिल्या आहेत. ॲड. विक्रम येडूर, सोलापूर, इरन्ना इंडे (एस.टी. चालक), बँक अधिकारी इरेश बागेवाडी, शिक्षक शिवशंकर बिराजदार यांना गुणीजन गौरव पुरस्कार दिले.

**भक्ती रन टी-शर्टचे अनावरण**

रविवार २६ जुलै रोजी पहाटे ५.३० ते ९.३० वा पर्यंत श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट) व चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ' भक्ती रनङ्ग स्पर्धा होणार आहे. स्पर्धेच्या भक्ती रन टी-शर्टचे अनावरण करण्यात आले.

# गायिका आर्या आंबेकरच्या मधुर स्वरांनी अक्कलकोटकर मंत्रमुग्ध

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ जुलै-**

श्री गणेश स्तवन..!, तारकमंत्र, निशंक हो.. निर्भय हो..!, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा..! श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ..! विठ्ठल..! विठ्ठल...!!, अशा एक ना अनेक मराठी, हिंदी व कन्नड भावगीते व भक्तीगीतांनी ख्यातनाम गायिका आर्या आंबेकर यांच्या 'स्वर आर्या' या सदाबहार गाण्याने श्रोते भारावून गेले होते.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, बुधवार सायंकाळी ७.१५ वा. 'स्वर आर्या' सादरकर्ते आर्या आंबेकर व सहकलाकार मुंबई ह्या कार्यक्रमाने चौथे पुष्प संपन्न झाले. या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन गायिका आर्या आंबेकर, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, दिव्य मराठीचे संपादक महेश रामदासी, माजी नगरसेवक विजुभाऊ तांडेल मुंबई, सुनील घाटे, मुंबई, संपतराव शिंदे, वटवृक्ष स्वामी मंदिराचे अध्यक्ष महेश इंगळे, नगरसेवक महेश हिंडोळे, सद्धाम शेरीकर, पंचायत समिती सदस्य विनोद मोरे, अपाशा किवडे, प्रथमेश इंगळे, आराध्य तांडेल, रिजनल हेड, सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया-अंचित कुमार, बीड युवा सेना प्रमुख ऋषिकेश लोमटे, यश कल्याणी सेवाभावी संस्था अध्यक्ष गणेश केरे पाटील, पुणे, इंग्लिश असोशियन चे अध्यक्ष- बाळकृष्ण लावंड, गुरुनाथ बुचांडे, पक्षी मित्र कल्याणराव साळुंके करमाळा यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान न्यासाचे पुरोहित सोमकांत कुलकर्णी यांचे चिरंजीव कु. स्वराज याने छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास यावर मनोगत व्यक्त केले.

यात्रसंगी लोकप्रिय मराठी भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते आर्या आंबेकर यांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी, सोमकांत कुलकर्णी, विश्वंभर पुजारी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्वाती निकम, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल क्षीरसागर, सुवर्णा घाडगे, छाया पवार, रुपा पवार व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, दिव्य मराठीचे युनिट हेड हाजीमलंग शेख, वृत्तसंपादक श्रीकांत कांबळे, राजेंद्र लिंबीतोटे, संतोष भोसले,



लक्ष्मण पाटील, मनोज निकम, प्रा.शरणप्पा आचलेर, प्रा. प्रकाश सुरवसे, प्रा. भीमराव साठे, प्रवीण देशमुख, अरविंद शिंदे, अतिश पवार, प्रवीण घाटगे, गोटू माने, संजय गोंडाळ, सौरभ मोरे, वैभव मोरे, रोहित खोबरे, कांत झिपरे, मारुतीराव बोरकर, सर्फराज शेख, किरण पाटील, रोहित पाटील, निखील पाटील, नारायण गडदे, मैनुद्दीन कोरबू, बलभीम पवार, शुभम सावंत, मल्लिकार्जुन गवळी, मुन्ना महाडिक, रमेश शिंदे, विजय इंगळे, अप्पा गवळी, सागर गोंडाळ, सादिक बागवान, मुन्ना माळवदकर, आकाश गडकरी, अमर मासरे, वासू कडबगांवकर, गोविंदराव शिंदे, बाळासाहेब घाटगे, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, राजू पवार, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, असद फुलारी, रमेश हळसंगी, समर्थ घाडगे, राहुल इंडे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल यांनी केले.

अन्नछत्र मंडळाकडून गेली २७ वर्षे राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत असून श्री. जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, अमोलराजे जनमेजयराजे यांच्या विधायक कार्याने अक्कलकोटचे नाव महाराष्ट्रासह देशात पोहचत आहे.

**गुणीजन गौरव :** यामध्ये प्रा.वैदेही नरहर वैद्य, उपप्राचार्य, समीर मिनियार, सहशिक्षक, काशिराया काका पाटील विद्यालय, दत्तात्रय कटारे श्री समर्थ कॉम्प्यूटर, समीर बागवान, एस.टी.वाहक यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

**गुणवंत विद्यार्थी गौरव :** तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला.

**आज फोक आख्यान**

शनिवार दि. २३ जुलै रोजी सायंकाळी ७.१५ ते रात्रौ ९.३० पर्यंत '' फोक आख्यान'' घरंदाज लावणी, जात्यावरच्या ओव्या आणि भक्तीचा रसाळ आविष्कार असा हा कार्यक्रम सादर होणार आहे.

## महत्वाचे...



### एसव्हीसीएसच्या माने हिला राष्ट्रीय स्पर्धेत रौप्य

**सोलापूर, दि. २२ जुलै-**


चेन्नई येथे झालेल्या ७९व्या वरिष्ठ राष्ट्रीय ऑक्काटिक चॅम्पियनशिपमध्ये एस.व्ही.सी.एस. हायस्कूल एमआयडीसीची मनस्वी माने हिने ३ मी. स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग या प्रकारात रौप्य प्राप्त केले. मनस्वीला आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्रीकांत शेटे, क्रीडा शिक्षक हनुमंत येळमेली, बसवराज कोरे व आकाश बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले या यशाबद्दल मनस्वीचे व मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, संस्थेचे प्रशासकीय प्रमुख संगप्पा म्हमाणे, मुख्याध्यापक धनंजय नकाते,उपमुख्याध्यापक सुहास काटगांव व पर्यवेक्षक केदार पटणे यांनी अभिनंदन केले.



### भारती विद्यापीठाच्या गौरी रेऊरेस सुवर्ण

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

भारती विद्यापीठ माध्यमिक विद्यालयातील इयत्ता सातवीतील गौरी रेऊरे हिने उत्तुंगतेज बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत (मार्च २०२६, जवळा जि. हिंगोली) सुवर्णपदक प्राप्त केले. या यशाबद्दल विद्यालयामध्ये तिचा छोटेखानी सत्कार प्राचार्य आर. एस. देवकर यांनी केला. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. प्राचार्य देवकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी विविध स्तरावरील स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होऊन आपल्या बुद्धिमत्तेची चमक दाखवावी व आपल्या शाळेचे व संस्थेचे नाव उज्ज्वल करावे. भारती विद्यापीठाचे कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम, शालेय समितीच्या अध्यक्षा विजयमाला व शालेय शिक्षण विभागाचे संचालक एम. डी. कदम यांनी गौरी हिचे अभिनंदन केले.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## भंडारवाडीत प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सुरू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ जुलै -**

धाराशिव तालुक्यातील भंडारवाडी येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सुरू करण्यात यावे, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्य अजितकुमार लाकाळ यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सुमारे दोन हजार लोकवस्ती असलेल्या भंडारवाडीत आरोग्य उपकेंद्र नसल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला, बालके व किशोरवयीन मुलींना आरोग्य सुविधांसाठी दूरच्या गावात जावे लागत आहे.

त्यामुळे अनेक रुग्ण उपचारांपासून वंचित राहत असल्याचे




निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नागरिकांचा मूलभूत हक्क लक्षात घेऊन भंडारवाडीत लवकरात लवकर प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सुरू करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करावा, अशी मागणी लाकाळ यांनी केली आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिनी लोहाऱ्यात वृक्षारोपण

**लोहारा, दि.२२ जुलै -**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त लोहारा शहरात २२ जुलै रोजी २५६ फळझाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. प्रत्येक घरासमोर एक झाड या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात केशर आंबा, खारीक व पेरूची झाडे शहरातील सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आली. हा उपक्रम भाजपचे माजी जिल्हा चिटणीस विक्रांत संगशेट्टी, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन प्रशांत लांडगे आणि 'रेन ट्री फाउंडेशन'चे क्षेत्रीय अधिकारी प्रवीण संगशेट्टी यांनी स्वखर्चातून राबविला. यावेळी भाजप पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### डोकेवाडीत दीपक गोरे यांना निरोप, खंदारे यांचे स्वागत

**भूम, दि.२२ जुलै -**

भूम तालुक्यातील डोकेवाडी ग्रामपंचायतीत मागील १२ वर्षांपासून कार्यरत असलेले ग्रामपंचायत अधिकारी दीपक गोरे यांच्या स्वेच्छा बदलीनिमित्त बुधवारी निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. पारदर्शक व प्रामाणिक कामकाजासाठी ओळख असलेल्या गोरे यांनी एकाच ग्रामपंचायतीत सलग १२ वर्षे सेवा बजावली. यावेळी नूतन ग्रामसेवक एस.एस. खंदारे यांचेही उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी प्रशासक सरपंच सुषमा थोरात, प्रशांत रोटे, सुनीता साळुंके, भागवत जालन, महावीर जालन, बापुराव डोके, अतुल डोके, अशोक जाधव, सागर खैरे, बाळासाहेब आहेर, स्वप्निल जालन, अभय जालन, महादेव जालन आदी उपस्थित होते.

## कडकनाथवाडी साठवण तलाव क्रमांक २ ला पुन्हा गळती

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२२ जुलै -**

वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी येथील साठवण तलाव क्रमांक २ मधील गळतीचा प्रश्न अनेक वर्षांपासून कायम असून, दिवसेंदिवस गळतीचे प्रमाण वाढत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. लाखो रुपयांचा निधी खर्च करून यापूर्वी दुरुस्तीची कामे करण्यात आली होती. मात्र, एवढा खर्च करूनही गळती पूर्णपणे थांबलेली नसून, आजही त्याच ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात पाणी झिरपत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



**लाखोंच्या दुरुस्तीनंतरही पाणी वाया, चौकशीची ग्रामस्थांची मागणी**

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पूर्वीपेक्षा आता गळती अधिक वाढली असून तलावातील पाणी मोठ्या प्रमाणात वाया जात आहे. ज्या भागावर दुरुस्ती करण्यात आली होती, त्याच भागातून पुन्हा पाणी वाहत असल्याने दुरुस्तीच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित काम निकृष्ट दर्जाचे झाले का, असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत.

सध्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तलावातील पाणीसाठा वाढण्याची शक्यता असल्याने गळती आणखी तीव्र होऊन गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तलावाच्या खाली मसोबाचीवाडी गाव, शेती आणि नागरिकांची वस्ती असल्यामुळे कोणतीही दुर्घटना घडल्यास मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या गंभीर प्रश्नाबाबत संबंधित विभागाकडे अनेक वेळा तक्रारी करूनही कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करण्यात यावी, गळती कायम स्वरूपी बंद करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, दुरुस्तीच्या कामावर खर्च झालेल्या निधीची सखोल तपासणी करावी तसेच दोषी आढळणाऱ्या अधिकारी, अभियंते आणि ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### तीन पिढ्यांनंतर खुला झाला विकासाचा मार्ग...

## संजीतपूरच्या शेतरस्त्यांचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते लोकार्पण



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२२ जुलै -**

भर पावसातही ग्रामीण विकासाला प्राधान्य देत धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पानंद रस्ते योजनेअंतर्गत विकसित करण्यात आलेल्या संजीतपूर-पानगाव तसेच संजीतपूर-बेडकी वस्ती या शेतरस्त्यांचे लोकार्पण करण्यात आले. तीन पिढ्यांपासून अतिक्रमणामुळे बंद झालेल्या या शिवरस्त्यांना अतिक्रमणमुक्त करून त्यांचे बळकटीकरण व खडीकरण करण्यात आल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

या दोन्ही शेतरस्त्यांमुळे अनेक वर्षांपासून चिखल, अडथळे आणि वाहतुकीच्या समस्यांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेतीमालाची वाहतूक, शेतीची अवजारे शेतापर्यंत नेणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत शेतांपर्यंत पोहोचणे आता अधिक सुलभ होणार असल्याने ग्रामस्थांनी प्रशासनाचे आभार मानले.

या प्रसंगी उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे, तहसीलदार हेमंत ढोकले, नायब तहसीलदार गोकुळ भराडिया, सहाय्यक पोलीस निरीक्षक यशवंत घोडके, मंडळ अधिकारी नारायण नागटिळक, ग्राम महसूल अधिकारी मंगेश नांगरे, महादेव गायकवाड, भाऊसाहेब खाडे, विशाल कदम यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## राजर्षी शाहू महाराज मानधन योजनेसाठी कलावंतांच्या निवड प्रक्रियेला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ जुलै -**

राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक-कलावंत मानधन सन्मान योजनेअंतर्गत सन २०२३-२४ व २०२४-२५ या कालावधीसाठी पात्र कलावंतांच्या निवड प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. ७ ते १७ जुलैदरम्यान येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात जिल्हाभरातील कलावंतांच्या मुलाखती घेण्यात आल्या. साहित्य, लोककला, कीर्तन, भजन, नाट्य, संगीत, चित्रकला आदी क्षेत्रातील योगदानाच्या आधारे पात्र कलावंतांची निवड केली जाणार आहे. कलावंत जिल्हा समितीचे सदस्य दिलीप गरड यांनी निवड प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक व गुणवत्तेच्या निकषांवर होत असल्याचे सांगितले. तर शासनाच्या मंजुरीनंतर पात्र कलावंतांची अंतिम यादी जाहीर करण्यात येईल, अशी माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुंभार यांनी दिली.

## पिक विमा भरपाईतून वगळलेल्या महसूल मंडळांचा तातडीने समावेश करा

### डॉ. प्रतापसिंह पाटील यांची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ जुलै -**

खरीप हंगाम २०२५ च्या पिक विमा भरपाईसाठी जाहीर करण्यात आलेल्या महसूल मंडळांच्या यादीतून वगळण्यात आलेल्या मंडळांचा तातडीने समावेश करून संबंधित शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, तांत्रिक सल्लागार समितीच्या निर्णयानुसार धाराशिव जिल्ह्यातील सुमारे ४ लाख ९६ हजार शेतकऱ्यांना अंदाजे ३३६.४५ कोटींची पिक विमा भरपाई मंजूर होणार आहे. हा निर्णय स्वागतार्ह असला, तरी अनेक महसूल मंडळे भरपाईच्या कक्षेबाहेर राहिल्याने हजारो शेतकरी लाभापासून वंचित राहणार असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.



परंडा तालुक्यातील आनाळा, शेळगाव, जवळा (नि), पाचपिंपळा, सोनारी व आसू, कळंब तालुक्यातील शिराढोण, येरमाळा व इटकूर, भूम तालुक्यातील माणकेश्वर, पाथरूड व बावी, तसेच तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग व तुळजापूर या महसूल मंडळांचा भरपाईच्या यादीत समावेश करण्यात आलेला नाही. या भागातील शेतकऱ्यांनाही अतिवृष्टी, पावसातील खंड, उत्पादनात झालेली घट आणि नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका बसला असून, त्यांना भरपाईपासून वंचित ठेवणे अन्यायकारक असल्याचे डॉ. पाटील यांनी म्हटले आहे.

याशिवाय वाशी व लोहारा तालुक्यातील वगळण्यात आलेल्या महसूल मंडळांचाही पुनर्विचार करून त्यांचा भरपाईच्या यादीत समावेश करावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. पिक विमा योजनेचा उद्देश संकटग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणे हा असून, पात्र शेतकरी केवळ प्रशासकीय किंवा तांत्रिक कारणांमुळे लाभापासून वंचित राहू नयेत, असेही त्यांनी नमूद केले आहे.

शासन व संबंधित विभागाने वगळलेल्या महसूल मंडळांचे तातडीने सर्वेक्षण करून त्यांचा पिक विमा भरपाईत समावेश करावा, जेणेकरून कोणत्याही पात्र शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही आणि सर्व शेतकऱ्यांना समान न्याय मिळेल, अशी अपेक्षा डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## पंचायतराज अभियानात एकोंडी लोची दमदार कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ जुलै -**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत एकोंडी लो हिने तालुका व जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावत विभागस्तरीय तपासणीसाठी निवड होण्याचा मान मिळविला आहे. या उल्लेखनीय यशामुळे लोहारा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**तालुका व जिल्ह्यात प्रथम, विभागस्तरीय तपासणीसाठी निवड**

या यशामागे ग्राम पंचायत एकोंडी लोचे सरपंच, प्रशासक, ग्रामपंचायत अधिकारी, सदस्य तसेच ग्रामस्थांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, जिल्हाधिकारी किर्तीकिरण पुजार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शेंगुलवार, निलेश काळे, पंचायत समिती लोहारा सभापती पल्लवी जानकर, उपसभापती अमोल पाटील, पंचायत समिती सदस्य, गट विकास अधिकारी ओंकार गायकवाड, सहायक गट विकास अधिकारी वग्गे, विस्तार अधिकारी (पंचायत) एस. एम. शटगार तसेच पंचायत समितीतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शन, नियोजन आणि सहकार्यामुळे हे यश शक्य झाल्याचे ग्रामपंचायतीने नमूद केले. ग्राम पंचायतीने स्वच्छता, कर वसुली, पारदर्शक प्रशासन, विकासकामांची प्रभावी अंमलबजावणी, लोकसहभाग तसेच शासनाच्या विविध योजनांची उत्कृष्ट अंमलबजावणी या निकषांवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या सर्व बाबींच्या आधारे ग्रामपंचायतीने तालुका व जिल्हास्तरावर अव्वल स्थान मिळविले.

आता विभागस्तरीय तपासणीतही ग्रामपंचायत एकोंडी लो उत्कृष्ट कामगिरी करून लोहारा तालुका आणि धाराशिव जिल्ह्याचे नाव राज्यभर उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या यशाबद्दल संबंधित अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## तुळजापूरात इस्कॉनची श्री जगन्नाथ रथयात्रा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ जुलै -**

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) व हरे कृष्ण भक्तांच्या वतीने आयोजित श्री श्री जगन्नाथ, बलदेव व सुभद्रा महाराणी यांची रथयात्रा मंगळवारी भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडली.

इच्छापूर्ती गणेश मंदिरातून इस्कॉन पंढरपूरचे वरिष्ठ भक्त श्रवण भक्ती प्रभूजी यांच्या हस्ते आरती करून रथयात्रेला प्रारंभ झाला.

बसस्थानक, भवानी रोड, महाद्वार, आर्य चौक व पावणारा गणपती मार्गे रथयात्रा जिजामाता नगर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात पोहोचली. यावेळी भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

### तुळजाभवानी मंदिरातील अधिकाऱ्यांना शिवीगाळ प्रकरण...

## विजय गंगणे यांच्यावर कारवाईच्या मागणीसाठी कर्मचाऱ्यांचे धरणे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ जुलै -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या अधिकाऱ्यांना अश्लील शिवीगाळ व असंसदीय भाषा वापरल्याच्या निषेधार्थ मंदिर संस्थानच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशासकीय कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती विजय गंगणे यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करत मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनानुसार, १८ जुलै रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास डोली (खुर्ची) सेवा सुविधेच्या वादातून विलास गंगणे यांनी भ्रमणध्वनीवरून श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक जनसंपर्क अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी




यांच्याशी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत असंसदीय भाषा वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे मंदिर परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. संबंधित व्यक्तीच्या वर्तनामुळे कर्मचारी, अधिकारी तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षिततेबाबतही चिंता निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधिताचे वर्तन अत्यंत गंभीर व अशोभनीय असल्याने त्याचा जाहीर निषेध करण्यात आला.

या प्रकरणी विजय गंगणे यांच्याविरुद्ध तुळजापूर पोलीस ठाण्यात २० जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले असून, त्यांच्यावर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## अणदूरमधील ठिय्या आंदोलनाला तात्पुरती स्थगिती

### १० दिवसांत मागण्या पूर्ण करण्याचे ग्रामपंचायतीचे लेखी आश्वासन...

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२२ जुलै -**

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील विविध प्रलंबित नागरी समस्यांच्या निराकरणासाठी युवा ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर सुरू केलेल्या बेमुदत ठिय्या आंदोलनाला अखेर गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदिवे आणि पंचायत समिती सदस्य रणवीर चव्हाण यांच्या मध्यस्थीनंतर तात्पुरती स्थगिती देण्यात आली. ग्राम पंचायत प्रशासनाने प्रमुख मागण्यांवर कार्यवाही सुरू केल्याचे सांगत उर्वरित मागण्या १० दिवसांत पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तहकूब करण्यात आले.




गेल्या काही दिवसांपासून गावातील अस्वच्छता, अवैध दारू विक्री, मोकाट डुकरांचा वाढता उपद्रव, अतिक्रमणे तसेच इतर मूलभूत नागरी सुविधांबाबत ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी होती.

या पार्श्वभूमीवर युवा ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीसमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले होते. आंदोलनाची दखल घेत गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदिवे व पंचायत समिती सदस्य रणवीर चव्हाण यांनी ग्रामपंचायत प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांमध्ये चर्चा घडवून आणली. चर्चेनंतर ग्रामपंचायतीने गावात स्वच्छता मोहीम सुरू केली असून, अवैध दारू विक्रेत्यांविरोधात पोलिसांनी कारवाई सुरू केल्याचे सांगितले. तसेच मोकाट डुकरांचा बंदोबस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून गावातील अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाहीही सुरू करण्यात आली आहे.

याशिवाय आंदोलनकर्त्यांनी मांडलेल्या इतर मागण्यांवरही पुढील दहा दिवसांत कार्यवाही करून त्या पूर्ण केल्या जातील, असे लेखी आश्वासन ग्रामपंचायत प्रशासनाने दिले. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी आंदोलनाला तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय घेतला.

या आंदोलनात रविराज मुळे, ॲड. विशाल शेटे, राजकुमार गाढवे, रोहन दुधाळकर, संदीप धुमाळ, लक्ष्मण मुळे, अण्णा महाराज, आकाश अलकुंटे, सोमेश्वर आलुरे, गुरुनाथ मिटकरे, आकाश आळंगे, बसवराज पाटील, आप्पाराव मुळे, केशव बोर्डे यांच्यासह युवा ग्रामस्थ सहभागी झाले होते. यावेळी माजी सरपंच धनराज मुळे आणि ग्रामविकास अधिकारी संजय माशाळे उपस्थित होते.

आता ग्रामपंचायत प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची १० दिवसांत पूर्तता न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

### आंदोलन सुरू होताच प्रशासनाची धावपळ

अणदूरमध्ये स्वच्छता, अवैध दारू विक्री, मोकाट डुकरांचा उपद्रव आणि अतिक्रमण हे चारही प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित होते. मात्र, युवकांनी ठिय्या आंदोलन सुरू करताच प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू केल्या. जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमित टपऱ्या हटविण्यात आल्या, खंडोबा मंदिर परिसर व ग्रामपंचायत कार्यालयासमोरील परिसराची स्वच्छता करण्यात आली, अवैध दारू विक्रेत्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले तसेच मोकाट डुकरांचा बंदोबस्त करण्यात आला. त्यामुळे प्रशासन स्वतःहून कार्यवाही का करत नाही, त्यासाठी आंदोलनच करावे लागते का, असा प्रश्न ग्रामस्थांमधून उपस्थित होत असून, या प्रश्नांवर आवाज उठवल्याबद्दल गावातील युवकांचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

## कर्जमाफीपासून वंचित शेतकरी दाम्पत्याला ग्राहक आयोगाकडून दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ जुलै -**

कर्जमाफी योजनेस पात्र असूनही लाभापासून वंचित राहिलेल्या पवारवाडी (ता. धाराशिव) येथील शेतकरी पांडुरंग व शालूबाई मुंढे यांना जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने न्याय दिला आहे.



विविध कार्यकारी सेवा सोसायटी, वाघोली (वरूडा) आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, धाराशिव यांना कर्जमाफी योजनेनुसार बेबाकी प्रमाणपत्र देण्याचे तसेच मानसिक त्रास व तक्रार खर्चापोटी एकूण २० हजार रुपये भरपाई देण्याचे आदेश आयोगाने दिले.

सन २०१७ मधील छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेसाठी पात्र असूनही संबंधित संस्थांच्या त्रुटींमुळे लाभ न मिळाल्याने मुंढे दाम्पत्याने ॲड. धर्मराज सोनवणे यांच्या माध्यमातून ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली होती.

सुनावणीनंतर आयोगाने ३० जून २०२६ रोजी शेतकरी दाम्पत्याच्या बाजूने निर्णय देत संबंधित संस्थांना फटकारले.

# काँग्रेसविरोधात भारतीय जनता पक्षाचे हिंगोलीत तीव्र आंदोलन

## विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या पोस्टरला मारले जोडे




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**
काँग्रेस पक्षाकडून नवी दिल्ली येथे थेट पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर आंदोलन करून सुरक्षा धोक्यात आणल्याच्या निषेधार्थ बुधवार दि २२ जुलै रोजी भारतीय जनता पार्टीच्या वतीने शहरातील गांधी चौकात तीव्र निदर्शने करण्यात आली. या आंदोलनादरम्यान संतप्त भाजपा कार्यकर्त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या पोस्टरला जोडे मारून काँग्रेसच्या बेजवाबदार वृत्तीचा तीव्र शब्दात निषेध केला.

दिल्लीत काँग्रेसने पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर धरणे आंदोलन करून जाणीवपूर्वक गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार पंतप्रधानांच्या सुरक्षेला गंभीर भंग करणारा असून या कृत्याचा जाब विचारण्यासाठी आज दुपारी हिंगोलीतील गांधी चौकात भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन काँग्रेस पक्षाचा धिक्कार असो, पंतप्रधानांच्या सुरक्षेचा खेळ खंडोबा करणाऱ्या काँग्रेसचा निषेध असो अशा घोषणांनी कार्यकर्त्यांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. आंदोलनाचा तीव्र निषेध म्हणून कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या पोस्टरला जोडे मारले.

या आंदोलनात माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकूळे, सरचिटणिस उमेश नागरे, सुनीताताई मुळे, प्रवक्ता विलास गोरे, रजनीश पुरोहीत, पवन उपाध्ये, कैलाश शहाणे, बाबा घुगे, संजय ढोके, नंदु भाऊ खिल्लारे, समिर भिसे, सुनिल राठौर, सदाशिव सुर्यतळ, श्रीरंग राठोड, पदमाकर नायक, हनुमान करहाळे, महेश थोरात, माणिक लोडे, शेख अतिक, सुरज व्यास, केशव सुरदुसे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलतांना युवा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे म्हणाले की, दिल्लीत पंतप्रधान यांच्या निवासस्थानासमोर बेकायदेशीरपणे खा राहुल गांधी यांनी आंदोलन केले हे लोकशाहीला घातक असून तरूणांच्या खांद्यावर बंदुक ठेवून काँग्रेस राजकीय पोळी भाजण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे परंतु देशातील जनतेला पंतप्रधान मोदी यांच्यावर विश्वास आहे. केवळ राजकीय स्टंटबाजी करण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी करीत आहे. राहुल गांधी यांनी बेकायदेशीरपणे केलेल्या आंदोलनाचा भारतीय जनता पक्ष तीव्र शब्दात विरोध करीत आहे.

# अनधिकृत वाळू उपसा प्रतिबंधासाठी यंत्रणांनी समन्वय ठेवावा

## जिल्हाधिकाऱ्यांच्या सनियंत्रण समितीला सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**
जिल्ह्यातील गौण खनिज वाळूच्या उत्खनन, वाहतूक व साठवणुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करून अनधिकृत वाळू उपसा, वाहतूक व साठवणुकीविरुद्ध सातत्याने संयुक्त कारवाई करावी. महसूल, पोलीस, परिवहन, गौण खनिज व संबंधित विभागांनी नियमित तपासण्या करून शासनाच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समितीचे अध्यक्ष राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज आयोजित जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समितीच्या बैठकीत ते बोलत होते. जिल्हा खनिकर्म अधिकारी अश्विन माने, पोलीस उपअधीक्षक पी. एम. माकोडे, सहायक वनसंरक्षक एस. आर. माने, सहायक भूवैज्ञानिक डी.एन. बावळे, सहायक कार्यकारी अभियंता (लघुपाटबंधारे विभाग) डी. एस. येस्के, यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यातील वाळू घाटांची सद्यस्थिती, अनधिकृत वाळू उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी करण्यात आलेल्या कारवाया, जप्तीची प्रकरणे, महसूल व दंडवसुली, संवेदनशील भागांतील देखरेख, तसेच विविध विभागांनी केलेल्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी अनधिकृत वाळू उपशास प्रतिबंध करण्यासाठी संयुक्त तपासणी पथके अधिक सक्रिय ठेवण्याच्या, रात्रीच्या वेळी गस्त वाढविण्याच्या, तक्रारींवर तातडीने कारवाई करण्याच्या तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रभावी निरीक्षण करण्याच्या सूचना दिल्या. नदीपात्रातील पर्यावरणीय समतोल अबाधित राहील याची दक्षता घेण्याबरोबरच शासनाच्या धोरणानुसार वाळू व्यवस्थापनाची पारदर्शक व प्रभावी अंमलबजावणी करण्यावर त्यांनी भर दिला.

# आ. मुटकुळेंच्याहस्ते आडगाव ते चिंचाळा पाणंद रस्त्याचे भूमीपूजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**
मुख्यमंत्री बळीराजा शेतपांदन रस्ते योजने अंतर्गत आडगाव-बेलुरा-चिंचाळा पांदन रस्ता कामाचे भूमिपूजन आमदार तान्हाजीराव मुटकूळे यांच्या हस्ते संपन्न झाले. या रस्त्याच्या कामासाठी ३६ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, यामुळे स्थानिक शेतकऱ्यांचा वाहतुकीचा प्रश्न निकाली निघणार आहे.

यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकूडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ,माजी जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, के.के शिंदे आदींची उपस्थिती होती. पावसाळ्यात या कच्च्या रस्त्यांवर चिखल होत असल्याने शेतकऱ्यांना शेतमाल बाजारात नेणे कठीण होत होते. या भागातील शेतकऱ्यांनी आ.मुटकूळे यांच्याकडे ही अडचण मांडली होती यानंतर आ. तान्हाजीराव मुटकूळे यांनी पाठपुरावा करून ३६ लक्ष रुपयांच्या कामाला मंजुरी आणली.

भूमिपूजन प्रसंगी बोलताना आमदार मुटकूळे म्हणाले की, शेतकऱ्यांचे जीवन सुकर करणे आणि ग्रामीण भागाचा विकास करणे हे आमचे मुख्य ध्येय आहे. या शेतपांदन रस्त्यामुळे आडगाव, बेलुरा आणि चिंचाळा परिसरातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाणे सोपे होईल, तसेच शेतमालाची वाहतूक करणे अधिक सुलभ होईल. हे काम अत्यंत दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या आहेत. या कार्यक्रमाला परिसरातील प्रमुख पदाधिकारी, ग्रामस्थ, शेतकरी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फाळेगाव येथे महाराजस्व अभियान व आरोग्य तपासणी शिबीराला प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून महसुलमंत्री चंद्रकांत बावनकुळे यांच्या संकल्पनेतुन महसूल विभागाच्या वतीने फाळेगाव येथे हिंगोली विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान आणि मोफत महाआरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या शिबिराच्या अध्यक्षस्थानी हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार तान्हाजीराव मुटकूळे हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटूकूडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, तहसिलदार सखाराम मांडवगडे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, बिडीओ माया वानखडे, के.के शिंदे, सरपंच लक्ष्मीबाई असोले, फुलाजीराव शिंदे, नारायण खेडकर, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, पवन उपाध्ये, माणीक लोडे, विष्णू भोजे, अय्युब पठाण, माजी सभापती उत्तमराव असोले, पोलीस पाटील कवीताताई बेले, श्रीरंग राठोड, नंदू खिल्लारे, पदमाकर नायक, सचिन शिंदे, काळे तलाठी यांच्यासह महसूल व आरोग्य विभागाचे विविध अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आणि महत्त्वाच्या दाखल्यांसाठी अनेकदा शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. हीच अडचण ओळखून प्रशासनाने या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना लागणारे विविध महसूल दाखले, दाखल्यांचे नूतनीकरण आणि शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचे प्रमाणपत्र वाटप थेट एकाच छताखाली अत्यंत पारदर्शकपणे केले थेट गावातच सर्व कागदपत्रे वाटप करण्यात आले.

या अभियानांतर्गत केवळ शासकीय कागदपत्रेच नव्हे, तर नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नेत्र तज्ज्ञ डॉ किशन लखमावार, डॉ. संजय नाकाडे, डॉ.दिपक मोरे, डॉ. मनिष बगडिया यांच्यासह दंत महाविद्यालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करून औषधोपचार केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात आमदार तान्हाजीराव मुटकूळे म्हणाले की, सर्वसामान्यांच्या दारात शासकीय सेवा पोहोचवणे हाच या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जनतेला ही हक्काची भेट देण्यात आली आहे. शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असा विश्वास त्यांनी यावेळी त्यांनी व्यक्त केला.

## संक्षिप्त वृत्त

### मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त दुग्धाभिषेक



हिंगोली- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिवसानिमित्ताने भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी आठव्या स्थानावर असलेल्या ज्योतिर्लिंग नागनाथ प्रभूस दुग्धभिषेक करून महापूजा करण्यात आली. तसेच मुख्यमंत्र्यांच्या दीर्घ आयुष्यासाठी व राज्याच्या समृद्धीसाठी श्रीक्षेत्र औंढा नागनाथ येथील आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ प्रभूस भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी साकडे घातले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुरजितसिग ठाकूर, भाजपाचे माजी शिक्षण सभापती पांडुरंग पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सखाराम इंगळे, औंढा नागनाथ तालुकाध्यक्ष सर्जेराव दिंडे, नगरसेविका अश्विनी पाटील, शहराध्यक्ष बबन सोनुने, गणेश पाटील, विलास काळे, गणेश देशमुख, ॲड एस एस कदम, अनिल भांडे, शंकर काळे, ॲड गणेश ठाकूर, राजू गिरी, महेश जोशी, प्रकाश पोले, विजय पडोळे, श्रीरंग हनवते, कचरू शेळके, नामदेव गिरी, सुधाकर शेळके, माधव वानखेडे, रुखमीनाबाई जळते, सिदबाराव करे, विजय पडोळे, गोपी पडोळे, सतीश यादव, भारत दिंडे, नवनाथ देशमुख, ज्ञानेश्वर पोले, प्रसाद दिंडे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### वंचीतकडून आज जिल्हा बंदचे आवाहन

हिंगोली- दिल्ली येथील जंतर मंतरवरील आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराचा तसेच अश्रूधूराच्या नळकांड्यांचा मारा यांच्या विरोधात वंचीत बहुजन आघाडीच्यावतीने दि २३ जुलै रोजी जिल्हा बंदची हाक देण्यात आली असून येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर पूतळ्यापासून वंचीत बहुजन आघाडीच्यावतीने मोर्चा काढण्यात येणार असून या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष शिवाजी खरात, सुनील खिल्लारे, प्रकाश राऊत, विनोद नाईक, योगेश नरवाडे, श्रीमती सुनीता निरगुडे, भूषण पाईकरावख, सगनराव निरगुडे यांनी केले आहे.



हिंगोली- शहरातील बसस्थानक परिसरात जाणाऱ्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून पावसाचे पाणी साचत असल्यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. छाया- विजय गुंडेकर

# मस्तानशहा नगर जन आरोग्य केंद्रात स्व. अजित पवार यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**
जन आरोग्य केंद्र नगर परिषद कॉलोनी येथे स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सुमित कांबळे जन आरोग्य केंद्र समिती अध्यक्ष तथा नगरसेवक यांच्या प्रमुख उपस्थितीत स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. अजित पवार यांच्या सामाजिक, राजकीय व लोकहितकारी कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. तसेच समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची आठवण करून देण्यात आली.

कार्यक्रमास डॉ.संतोष गिरी, गणेश ठोके, प्रियांका राठोड, कलावती राठोड,स्वाती कांबळे, एम.बांगर, सुनीता सुफळकर, अर्चना खडसे, आरती घोसीर, सर्व कर्मचारी, सदस्य, नागरिक, कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण श्रद्धा व आदराने भरलेले होते.

# आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क व सज्ज ठेवावी- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**
जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम, सतर्क व समन्वयाने कार्यरत राहण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी पावसाळी हंगामाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ती पूर्वतयारी पूर्ण ठेवावी. संभाव्य आपत्तीच्या प्रसंगी तातडीने प्रतिसाद देऊन नागरिकांचे जीवित व वित्तहानी टाळण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज आयोजित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, पोलीस उपअधीक्षक पी. एम. माकोडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रविंद्र पुरी, व्ही. एस. निर्मळ, वि. भा. पत्की, डी. एस. येस्के, एस. डी. बेरसले, डी.एन. बावळे आदी उपस्थित होते.

बैठकीत जिल्ह्यातील पर्जन्यमान, नदी-नाले व धरणांच्या पाणीपातळीची सद्यस्थिती, पूरप्रवण गावे, आपत्कालीन निवारा केंद्रांची तयारी, बचाव साहित्याची उपलब्धता, आरोग्य सेवा, वीजपुरवठा, पिण्याचे पाणी, रस्ते, दूरसंचार व्यवस्था तसेच विविध विभागांनी केलेल्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी प्रत्येक विभागाने आपत्कालीन कृती आराखडा अद्ययावत ठेवावा, नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवावा, पूरप्रवण भागांवर सातत्याने लक्ष ठेवून आवश्यकतेनुसार नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्याची तयारी ठेवावी, तसेच हवामान विभागाकडून प्राप्त होणाऱ्या इशाऱ्यांनुसार तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश दिले. तसेच महसूल, पोलीस, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, महावितरण, ग्रामीण विकास, नगर परिषद, अग्निशमन दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल व राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांच्यात प्रभावी समन्वय ठेवून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# हिंगोलीत विविध उपक्रमांनी वनमहोत्सव साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**
सामाजिक वनीकरण विभाग आणि राज्य राखीव पोलिस बल गट क्र. १२, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जुलै २०२६ रोजी 'वनमहोत्सव २०२६' या उपक्रमाचे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वृक्षपूजन करून झाली. त्यानंतर आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्यांचा रोप देऊन सत्कार करण्यात आला. पर्यावरण संवर्धन आणि हरित हिंगोलीच्या ध्येयाने प्रेरित होऊन या वेळी वृक्षारोपण करण्यात आले. तसेच नागरिकांना रोपे उपलब्ध व्हावीत यासाठी 'रोप विक्री केंद्राचे उद्घाटन' करण्यात आले. उपक्रमाचे औचित्य साधून उपस्थितांसाठी आकर्षण ठरणारे 'सेल्फी स्टँड' देखील या ठिकाणी उभारण्यात आले होते. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, समादेशक सुशांत सिंह, विभागीय वन अधिकारी पुष्पा पवार, सहाय्यक वन संरक्षक विजय कटके, वनपरिक्षेत्र अधिकारी संदीप शिंदे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वन विभागाचे वनपाल संदीप वाघ तसेच वनरक्षक देवराव दिपके, बालाजी जाधव, सुरज शेळके, सुनिता लोने, राजू कोटकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

तसेच राज्य राखीव दलाचे अतुल अवरगंड आणि इतर कर्मचाऱ्यांसह तुषार भालेराव, शाहू भालेराव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपणाचा हा संदेश घरोघरी पोहोचावा आणि पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन या प्रसंगी उपस्थितांनी केले.

## महाराजस्व समाधान' महाशिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

# एकाच छताखाली शासकीय सेवांचा लाभ; शेकडो नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निवारण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ जुलै -**

राज्य शासनाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी मुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' अंतर्गत बुधवारी (दि. २२) किनवट येथील गोकुंदा रोडवरील एन. के. गार्डन येथे भव्य महाशिबिर उत्साहात पार पडले. महसूलसह विविध शासकीय विभागांनी एकाच छताखाली नागरिकांना विविध सेवा उपलब्ध करून दिल्याने शेकडो नागरिकांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेतला, तर अनेकांच्या तक्रारींचे जागेवरच निवारण करण्यात आले.




महाशिबिराच्या अध्यक्षस्थानी आमदार भीमराव रामजी केराम होते. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. बी. सरवनन, किनवटच्या तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर, माहूरचे तहसीलदार अभिजित जगताप, किनवटच्या नगराध्यक्ष सौ. सुजाता एंड्रलवार, किनवट पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सौ. जयश्री वाघमारे, माहूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारीज्ञानेश्वर टाकरस, किनवटचे मुख्याधिकारी मुगाची काकडे, माहूरचे मुख्याधिकारी विवेकानंद कांदे तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

महाशिबिरात महसूल, ग्रामविकास, कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, सामाजिक न्याय, महावितरण, भूमी अभिलेख, परिवहन, पशुसंवर्धन, सहकार आदी विभागांच्या माध्यमातून उत्पन्न, जात व निवासी दाखले, विविध प्रमाणपत्रे, अर्ज स्वीकारणे, तक्रार निवारण, शासकीय योजनांची माहिती व मार्गदर्शन अशा विविध सेवा देण्यात आल्या. पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ वितरित करण्यात आला, तर अनेक नागरिकांच्या समस्या संबंधित अधिकाऱ्यांनी तत्काळ सोडविल्या.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार भीमराव केराम म्हणाले, राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक पात्र नागरिकाला कोणत्याही अडथळ्याशिवाय शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकासाभिमुख योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून ग्रामीण भागातील नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून एकाच छताखाली नागरिकांना आवश्यक शासकीय सेवा उपलब्ध करून देणे हा या महाशिबिराचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांना कार्यालयांचे वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत, त्यांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरण व्हावे आणि पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ सुलभपणे मिळावा, यासाठी प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे, असे किनवटच्या तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी प्रस्तावनेत सांगितले.

कार्यक्रमाची प्रस्तावना तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी केली. आभार प्रदर्शन माहूरचे तहसीलदार अभिजित जगताप यांनी केले, तर सूत्रसंचालन उत्तम कानींदे यांनी केले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीरास प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २ जुलै -**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी भोकर शहरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने विविध सामाजीक उपक्रम राबविण्यात आले असून रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दि.२२ जुलै रोजी शहरात मोंढा परिसरात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. पाऊस सुरू असतांनाही या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. युवक ,नगरसेवक यांच्यासह अनेकांनी रक्तदान केले.



शिबिरास आ.श्रीजया चव्हाण यांनी भेट देवून समाधान व्यक्त केले. आ. श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते वृक्षलागवड करून एआय चे व्हीडीओ प्रदर्शन करण्यात आले. शहरात विविध सामाजिक उपक्रमांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.यावेळी नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, सभापती जगदीश पाटील भोसीकर,भाजपाचे तालुकाध्यक्ष दिवाकर रेड्डी सुरकुंटवाड, उपनगराध्यक्ष दिलीप सोनवाडे, शहराध्यक्ष विशाल माने ,गटनेते विठ्ठल पाटील धोंडगे, जितेंद्र देशमुख, केशव पाटील पोमनाळकर, डॉ. बालाजी आंदबोरीकर, उज्वल केसराळे, सारंग मुंडडा, योगेश भोकरकर,डॉ. मनोज गिमेकर, वेणू कोंडलवार, संजय चिंतावार, अवधुत गिरी,गौतम कसबे, विकास क्षिरसागर, सिध्देश्वर पिटलेवाड, अमोल शहांगटवार, अमीत न्याकावार, गोविंद मेटकर, किरण खरोडे, अनिता जाधव, सुनिता राचुटकर यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. रक्तदान शिबीरासाठी गोळवलकर गुरुजी रक्तकेंद्राच्या गौरी ठाकूर, निखील सवणे, प्रसाद महाजन ,इंदुबाई सुर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले.

## स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**नांदेड** -महाराष्ट्राचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित अनंतराव पवार यांची जयंती नांदेड जिल्हा परिषदेत साजरी करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांच्या हस्ते स्वर्गीय अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन) डॉ. प्रवीणकुमार घुले, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, महिला व बाल विकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी उपस्थित होते.

# आदमपूरात मृत वानरावर अंत्यसंस्कार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ जुलै -**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील शेतकरी बसवंत विश्वनाथ बिद्राळे यांच्या शेतात कुत्र्याने चावा घेतल्यामुळे एका वानराचा मृत्यु झाला.त्या मृत वानर प्राण्यावर शेतातच बुधवार दि.२२ जुलै रोजी आदमपूर येथील वन्यजीव प्रेमी तरुणांकडून शोकाकुल अंत्यविधी करण्यात आला.

येथील बसवंत बिद्राळे यांच्या शेतात सकाळी ९:३० वाजता एक वानर मृतावस्थेत असल्याचे निदर्शनास आले.गावातील सर्पमित्र तथा वन्यजीव प्रेमी राज मुंडकर यांना माहिती मिळाल्यानंतर काही तरूण सोबतीला घेऊन त्या वानरावर हिंदू रितीरिवाजानुसार एका कडुलिंबाच्या झाडाखाली खोल खड्डा करून मृत वानरास मातीआड



करण्यात आले.यावेळी राजेश मुंडकर,वन्यजीव प्रेमी तथा पत्रकार जाफर आदमपूरकर, ओंकार शिराळे,शंकर कासलवार, सदव बोमडूले, ओमकार बिद्राळे,शिवानंद इंगळे आदि तरूण उपस्थित होते.

## आ. चिखलीकर यांच्या संपर्क कार्यालयात स्व. अजितदादा पवार जयंती साजरी

**नांदेड**-लोकनेते, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा कर्मवीर स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष, वसंतनगर येथील निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, नांदेड दक्षिण ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, सौ. प्रणितताताई देवरे-चिखलीकर, शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, कार्यालयीन सरचिटणीस श्रीधरराव नागापूरकर, युवक शहराध्यक्ष मोहसीन खान पठाण, मनपा गटनेते साबेर चाऊस, नगरसेवक हबीब बावजीर, युवक कार्याध्यक्ष माधव चिंचाळे, अल्पसंख्याक शहराध्यक्ष जमीर पठाण, ड. नाज परवीन, बाळासाहेब सोनकांबळे, मौलाना, ममता सोनकांबळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर म्हणाले, स्व. अजितदादा पवार यांचा वाढदिवस आम्ही दरवर्षी उत्साहात साजरा करत होतो. मात्र, यावर्षी ते आपल्यात नसल्याने त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्याची वेळ आली आहे. त्यांचे कार्य, नेतृत्व आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांवरील प्रेम आम्हाला सदैव प्रेरणा देत राहील. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार आपण सर्वांनी करावा.यावेळी उपस्थितांनी स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण अभिवादन केले. कार्यक्रम भावनिक वातावरणात पार पडला.

## गिरीश देशमुख इंग्लिश स्कुल येथे संगीत विभागाचे उद्‌घाटन!

**उमरी**- स्थानिक गोदावरी शिक्षण संस्था येथे मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार सतीशजी चव्हाण यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी गिरीश देशमुख इंग्लिश स्कुल च्या नवीन संगीत



विभागाचे उद्घाटन आ सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले

या वेळी तालुक्यातील असंख्य पदवीधर आणि गोदावरी शिक्षण संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' आणि युवकांच्या आव्हानांवर सखोल मार्गदर्शनउद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना आमदार सतीश चव्हाण यांनी आजच्या आधुनिक युगातील तंत्रज्ञानावर प्रकाश टाकला. ते म्हणाले:आजचे जग हे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स मुळे झपाट्याने बदलत आहे. या तांत्रिक क्रांतीच्या युगात युवकांनी स्वतःला अपडेट ठेवणे काळाची गरज आहे.पुढे बोलताना त्यांनी युवक पदवीधरांच्या विविध प्रश्नांवर आणि रोजगाराच्या संधींवर सखोल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. पदवीधरांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले कार्यक्रमाला उमरी परिसरातील गोदावरी शिक्षण संस्थेचा संपूर्ण स्टाफ उपस्थित होता. संस्थेच्या वतीने आमदार सतीश चव्हाण यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ विक्रम देशमुख यांनी शाल श्रीफळ देऊन स्वागत केले संगीत विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कलेचे दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल परिसरातील विद्यार्थ्याची मोठी सोय होणार आहे
या कार्यक्रमांस शिक्षक मुख्याध्यापक समन्वय संघांचे जिल्हा अध्यक्ष डी बी जांभरूनकर मुख्याध्यापक एस एन सुरकुटवार स्वाती वच्चेवार संजय हिवराळे विश्वजित देशमुख ज्ञानेशर कदम बालाजी पाटील शिंदे संदिप मोरे संतोष गुंठे रावसाहेब वडजे रमेश हैबते तालुका समन्वयक जिरेवार इ सह शिक्षक ची मोठ्या सख्यने उपस्थिती होती.

## नांदेड ते हनेगाव नाईट हल्टिंग बस चालू करण्याची भीमशक्ती संघटनेची मागणी

**हानेगाव**-भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने नांदेड ते हनेगाव बस सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली. हानेगाव हे कर्नाटक, आंध्रा ,महाराष्ट्र , राज्याच्या सीमेवर अति दुर्लक्षित व दुर्गम भाग असून या या परिसरातील शालेय विद्यार्थी कॉलेजला जाण्यासाठी व कॉलेजच्या ,विद्यापीठाच्या हॉस्पिटलच्या, व शासकीय ,विविध, कामासाठी विद्यार्थी, व्यापारी, कर्मचारी ,शेतकरी, हे मोठ्या प्रमाणात नांदेडसाठी आवक जावक करत असतात हाणेगाव हे देगलूर तालुक्यात सर्वात मोठे गाव असल्याचे निवेदनात नमुद केले आहे. यावेळी भीम शक्ती सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक नगरपालिका देगलूर शत्रुघन दादा वाघमारे, तालुकाध्यक्ष किशोर आडेकर भीमशक्ती सामाजिक संघटना देगलूर, भीमराव भूतनरे तालुका उपाध्यक्ष भीम शक्ती सामाजिक संघटना देगलूर व आदी कार्यकर्ते उपस्थित होते

# लाठीचार्जच्या निषेधार्थ २३ जुलै रोजी महाराष्ट्र बंद ; सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २२ जुलै -**

दिल्ली येथे शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या लाठीचार्ज व बळाच्या वापराच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने २३ जुलै रोजी पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदला संपूर्ण पाठिंबा जाहीर केला आहे. विद्यार्थ्यांच्या घटनात्मक अधिकारांवर गदा आणणाऱ्या या घटनेचा वंचित बहुजन आघाडी, नांदेड जिल्ह्याच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे.

संघटनेच्या मते, भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार दिलेला असताना विद्यार्थ्यांवर करण्यात आलेली कारवाई ही लोकशाही मूल्यांना धक्का देणारी आहे. त्यामुळे अशा दडपशाहीविरोधात संपूर्ण महाराष्ट्राने एकजूट दाखविण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या पार्श्वभूमीवर मा. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी २३ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली असून, त्यानिमित्ताने २२ जुलै रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे तातडीची समन्वय बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, शैक्षणिक संस्था, व्यापारी संघटना, एसटी कर्मचारी, ऑटो रिक्षा युनियन, कामगार संघटना तसेच विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, २३ जुलै रोजी सकाळी १० वाजता महात्मा फुले पुतळा, आयटीआय कॉर्नर, नांदेड येथे सर्वांनी एकत्र जमून महाराष्ट्र बंद यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी आपल्या-आपल्या भागात शांततापूर्ण व संविधानिक मार्गाने बंद यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा असेही सांगण्यात आले. लोकशाही, संविधान आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांच्या संरक्षणासाठी विद्यार्थी, पालक, शिक्षक, व्यापारी, कामगार, शेतकरी, एसटी कर्मचारी, ऑटो रिक्षा चालक तसेच सर्व सामाजिक व राजकीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने महाराष्ट्र बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नांदेड (दक्षिण) जिल्हाध्यक्ष शंकर गंगाधर महाजन आणि नांदेड (उत्तर) जिल्हाध्यक्ष प्रा. राज अटकोरे यांनी संयुक्तपणे केले आहे.

# जंतर -मंतर येथे होत असलेल्या आंदोलनास हदगांव येथून पाठिंबा

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २२ जुलै -**

नीट पेपर फुटी संदर्भात विद्यार्थ्यांनीच्या भविष्यासाठी देशात अनेक ठिकाणी आंदोलन करण्यात येत आहेत. पेपर फुटीचा तणाव घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी आपले जीवन संपविले आहे. मागील एक महिन्या पासून सोनम वाघचूक, व विद्यार्थी जंतर-मंतर येथे लोकशाही मार्गाने आंदोलन करीत आहेत. परन्तु त्यांच्या मागण्यांचा विचार न-करता सोनम वांघचूक यांना जबरदस्तीने आंदोलन स्थळावरून उठवण्यात आले. दि.२० जुलै रोजी लोकशाही मार्गाने अनेक विद्यार्थी व समर्थक जमून आंदोलन करत असतांना पोलीस प्रशासनाने आआंदोलनकांवर क्रूर पणे लाठीमार केला, यात अनेक अल्पवयीन, वृद्धलोक व महिलांना मोठ्या प्रमाणात दुखापत झाली आहे.



लोकशाही मार्गाने होत असलेल्या आंदोलनावर निर्दयी पणे केलेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ, पेपरफुटीचे जिम्मेदारी घेऊन शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामाच्या मागणीसाठी व जंतर मंतर येथे सुरु असलेल्या विद्यार्थी आआंदोलनच्या समर्थनार्थ आम्ही खालील सही करणार दि. २४/०७/२०२६ पासून तहसील कार्यालय, हदगाव ता. हदगाव जी. नांदेड येथे रविकुमार चव्हाण, मिलिंद पाईकराव व सहकारी उपोषण करणार असल्याचे निवेदन आज तहसील कार्यालय हदगांव येथे देण्यात आले.

# शताब्दी वर्षात राष्ट्रीय जलदिनाची मागणी पूर्ण करावी
## केंद्रीय मंत्री आठवले यांच्याकडे महेंद्र पिंपळगावकर यांची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ जुलै -**

२० मार्च महाडच्या चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रह हा दिवस राष्ट्रीय जलदिन म्हणून घोषित करावा या मागणीसाठी राज्य व देशपातळीवरील नेत्यांना सातत्याने निवेदने देऊन, भेटी घेऊन प्रयत्न चालू असून काल नांदेड येथे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची भेट घेऊन सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षात ही मागणी पूर्ण करावी अशी विनंती या आंदोलनाचे प्रणेते महेंद्र पिंपळगावकर यांनी केली आहे.

२० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली महाड (जि. रायगड) येथे पार पडलेला 'चवदार तळे सत्याग्रह' हा भारताच्या सामाजिक समतेच्या इतिहासातील एक क्रांतिकारक प्रसंग आहे. या दिवशी प्रथमच अस्पृश्य समाजाला सार्वजनिक ठिकाणी पाण्याच्या तळ्यावर समान हक्काने प्रवेश मिळाला. हा



दिवस भारतीय संविधानाच्या सामाजिक न्यायाच्या तत्त्वांचा पाया घालणारा म्हणून इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला गेला आहे. सत्याग्रहाचे हे शताब्दी वर्ष शासन स्तरावर साजरे होईल अशी घोषणा सरकारतर्फे करण्यात आली होती. तथापि अद्याप कोणतेही ठोस कार्यक्रम घेण्यात आले नसल्याचे दिसत आहे. २० मार्च हा दिवस राष्ट्रीय जलदिन म्हणून घोषित व्हावा याकरीता महेंद्र पिंपळगावकर यांनी मागील दोन ते अडीच वर्षापासून आपले प्रयत्न सुरुच ठेवले आहेत. जेष्ठ नेते खा. शरदचंद्रजी पवार, खा. असददोद्दीन ओवेसी, राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, खा.डॉ. ज्योतीताई वाघमारे, वंचितच्या नेत्या अंजलीताई आंबेडकर केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या मागणीचे महत्त्व पटवून देण्यात आले. त्यांनी देखील या प्रश्नी आपापल्या स्तरावर प्रामाणिक प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. वेगवेगळ्या धम्म परिषदा, साहित्य संमेलनातून राष्ट्रीय जलदिन व्हावा असा ठराव घेण्यात आला.

केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री ना. रामदासजी आठवले हे नांदेड येथे आले असता पिंपळगावकर यांनी त्यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. त्यावर ना. आठवले यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी रिपाइंचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विजयदादा सोनवणे, नगरसेवक प्र. राजू लांडगे, विशाल सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणचे केवळ फोटोसेशन !

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ जुलै -**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य सामाजिक सेवा उपक्रम अंतर्गत मुदखेड भाजपाच्या वतीने दि.२२ जुलै रोजी ग्रामीण रुग्णालय येथे विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या उपक्रमात ग्रामिण रुग्णालयातील रुग्णांना फळ वाटप, वृक्षारोपण, आणि टिशर्ट वाटपाचे अयोजन करण्यात आले होते. परंतू या भव्य सामाजिक सेवा उपक्रमात फक्त रुग्णांना फळे वाटप करण्यात आले.

पण रुग्णालयातील गार्डन मध्ये आधीच मोठी झाडे असलेल्या परिसरात केवळ एकच रोप लावून त्याचा फोटो काढण्यात आला. आणि एका लहान रोपाभोवती १५ ते २० कार्यकर्ते उभे राहून फोटो काढत आहेत. ज्या ठिकाणी वृक्षांची खरी गरज आहे अशा शाळा,



बसस्थानक, माळरान या ठिकाणी मात्र एकही रोप लावले गेले नाही.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सेवाच संघटना हा संदेश दिला आहे. मात्र मुदखेडमध्ये तो केवळ एका फोटोपूरताच राहिला का? असा सवाल आता उपस्थित होत आहे.घोषणा झाली, खरी पण अंमलबजावणी नाही. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांना टी-शर्ट वाटप करण्याची घोषणाही करण्यात आली होती. परंतु ते वाटपही झाले नसल्याचे समोर आले आहे. या उपक्रमाला मुदखेड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा यांना डावलून हा कार्यक्रम घेण्यात

**टी.सी.हरवली आहे.**

संजीवनी कोंडीबा नायनवाड या नावाची इयत्ता दहावी पासची टी.सी.व इतर कागदपत्रे नांदेड-देगलूर बस प्रवासादरम्यान हरवली आहेत तरी कोनाला सापडल्यास खालील पत्त्यावर किंवा मोबाईल नंबर वर संपर्क साधावा .टी सी व कागदपत्र आणून देणार्यास उचित बक्षीस देण्यात येईल.

**पत्ता:**
**संजीवनी कोंडीबा नायनवाड**
**मुक्काम पोस्ट सुगाव ता.देगलूर जि.नांदेड.**
**मोबाईल नंबर-९९७०६७१५७७**

**जाहिर प्रगटन**

नोंदीचा प्रकार:खरेदी

माहिती मिळाल्याचा दि.१६/०७/२६फेरफाराचा दि.१८/०७/२६लिहून देणार:धनंजय रमेश जोशी रा.भोकर(खाता क्र.३२७) गट/सर्व्हे क्र.५०० लागवडीयोग्य क्षेत्र १.२१०० हे.आर.चौ.मी.पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.००९६हे.आर.चौ.मी.पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी.हे त्यांनी लिहून घेणार:इंद्रजित दत्तराम इप्पर(खाता क्र.१२३१९)गट/सर्व्हे क्र.५००लागवडीयोग्य क्षेत्र ०.००९६हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्र.१२७४ दि.२९/०९/२००७ प्रमाणे रक्कम रुपये ३००००घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणार्याचे नाव गाव नमूना नं.७/१२ वर दाखल केले. ज्या अर्थी उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन /फेरफाराच्या नोंदवहीवरुन मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदी संबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे,असे गृहित धरले जाईल.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर.**

लातूर
दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## काटेजवळगा जि.प. शाळेत शिक्षकांची कमतरता १७० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २२ जुलै : शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचा शासनाचा दावा असताना निलंगा तालुक्यातील काटेजवळगा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शिक्षकांच्या कमतरतेमुळे १७० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न्न गंभीर बनला आहे. मंजूर सात पदांपैकी केवळ चार शिक्षक कार्यरत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची भावना पालक व ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

या शाळेसाठी मुख्याध्यापकांसह सात शिक्षकांची पदे मंजूर आहेत. मात्र सध्या मुख्याध्यापकांसह केवळ चार शिक्षक कार्यरत असून एक सहाय्यक शिक्षक व दोन प्राथमिक पदवीधर शिक्षकांची पदे रिक्त आहेत. परिणामी पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व वर्गांचे अध्यापन अवघ्या चार शिक्षकांवर अवलंबून आहे. अनेकदा एका शिक्षकाला एकाच वेळी दोन वर्गांची जबाबदारी सांभाळावी लागत असल्याने अध्यापनावर ताण निर्माण होत आहे.

शाळेत एकूण १७० विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यामध्ये ७४ मुले व ९५ मुलींचा समावेश आहे. शिक्षकांच्या अपुऱ्या संख्येमुळे अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करणे, प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे आणि शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवणे कठीण होत असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

शिक्षणाचा अधिकार हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत अधिकार असताना शिक्षकांची रिक्त पदे दीर्घकाळ न भरणे ही चिंतेची बाब असल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या समान संधी मिळाव्यात, यासाठी तातडीने रिक्त पदे भरावीत, अशी मागणी होत आहे.



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त ५६ हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

## क्रिएटिव्ह फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम, औसा विधानसभा मतदारसंघातील ३७३ शाळांमध्ये एकाच वेळी वितरण

तभा वृत्तसेवा

औसा दि. २२ जुलै : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त औसा विधानसभा मतदारसंघात आमदार अभिमन्यू पवार यांच्या पुढाकारातून तसेच क्रिएटिव्ह फाउंडेशनच्या संकल्पनेतून भव्य शालेय साहित्य वाटप उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत मतदारसंघातील ३७३ शाळांमधील तब्बल ५६ हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.



या उपक्रमात इयत्ता पहिली ते चौथीतील २१ हजार विद्यार्थ्यांना दर्जेदार स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. तर इयत्ता पाचवी ते दहावीतील ३५ हजार विद्यार्थ्यांना प्रत्येकी सहा वह्यांचे वितरण करण्यात आले. संपूर्ण औसा विधानसभा मतदारसंघात एकाच वेळी हा उपक्रम राबविण्यात आल्याने शाळांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले.यावेळी तुंगी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांशी आमदार अभिमन्यू पवार यांनी ऑनलाइन संवाद साधला. विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देतानाच त्यांनी राज्य शासनाच्या विविध विद्यार्थी कल्याणकारी योजना, शैक्षणिक सुविधा आणि शासनाच्या लोकाभिमुख उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनीही या संवादात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न्न विचारले.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेला हा उपक्रम आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी मोठा आधार ठरला आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला चालना देणाऱ्या या उपक्रमाचे औसा विधानसभा मतदारसंघात सर्व स्तरांतून कौतुक होत असून, क्रिएटिव्ह फाउंडेशन आणि आमदार अभिमन्यू पवार यांच्या या सामाजिक उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले.

## मुख्यमंत्री फडणवीसांच्या वाढदिवसानिमित्त औशात ८३९ जणांचे रक्तदान

# आमदार अभिमन्यू पवार यांच्या संकल्पनेतून 'सेवा यज्ञाचा संकल्प' उपक्रम



तभा वृत्तसेवा

औसा दि.२२ जुलै : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार अभिमन्यू पवार यांच्या संकल्पनेतून २३ जुलै रोजी आयोजित 'सेवा यज्ञाचा संकल्प' या सामाजिक उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.तर औसा विधानसभा मतदारसंघातील आलमला, लोदगा, बेलकुंड, किल्लारी, भूतमुगळी आणि औसा शहर येथे रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ८३९ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.

रक्तदान शिबिरात बेलकुंड येथे १३६, आलमला येथे १११, लोदगा येथे १५७, किल्लारी येथे १२५, भूतमुगळी येथे २२५ आणि औसा शहरात ८५ अशा एकूण ८३९ जणांनी रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास रस्ते सुरक्षेचा संदेश देण्यासाठी हेल्मेट भेट देण्यात आले.या उपक्रमाच्या माध्यमातून रक्तदानाद्वारे गरजू रुग्णांना जीवनदान देण्याबरोबरच हेल्मेट वाटपातून सुरक्षित वाहतुकीचा संदेश देण्यात आला. तसेच मतदारसंघातील विविध ठिकाणी वृक्षारोपण आणि गरजू नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करून पर्यावरण संवर्धन व सामाजिक सेवेलाही प्राधान्य देण्यात आले.

आमदार अभिमन्यू पवार, भाजपाचे संतोष मुक्ता, सुभाष जाधव, क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष परीक्षित पवार, औसा ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष रवी चिलमे,औसा मंडळाचे अध्यक्ष शिव मुरगे, किल्लारी मंडळाचे वृषाल देशमुख, कासार शिरशी मंडळाचे अध्यक्ष नाना धुमाळ यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विविध वृत्त.....

### सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ जुलै : येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा जनजागृती उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत श्री देशिकेंद्र विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले होते .

दि. २१ जुलै रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत सत्र पार पडले . या सत्रामध्ये इयत्ता ८ वी ते १० वी मधील २०० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले असून सायबर वॉरिअर नरेश पंडित आणि सायबर वॉरिअर अविष्कार कांबळे यांनी विद्यार्थ्यांना फोटो मॉर्फिंग म्हणजे काय, कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) च्या माध्यमातून फोटो कसे तयार केले जातात, -ख चा सुरक्षित व जबाबदारीने वापर, मजबूत (डीींपस) पासवर्ड कसा तयार करावा याची उदाहरणांसह माहिती दिली. तसेच मोबाईलमध्ये कोणतेही प डाउनलोड करताना कोणत्या परवानग्या (झशीाळींीळेपी) द्याव्यात आणि कोणत्या परवानग्या देणे टाळावे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, जढझ फसवणूक आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर याविषयीही महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली.

संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे महत्त्व प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक कोळी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दानाई यांनी विशेष सहकार्य केले. यावेळी विद्यार्थांसह शिक्षक वर्गही मोठ्या संख्येने उपस्थित होता .

या सत्राला क्विक हिल फाऊंडेशनचे फील्ड इन्स्पेक्टर अरविंद यांनी भेट देऊन सत्राचे निरीक्षण केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याचे आवाहन करण्यात आले.

# किल्लारीत अपर तहसील कार्यालय, महसूल कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचे भूमिपूजन



तभा वृत्तसेवा

औसा दि.२२ जुलै : औसा तालुक्यातील किल्लारी येथे अपर तहसील कार्यालयाच्या नव्या इमारतीसह महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या बांधकामाचे भूमिपूजन बुधवार, दि. २२ जुलै २०२६ रोजी आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते करण्यात आले. हुतात्मा स्मारकाशेजारील बांधकामस्थळी झालेल्या या कार्यक्रमातून एकूण २७ कोटी ९८ लाख रुपयांच्या विकासकामांना प्रारंभ झाला.

या अंतर्गत १३ कोटी ५० लाख रुपये निधीतून अपर तहसील कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यात येणार आहे. तसेच १४ कोटी ४८ लाख रुपये निधीतून महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने उभारण्यात येणार आहे .यात प्रकार १- ची ४, प्रकार २ ची १७, प्रकार -३ ची ५ आणि प्रकार-४ चे १ अशी एकूण २७ निवासस्थाने उभारली जाणार आहेत.किल्लारी परिसरातील वाढती लोकसंख्या आणि दळणवळणाच्या सोयी लक्षात घेऊन अपर तहसील कार्यालय उभारण्याचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. या कार्यालयामुळे परिसरातील नागरिकांना महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन कामांसाठी औसा येथे जाण्याची गरज कमी होणार असून, विविध महसुली दाखले व प्रशासकीय सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे ग्रामस्थांचा वेळ, श्रम आणि खर्च यांची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.

या विकासकामांमुळे किल्लारी परिसरातील महसूल प्रशासन अधिक सक्षम आणि गतिमान होण्यास मदत होणार असून, नागरिकांना शासकीय सेवा अधिक जलद व सुलभपणे मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.यावेळी बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर,जिल्हा परिषद सदस्य सुभाष पवार,संतोष बेंबडे, दत्तात्रय कोळपे, बांधकाम विभागाचे अभियंता रोहन जाधव,बसवराज धाराशिवे,बाजार समितीचे संचालक गोविंद भोसले, युवराज बिराजदार,सुलोचना बाबळसुरे, युवराज गायकवाड, गुडाप्पा बालकुंदे , बंकट पाटील, दत्ता भोसले,सिध्देश्र्वर बालकुंदे, वाघंबर कांबळे, विजय माने आधीच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विविध आरोग्य उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २२ जुलै : मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त व दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या वतीने लातूर जिल्ह्यात विविध ठिकाणी रक्तदान, सर्वरोग निदान, कर्करोग तपासणी शिबिरे आणि जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व उपक्रमांना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या बाह्यरुग्ण विभागात सकाळी ८:३० ते दुपारी १ या वेळेत स्तन कर्करोग, गर्भाशय मुख कर्करोग, नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, तसेच हाडांच्या घनतेची तपासणी शिबिर पार पडले. यावेळी रुग्णांची तपासणी करून मोफत औषधोपचार व पुढील मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी उदगीरचे आमदार संजय बनसोडे, लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, उप अधिष्ठाता डॉ. मंगेश सेलुकर, डॉ. महादेव बनसुडे, डॉ. अजय ओव्हाळ, डॉ. उमेश कानडे, विशेष कार्य अधिकारी डॉ. सुनील होळीकर आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड यांची प्रमुख उपस्थिती होती.

# आकाशवाणीवरून यशवंत विद्यालयातील विद्यार्थ्यांचा 'भक्तिरंग



त.भा. वृत्तसेवा

अहमदपूर दि. २२ जुलै : ऑल इंडिया रेडिओच्या परभणी आकाशवाणी केंद्रावर महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेचा, वारकरी संप्रदायाचा, पंढरपूरच्या

वारीचा आणि भारतीय संस्कृतीचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने श्री लोहारे डी. बी. यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अहमदपूर येथील विद्यार्थ्यांनी आकाशवाणीवरून 'भक्तिरंग - वारकरी परंपरेचा वारसा' या विषयावर प्रभावी संवाद सादर केला.

सदरील कार्यक्रमाचे दि. २३ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वा. प्रसरण होणार आहे.या कार्यक्रमातून वारीचे आध्यात्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व तसेच संतांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा श्रोत्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात वारी म्हणजे भक्ती, समता आणि मानवतेचा अखंड उत्सव या विचाराने झाली. आषाढी वारी ही केवळ पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनाची यात्रा नसून प्रेम, बंधुभाव, शिस्त, सेवा, समता आणि मानवतेचा संदेश देणारी लोकचळवळ असल्याचे विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावी शब्दांत मांडले. वारकरी परंपरेतील अभंग, कीर्तन आणि हरिनामाच्या माध्यमातून समाजप्रबोधन घडत असल्याचेही त्यांनी सांगितले.

भक्तिरंग कार्यक्रमात विद्यालयातील विद्यार्थिनींनी संतांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. आराध्या पाटील हिने वारीचे महत्त्व स्पष्ट केले. सुरभी मुसळे हिने संत ज्ञानेश्र्वरांच्या ज्ञान, भक्ती आणि विश्र्वबंधुत्वाच्या संदेशावर प्रकाश टाकला. श्रेया चाटे हिने संत मुक्ताबाई यांच्या विचारांतील समता आणि आध्यात्मिकतेचे महत्त्व उलगडले. नंदिनी नागरगोजे हिने संत नामदेवांच्या अखंड भक्तीचा आणि समाजजागृतीतील योगदानाचा परिचय करून दिला. अक्षरा मठपती हिने संत एकनाथांच्या सामाजिक समतेच्या कार्याचा आढावा घेतला, तर ज्ञानेश्र्वरी सूर्यवंशी हिने संत तुकारामांच्या अभंगांमधून समाजाला मिळालेल्या नैतिक मूल्यांचा संदेश प्रभावीपणे मांडला.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (छएझ-२०२०) मधील कला-एकात्मिक शिक्षण (-ीं-खपींशसीरींशव ङशरीपळपस) या संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी. भारतीय ज्ञानपरंपरा, संत साहित्य, कला आणि संस्कृती यांचा संगम घडवत विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, आत्मविश्र्वास, संवादकौशल्य आणि सांस्कृतिक जाणीव विकसित करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. संतपरंपरेच्या माध्यमातून मूल्यशिक्षण आणि भारतीय संस्कृतीची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्याचा हा अभिनव प्रयोग ठरला नाविन्यपूर्ण उपक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन उपक्रमशील कलाशिक्षक महादेव शरणप्पा खळुरे यांनी केले. कला विभागाच्या वतीने भारतीय ज्ञानपरंपरेचा प्रसार आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने त्यांनी हा उपक्रम आकाशवाणीपर्यंत नेला. कार्यक्रमाचे प्रभावी निवेदनही त्यांनीच केले.

या कार्यक्रमामुळे यशवंत विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व, अभ्यासू वृत्ती आणि सांस्कृतिक जाणीवेचे दर्शन घडले. गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक शिवाजी सुर्यवंशी, विजयकुमार चव्हाण, परीक्षा विभाग प्रमुख सुनील धनुरे, गुरप्पा बावगे, क्रीडा प्रमुख संतोष कदम, सांस्कृतिक प्रमुख राजकुमार पाटील, डॉक्टर शरद करकनाळे, आदिनी अभिनंदन व कौतुक केले.

**रेणापूर नगर पंचायत कार्यालय जि. लातूर**

दुरध्वनी क्रं (०२३८२) (०२३८२) २९५ ४०२ E-MAIL ID NPRENAPURGMAIL.COM

जा.क्र/नपरे/आ.स्व.वि./कावि-७//२०२६

दिनांक १०-०७-२०२६

जाहीर सूचना

(घनकचरा व्यवस्थापन, दंड आकारणीबाबत)

या जाहीर सूचनेद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाने अधिसूचना क्र. एस. ओ. १९३५७ (इ.), दिनांक ०१-०४-२०२६ अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम लागू केले आहेत. या नियमाची अंमलबजावणी शहरामध्ये प्रभावीपणे चालू आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ च्या तरतुदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती/संस्थांना दंड करण्याचे (SPOT FINE) अधिकार नगर परिषदा/नगर पंचायतींना शासन निर्णय क्र. स्व.मअ २०१७/प्र. क्र. २५६ (१)/नवि-३४, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन दि. ०७ सप्टेंबर २०१८ अन्वये प्रदान करण्यात आले आहेत. त्यास अनुसरून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ च्या तरतुदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती/संस्थाकडून खालीलप्रमाणे दंडणीय रक्कम वसुल करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कृती/बाब | दंड रक्कम रू. |
|---|---|---|
| १ | रस्ते/मार्गावर घाण करणे, | १५०/- |
| २ | सार्वजनिक ठिकाणी थुकणे | १००/- |
| ३ | उघडयावर लघवी / लघुशंका करणे | १०० /- |
| ४ | उघडयावर शौच करणे | ५००/- |

शासनाने बंदी घातलेल्या प्लास्टीक साहित्याचा वापर वाहतुक किंवा साठवणूक करूर नये अन्याथा महाराष्ट्र अविघटनशिल कचरा ( नियंत्रण) २००६ अंतर्गत महाराष्ट्र प्लास्टीक धर्माकोल अधिसुचना २०१८ चे उल्लंघन केल्यास खालील प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

*पहिला गुन्हा रूपये ५०००/- (पाच हजार रूपये)
* दुसरा गुन्हा रूपये १००००/- (दहा हजार रूपये)
* तिसरा गुन्हा रूपये २५०००/- (पंचेविस हजार रूपये) दंड व ३ (तिन) महिण्याचा कारावास.

करावे. तरी, सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन धनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्य

स्वाक्षरीत
मुख्याधिकारी
नगर पंचायत रेणापूर

स्वाक्षरीत/-
उपनगराध्यक्षा
नगर पंचायत रेणापूर

स्वाक्षरीत -
नगराध्यक्षा
नगर पंचायत रेणापूर
२०२६/७/२२ १४:२५